ग्राममंगल

# शिक्षणवेध

शिक्षणातील प्रश्नांकडून उत्तरांकडे जाण्याचा एक मासिक प्रयत्न

शिक्षणात मूलगामी परिवर्तनाची वाट शोधणारा एक मासिक प्रकल्प

शिक्षणाकडे सर्व दिशांनी पाहणारा एक मासिक दृष्टिक्षेप



जिथे शारीरिक हालचालींवर आधारित सामाजिक अभिसरण असते,
तिथे बालकांचा बौद्धिक विकासही घडून येत असतो. – पियाजे

**संपादक**
रमेश पानसे

**कार्यकारी संपादक**
डॉ. वैखरी वैद्य

**संपादन साहाय्य**
मुग्धा नलावडे

**व्यवस्थापकीय संपादक**
प्रसाद मणेरीकर

**संचालक**
अदिती नातू

**कार्यकारी संचालक**
अजित मंडलिक

**संपादन मंडळ**
डॉ. द. ना. धनागरे
डॉ. हेमचंद्र प्रधान
विवेक सावंत
आशिष पेंडसे

**कायदेतज्ज्ञ आणि सल्लागार**
हेमांगी जोशी

**सल्लागार मंडळ**
डॉ. राम ताकवले
डॉ. जब्बार पटेल
कुमार केतकर
प्रमोद लेले
दीपक घैसास
डॉ. चंद्रहास देशपांडे
अच्युत गोडबोले

**मुखपृष्ठ व आतील चित्रे**
अपर्णा कुलकर्णी

ग्राममंगल

# शिक्षणवेध

वर्ष : तिसरे / अंक तिसरा / सप्टेंबर २०१२ / मूल्य : ४० रुपये

REGD. NO. MAHMAR / 2010 / 37640

संपादकीय / रमेश पानसे / ५
पत्र साहित्य एक भावदर्शन / अनिल जोशी / ७
बालकाच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क-२००९/ १३
काय आहे हा शिक्षणहक्क कायदा? / ॲड. रमा सरोदे/ २९
जागतिक पातळीवरील शिक्षणहक्क / ३२
सुदामा वर्गात येणार ना? / श्रुती पानसे /३४
गुणवत्ता शिक्षण-मुलांचा हक्क/ मुग्धा नलावडे/३७
शाळाव्यवस्थापन समिती-महत्त्वाचा दुवा /नीला आपटे/४१
शिक्षणविषयक बदलायला हवेत/सुधीर मुतालिक/४८
वृत्तविश्व/५४
ग्राममंगलवार्ता/ ५१
ग्राममंगल वार्ता/५८
प्राचीन ग्रीसमधील शिक्षणपध्दती-स्पार्टा / सुनित पोतनीस /६०
माध्यमिक शाळेतील चित्रकला शिक्षण / हेमा धोत्रे/६२
पालकत्वाचा विकास/ आसावरी गुपचूप /६४

**संपादकीय व कार्यालयीन पत्रव्यवहार**
**ग्राममंगल शिक्षणवेध**
गांधीभवन परिसर, अंधशाळेशेजारी, कोथरूड, पुणे ४११ ०३८.
Email : shikshanvedh@grammangal.org, संवाद : ०२० २५३८६६८७
'सृष्टी' अपार्टमेंट,फ्लॅट नं.१०६, सिंहगड रोड,पुणे–३०,संवाद –०२० २४२५२१५१
**प्रसिद्धी आणि जाहिरात संपर्क :** अजित मंडलिक
२२, यमुना, शास्त्री हॉल, जे. डी. मार्ग, मुंबई ७.
संवाद : ०९८६९०४९८४९
**बँकर्स :** दि ठाणे जनता सह. बँक लि.

हे मासिक मुद्रक–प्रकाशक अजित मंडलिक यांनी ग्राममंगल संस्थेसाठी इम्प्रेशन, २२, यमुना, शास्त्री हॉल, जे. डी. मार्ग, मुंबई ७ येथे छापून त्याच ठिकाणाहून प्रसिद्ध केले.

## || संपादकीय ||

# शिक्षण मुक्त असावे, बंदिस्त नसावे !

बालकाच्या शिक्षणाच्या मूलभूत हक्काचा कायदा ही तशी भारतात खूप उशिरा आलेली क्रांती आहे. भारतातील तत्कालीन इंग्रज सरकारकडे गोपाळ कृष्ण गोखले, महात्मा फुले वगैरे धुरिणांनी मागणी करून सुमारे सव्वाशे वर्षानंतर ह्या मागणीची पूर्ती झाली. विशेष असे की भारतीय स्वातंत्र्याचे अर्धशतक ओलांडल्यानंतर आणि भारतीय राज्यघटनेत, मार्गदर्शक तत्त्वांत उल्लेख होऊनही, इतका काल या अपेक्षापूर्तीला लागला.हे भारतात शिक्षणाकडे किती अनास्थेने पाहिले जाते त्याचे द्योतकच समजायला हरकत नाही.

राज्यघटनेत दुरुस्ती होऊन मार्गदर्शक तत्त्वांमधील या संदर्भातील दुरुस्ती होणे, त्यानंतर प्रत्यक्षात कायदा होणे आणि अखेरीस भारतीय राज्यांमधून अंमलबजावणीस सुरुवात होणे, यासाठी ही दशकाचा कालावधी जावा लागला, आता, १ एप्रिल २०१० पासून हा कायदा महाराष्ट्रात लागू झाला असून, त्याच्या संपूर्ण अंमलबजावणीसाठी तीन वर्षांचा कालावधी राज्यसरकारने हाती ठेवला आहे. म्हणजे १ एप्रिल २०१३ ला हा बालकाच्या शिक्षणहक्काचा कायदा महाराष्ट्रात पूर्णतेने लागू झालेला असेल.

कायदा अमलात आणण्यापूर्वी कायद्यातील प्रत्येक कलमाचा नेमका अर्थ विचारात घ्यावा लागतो, त्याचप्रमाणे कायद्याचा एकूण सूर, एकूण आशय लक्षात घ्यावा लागतो. महाराष्ट्रात याबाबतीत असंगतीच दिसून येते. वरच्या पातळीवरील नोकरशाही कायद्याचा अर्थ लावणे आणि तो अमलात आणणे याची जबाबदारी घेत असल्यामुळे 'कायदा लोकहिताचा अर्थ शासन हिताचा', अशी काहीशी परिस्थिती अलीकडे निर्माण होत आहे. उदाहरणार्थ, या कायद्याचा दुहेरी हेतू आपण सर्वांनीच लक्षात घ्यायला हवा. एक म्हणजे, देशातील कोणतेही बालक, कोणत्याही आर्थिक-सामाजिक वा कौटुंबिक कारणाने प्राथमिक म्हणजे समग्र जीवनाला पायाभूत असलेल्या शिक्षणापासून वंचित राहू नये; आणि दुसरे म्हणजे, सर्वच मुलांना समानतेने दर्जेदार शिक्षण प्राप्त व्हावे. या कायद्याचे क्रांतिकारक जर काही असेलच तर ते या दुहेरी हेतूंमध्ये, त्यांच्या प्रामाणिक पूर्ततेमध्येच आहे.

सर्व मुले शिकायची तर त्यांना घरांजवळ पुरेशा प्रमाणात शाळा हव्यात आणि त्या दर्जेदार शिक्षणाची समानतेने खात्री देणाऱ्या हव्यात. आणि हे असे घडवून आणण्याची जबाबदारी शासनाची मानली आहे. परंतु कायद्यातील कलमांचा अर्थ लावताना, महाराष्ट्रात नोकरशाहीने शाळा वाढविण्यापेक्षा, खाजगी मराठी शाळा बंद करण्याचाच घाट घातला तसेच, चांगल्या तुलनेने अधिक गुणवत्तेच्या सरकारी शाळांमध्ये मुलांना सक्तीने कोंबण्याचा डाव रचला. हा डाव प्रत्यक्षात उतरला तर महाराष्ट्रात प्राथमिक शिक्षणाचा पायाच कच्चा राहून,

मागास समाजालाच यात भरडून निघावे लागेल. समतेऐवजी विषमतेकडेच या कायद्याची वाटचाल होईल. हा धोका ओळखून समाजाने सजगतेने या कायद्याच्या अंमलबजावणीवर लक्ष ठेवले पाहिजे.

बालकाच्या शिक्षणहक्काचा हा कायदा अमलात आणताना तो नीटपणे अमलात येईल, याची 'सक्ती' कायद्याने सरकारला केली आहे. त्यासाठी सरकारने, 'प्राथमिक शिक्षणातील अनुभवी व तज्ज्ञ लोकांची समिती' नेमायची आहे, असे कायद्यातच लिहिले आहे. परंतु महाराष्ट्र सरकारने शासकीय नोकरवर्गालाच तज्ज्ञतेचे शिफारसपत्र दिलेले दिसते. त्यांनीच नियमावली तयार केली. अर्थातच तिचा सारा बाज शाळांवर व्यवस्थापकीय नि प्रशासकीय अटी लादण्याचाच आहे. त्यात निखळ 'शैक्षणिक' असे काहीच नाही. हा कायद्यातील अर्थाचा विपर्यासच आहे. नोकरशाही सदासर्वकाळ सर्वज्ञ असते असे सरकारने आता ठामपणे गृहीत धरलेले दिसते. वास्तविक पाहता, या कायद्याने विद्यार्थ्याला 'शिकण्याची' सक्ती आहे, पण त्यासाठी 'शाळेत जाण्याची'सक्ती करण्याचे कारण नाही. सरकारने प्राथमिक शिक्षणाच्या म्हणजे शाळेच्या आठवी इयत्तेच्या अखेरीस एक सार्वजनिक परीक्षा घ्यावी. कुणी कुठेही नि केव्हाही शिकावे. ही आठवी अखेरची किंवा प्रचलित दहावी अखेरची परीक्षा देऊन उत्तीर्ण व्हावे. ही विद्यार्थी 'शिकला' असल्याची पावती ठरू शकेल. उगीच प्रत्येकाला शाळेत जाण्याची, ती ही गुणवत्तेच्या सरकारी शाळेत जाण्याची सक्ती करण्याचे कारण नाही. अशा शाळेत अनेक वर्षे जाऊनही 'शिकणे' होतच नाही, असा अनुभव सार्वत्रिक आहे. त्यापेक्षा शाळेबाहेर, घरी वा अन्य पर्यायी व्यवस्थांमधून मुलांनी शिकायला कोणतीच हरकत असता कामा नये. केंद्र सरकारनेही या कायद्याबाबत अशीच भूमिका घेतली आहे आणि ती रास्त आहे, असे आम्हाला वाटते. शिक्षण मुक्त होण्याच्या शतकात शिक्षण बंदिस्त करण्याचा अट्टाहास, या कायद्याचे निमित्त करून घेणे. केव्हाही उचित ठरणारे नाही !


वार्षिक वर्गणी रुपये ४००/–

त्रैवार्षिक वर्गणी रुपये १०००/–

किंवा ग्राममंगल संस्थेला १०,००० रुपये वा अधिक देणगी द्या.

'८० जी' कलमाखाली आयकरातून सूट मिळवा आणि दरमहा 'शिक्षणवेध'चा अंक ही मिळवा.

वर्गणी / रोख / चेक / ड्राफ्टने 'ग्राममंगल' या नावाने पाठवू शकता.

मुंबई–पुणे बाहेरील चेकसाठी रुपये ३०/– वटणावळ आवश्यक.

ग्राममंगल

शिक्षणवेध

**पुणे कार्यालय :**

ग्राममंगल, गांधीभवन परिसर, अंधशाळेशेजारी,

कोथरुड, पुणे ४११ ०३८. संवाद : ०२० २५३८६६८७

## || व्यक्तिविशेष ||

**१ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची स्थापना झाली. या राज्याचे पहिले मुख्यमंत्री होते यशवंतराव चव्हाण, २०१२-१३ हे यशवंतरावांचे जन्मशताब्दी वर्ष ! आरंभीच्या काळात यशवंतरावांनी महाराष्ट्राच्या सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, सांस्कृतिक क्षेत्राची अत्यंत द्रष्टेपणाने आखणी केली. त्या अनुषंगाने योजना तयार केल्या, सामान्य माणूस विकासाच्या केंद्रस्थानी ठेवला. समाज विकास हा शिक्षण विकासाखेरीज शक्य नाही हे सूत्र यशवंतरावांनी जाणले, आणि प्राथमिक, माध्यमिक, महाविद्यालयीन व विद्यापीठीय शिक्षणाबरोबरच अनौपचारिक शिक्षणाची विविध दालने खुली केली. शिक्षणामध्ये सर्वार्थाने आधुनिकता आणण्याचा प्रयत्न त्यांनी केला. या शताब्दीनिमित्त महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण आणि महाराष्ट्रातील शिक्षणविकास यावर आधारित काही विचारांचा या लेखमालेद्वारे परिचय करून देण्याचा हा प्रयत्न. या मालिकेतील हा सहावा लेख.......**



# पत्र साहित्य - एक भावदर्शन

**अनिल जोशी**

१९६२ च्या १ मे ला म्हणजेच महाराष्ट्रदिनाच्या औचित्यास धरून ह. वि. मोटे प्रकाशन यांनी 'विश्रब्ध शारदा' या अत्यंत मौलिक ग्रंथाच्या पहिल्या खंडाचे प्रकाशन केले. यामध्ये १८१७ ते १९४७ या कालावधीतील सुमारे एक हजार पत्रांच्या संग्रहातील निवडक २९३ पत्रे या पहिल्या खंडात प्रसिध्द करण्यात आली आहेत. यातील काही पत्रे पूर्वप्रकाशित आहेत तर काही पूर्णत: अप्रकाशित आहेत आणि खाजगी स्वरूपाची आहेत. या पत्रसंग्रहास म्हणजे 'विश्रब्ध शारदा' या ग्रंथाच्या पहिल्या खंडास प्रख्यात विचारवंत दि. के. बेडेकर यांची दीर्घ प्रस्तावना आहे. या प्रस्तावनेच्या आरंभीच बेडेकरांनी या पत्रसाहित्यातून वाचकास कोणत्या गोष्टी, संदर्भ, पुरावे प्राप्त होतात याबद्दलचे विवरण केले आहे. बेडेकर लिहितात, 'या पत्रातून अनेक जणांची मनोगते आपणास कळतात. ही मनोगते पत्रातून व्यक्त झालेली असल्याने नुसती स्वगते नाहीत, तर कोणाला तरी उद्देशून पत्रलेखक आपले मन

उघड करीत आहे. येथे स्वभावांच्या आतले पदर स्पष्ट होताना दिसतात. सार्वजनिक जगणे स्वभावाला झाकणारे, त्याच्यावर मुखवटा चढविणारे असते. पत्र लिहतानाही मुखवटा असू शकतो, पण माणसामाणसांतील संबंध काही प्रसंगी असे तीव्र होतात, की माणसे स्वत:ला ओळखतात व दुसऱ्यालाही ओळखतात. ही ओळख सार्वजनिक जगण्याच्या चव्हाट्यावर घडू शकत नाही; ती खाजगी संबंधात पटते, निदान पटू शकते.

माणसाला हवी असते ती परस्पर संबंधातीत माणुसकी, आर्द्रता, सच्चेपणा. पण माणसाच्या स्वभावातच अशी गोम असते, की महत्त्वाकांक्षा, आत्मगौरव, आक्रमकता, मत्सर या दोषांनी संबंध दुखावतात, दुरावतात. कधी असेही घडते की, अचानक एकत्र आलेल्या माणसांची हृदये जुळतात, कोणते तरी दूरचे स्वप्न दोघेजण पाहू लागतात– सारे ताण, दुरावे, जुळणी व तरळणारी स्वप्ने ओझरती पाहता येतात. माणसांची स्वत:ला आणि इतरांना ओळख होणे, आणि माणसा–माणसांतील जिव्हाळा, आर्द्रता वाढणे, यामुळे सारे मानवी व्यवहार व्हायला हवेत'.

यशवंतराव चव्हाण यांची पत्रे या पार्श्वभूमीवर पाहिली. तर आपणास स्वतंत्र वाट दिसू लागते. राजकारण, समाजकारण, वैयक्तिक ताण–तणाव, मनातील सारी स्पंदने सांगताना आपल्या जिवाभावाचे कोणी हवे याचे भान त्यांना होते. राजकारणातील प्रासंगिक व्यवहार, पत्रद्वारे स्पष्ट करणे अनेकवेळा यशवंतरावांनी बाजूस ठेवले आहे. मैत्री केली पण त्यामध्ये हृदयाची भाषा कोणाशी बोलायची याची त्यांनी सातत्याने काळजी घेतली. राजकीय कारणास्तव केलेले परदेशाचे दौरे आणि त्यातील चर्चा. यांचे अहवाल आपल्या वरिष्ठांना सादर करतेवेळी घेतलेली काळजी या सर्व बाबी त्यांच्या राजकीय मुत्सद्देगिरीच्या सदरातील आहेत.

यशवंतरावांचे खाजगी पत्रलेखन त्यांच्या धर्मपत्नीस म्हणजे केवळ वेणूताईसाठीचे आहे. या पत्रलेखनामध्ये असंख्य तपशील, संदर्भ, वर्णन यांची रेलचेल आहे हे खरे. पण या सर्व पत्रांची रचना खाजगी, वैयक्तिक कमी, परंतु मानवी जीवनाचे, भूप्रदेशांचे, लोकजीवनाचे, संस्कृतीचे, साहित्याचे, त्या त्या प्रदेशातील इतिहासाचे, जीवनशैलीचे, उदयोग–व्यवसायांचे चित्रमय भाषेतील संवाद अशी आहे. यशवंतरावांचे खाजगी जीवन हे त्यांच्या घराशीच विशेषत: आपल्या पत्नीशीच अधिक घट्ट रीतीने बध्द आहे आणि हे असे असणे स्वाभाविकही आहे. पण त्यांच्या अशा लेखनामागे केवळ पती पत्नी यांचे भावनिक संबंधातील प्रसंगवर्णन असे नसून एक प्रकारचे खोलवरचे शल्य आहे ते म्हणजे, राजकीय यशापयशाच्या घाईगर्दीत वैवाहिक–कौटुंबिक जीवनास कित्येक वेळा बाजूस ठेवणे भाग पडते. वेणूताई आणि यशवंतराव यांचे असे एक अद्वैत जीवन म्हणूनच त्यांच्या पत्रलेखनाद्वारे आपणासमोर येते. वैवाहिक आयुष्याच्या पहिल्या टप्प्यामध्ये सुखी संसाराची स्वप्ने उभयतांनी प्रसंगी प्रत्यक्ष संवादाने रंगविणे असा क्वचित प्रकार आपणास अनुभवास येतो. घर आणि राजकारण यामध्ये अंतर राहणे हे अपरिहार्य असले तरी माणूस म्हणून, गृहसंसारातील जबाबदार व्यक्ती म्हणून, आपल्या जन्मदात्या आईच्या म्हणजे विठाईच्या जीवनातील एक अपेक्षापूर्तीचे माध्यम म्हणून यशवंतरावांनी आपल्या पत्नीशी केलेला पत्रसंवाद अत्यंत पारदर्शी आणि प्रसंगी भावस्पर्शी आहे.

यशवंतरावांची राजसत्तेतील वाटचाल स्वातंत्र्यानंतर लगेचच सुरू होते. तत्कालीन सत्ताधारी पक्षात म्हणजे राष्ट्रीय काँग्रेसमध्ये आरंभापासूनच त्यांच्या राजसत्तेस सुरूवात होते. आपल्या समोर असणारी सत्तास्पर्धेतील ताण–तणावांची ओझी वाहतानाच कराडवासी आपली पत्नी आणि आई यांच्याशी त्यांनी जोडलेला केवळ भावगर्भ असा सबंध न राहता आपण आपल्या कौटुंबिक

जबाबदाऱ्या समर्थपणे पूर्ण करण्यामध्ये अपुरे आहोत आणि परिणामत: घराकडील माणसांना विविध अडचणींना सामोरे जावे लागते आहे याची खोलवरची बोच स्पष्ट होते आहे. २६/७/१९४९ रोजी यशवंतरावांनी वेणूताईस आपल्या मुंबई वास्तव्याबाबत स्वतंत्र पत्र पाठवून आपल्या व्यथा आणि कथा अत्यंत मोजक्या पण कमालीच्या बोलक्या शब्दातून व्यक्त केल्या आहेत.

ते लिहितात,''मी सध्या सकाळ संध्याकाळ नाना कुंटे यांचेकडे जेवतो. त्यांनी फारच आग्रह केला म्हणून जात आहे. मनातून मात्र अस्वस्थ आहे. नात्यातली इथली मंडळी भेटून जेवायला बोलावतात. बहुधा तू त्यांना लिहिले असावेस. परंतु या लोकांना मी साफ नकार दिला. या आठवड्यात तुमची पैशाची ओढाताण झाली असेल. गौरीहरकडे कोणाला तरी पाठवून शंभर रूपये आणावेत. काय करीत आहात ते कळवा.''

सत्तास्थानाशी अत्यंत जवळचे संबंध असणारे यशवंतराव आपल्या पत्नीला आपल्या घरातील जबाबदारी स्वीकारायला सांगतात, ही एक बाजू आपल्या समोर येते पण त्याचबरोबर सत्ता असून देखील वाममार्गाने येणाऱ्या धनसंपदेस त्यांनी कोसो दूर ठेवले आहे, हे त्यांचे होणारे स्वभावदर्शन आपणास हलवून जाते. भाषेद्वारे व्यक्त होणारा समंजसपणा हे दुसरे वेगळेपण समोर येते.

वेणूताई आणि यशवंतराव यांच्या नात्यामध्ये असणारा गहिरेपणा सर्वप्रकारच्या औपचारिकपणास बाजूस सारतो. ते लिहितात ''तू माझ्यासाठी एक गोष्ट शिकावीस की ज्यावेळी तुझ्यापासून दूर जाण्यास निघतो त्या दिवशी अकारण हट्टीपणा किंवा मी नाराज होईन असे काही करू नकोस. मला त्यामुळे मानसिक त्रास होतो. माझा माझ्यावरचा ताबा सुटतो. या चिडखोरीची माझी मलाच हल्ली भीती वाटू लागली आहे.या चिडखोर स्वभावामुळे मीच माझ्या जीवाचे काही बरे-वाईट करीन की काय इतकी हल्ली मला धास्ती वाटू लागली आहे. माझ्या इतका तू ही हट्टीपणा करतेस. त्यामुळे ज्याच्याबद्दल नंतर पश्चाताप होतो अशा गोष्टी घडतात.''

'' या महिन्यात तुमचेकडील पैसे संपले असतील याची मला कल्पना आहे त्या संबंधात काहीतरी व्यवस्था करण्याचे नादात आहेच. पैशाचे काम फार सावकाश होते. गोष्टी आपल्या इच्छेप्रमाणे होत नाहीत. त्यामुळे थोडा त्रास होतो. पण हे चालायचे''.

यशवंतरावांनी आपल्या सांसारिक जीवनातील ओढगस्तपणाचे चित्र स्पष्ट करताना स्वत:च्या मनोवस्थेचे उलगडलेले पदर आणि स्वपत्नीच्या मानसिक स्थितीवर होणारे परिणाम लक्षात घेऊन घातलेली फुंकर यातून आपणास त्यांच्यातील उलघाल जाणवू लागते. आर्थिक ओढाताण आणि त्यातून होणारी मानसिक अस्वस्थताही उभयपक्षी समान असल्याचे जाणवतेच व यशवंतरावांसारख्या माणसास ओढाताणीतून वाटयास आलेली हतबलता बरेच काही सांगून जाते. सत्ता बोट धरून त्यांना पुढे नेते आहे आणि अत्यंत निस्पृह जीवनशैलीमुळे आपल्याच आपल्या मानसिक दोलायमानाची भीती वाटते, याची स्पष्ट कबुली देताना यशवंतराव आपल्यातीलच वाटायला लागतात.

यशवंतरावांच्या जीवनात वेणूताईचा प्रवेश ही नियतीची करामत आहे, पण स्वभावातील समांतर धागे हे त्यांच्या जीवनातील अत्यंत गहिरेपण सांगणारे आहेत. पत्नीच्या आजारपणाने संसार मार्गावरचा आरंभीचा काळच अत्यंत भेदक प्रसंगांनी भरलेला आहे. जे लाभले त्याचा स्वीकार करायचा आणि आता वेणूताई आणि यशवंतराव यांच्यातील मनोव्यापारातील गाठी अधिक घट्ट होत जाणे आणि अंतिमत: त्यामध्ये अद्वैताचा आधार, निर्माण होणे याची साक्ष त्यांच्या पत्रलेखनाने अधिक स्पष्ट केलेली आहे. एका पत्रात त्यांनी वेणूताईस उद्देशून वापरलेली भाषा आणि त्यामागचे भाव अत्यंत हेलावून सोडणारे

आहेत.

''तू मनाची हुशारी ठेवीत नाहीस. त्यामुळे अतिशय चिंता वाटते. तू मनाचा धीर ठेवून प्रकृती सुधारली पाहिजेस. मी असा भटकत राहतो यात मला समाधान का आहे? परंतु हे सर्व न केले तर कसे चालेल? त्यामुळे नाईलाजास्तव हिंडत आहे. तुझ्या आजारपणात सुध्दा दूर जावे लागत आहे. मी याबाबत चूक करतो आहे असे मला वारंवार वाटते. पण दुसरा मार्गच मला दिसत नाही. असहाय्यपणे हे सर्व करावे लागते आहे.

तू आजारातून बरे व्हावेस याच्याइतकी प्रिय गोष्ट माझ्या आयुष्यात उरलेली नाही. तुझ्याकरता नव्हे निदान माझ्यासाठी तुला बरे होणे जरूर आहे. किरकोळ गोष्टींकडे दुर्लक्ष कर. मन आनंदी ठेवण्याचा प्रयत्न कर. आनंदी मन हे निम्मे औषध आहे''.

वयाच्या चाळीशीच्या आसपास यशवंतरावांच्या वैयक्तिक जीवनपटावर उमटलेले हे प्रसंग आणि त्यातून स्वत: आणि स्वत:च्या पत्नीस निभावून नेण्यासाठी त्यांची झालेली ओढाताण या साऱ्या गोष्टी अत्यंत बोलक्या आहेत. आपल्या पत्नीस आलेले आजारपण आणि त्यामुळे अनेक प्रसंगी निर्माण झालेले दूरत्व यशवंतरावांसारख्या भावनाशील व्यक्तीस पेलणे कठीण कसे झाले, याचे दर्शन घडविणारे हे पत्रलेखन आहे. प्रवासामध्ये ऐन ताणण्यात पत्नीची सोबत नाही याचे शल्य फारच खोलपर्यंत पोहचते आणि अशा प्रवासात आपल्याच मनाची समजूत घालून पत्नी सहवास गृहीत धरायचा आणि संवाद करायचा आणि क्षणार्धातच भानावर यायचे असे मानसिक हेलकावे या पत्रातून समोर येतात. दूरान्वयाने का होईना आपल्या पत्नीस आपल्या प्रवासातील विविध स्थळांची, माणसांची, लोकसंस्कृतीची, तेथील इतिहासाची, अनुभवास येणाऱ्या माणसामाणसातील संबंधातील ओळख करून दयायची. या बाबतीत यशवंतराव सतत जागृत आहेत. त्यासाठी त्यांनी वापरलेली भाषा, केलेला अभ्यास, त्यांची अभिरूची, रसिकता, माणसांची मने वाचण्याची स्वतंत्र शैली म्हणजे त्यांच्यातील मुत्सद्दी राजकारणी विरून जातो आणि उरतो जाणकार आणि लालित्यपूर्ण भाषेत मनाची स्पंदने व्यक्त करणारा साहित्यिक !

१६/९/१९५२ रोजी राजकोट येथून त्यांनी वेणूताईशी केलेला पत्र संवाद म्हणजे त्यांचे साहित्यप्रेमच व्यक्त होते आहे. ''बडोदा ते राजकोट एक तासाचा प्रवास केव्हा झाला ते कळलेच नाही. पांढऱ्याशुभ्र मेघराशीतून प्रवास करताना आकाशाच्या पोकळीतून कोणी 'प्रवासी हिमालय' इतस्तत: फिरतो आहे असे वाटते सौराष्ट्राचे पंतप्रधान श्री. ढेबरभाई हे बडोदयापासून आमच्याबरोबर होते. श्री. ढेबर यांची माझी प्रथमच ओळख झाली. आज सर्व दिवसभर या माणसाच्या संगतीत होतो. अत्यंत विनयशील आणि मृदू स्वभावाचे गृहस्थ आहेत ते. आपला मुद्दा सहजासहजी न सोडण्याइतके कणखरही दिसले. मनुष्यस्वभावाची पारख करण्याची धूर्तताही असली पाहिजे. परंतु हा गुण कोणाच्या लक्षात येऊ नये याची ते काळजी घेत आहेत की काय असे वाटण्याइतके शब्द मोजून तोलून धीमे धीमे बोलणारे चालणारे गृहस्थ आहेत''.

प्रवासात प्रसंगाने बरोबर आलेल्या एका मोठ्या व्यक्तीचे यशवंतरावांना झालेले स्वभावदर्शन आणि वैशिष्ट्य त्यांनी आपल्या पत्नीसाठी अत्यंत उचित प्रकारे शब्दबध्द करावे यात यशवंतरावांच्यातील माणसे वाचणारा माणूस आपल्या समोर येतो. श्रीनगरहून ५ जून १९५६ रोजीच्या एका पत्रात त्यांना सृष्टीचे घडलेले सौंदर्यदर्शन मांडताना यशवंतराव स्वत:त किती आणि कसे रमतात हे जाणवते.

''खळखळ करीत नदीचे पाणी खाली जात असते त्याच्या काठाने वृक्षराजीतून कर्णमधूर आवाज करीत असलेल्या पक्ष्यांची संगत करीत आपण वरवर जात असतो. लांब हिमाच्छादित शिखरे दिसत

असतात. कुणीतरी आपणाला वरवर चालवत आहे असे वाटते. या अचूक अनुभवाची बिजली जीवनात नवचैतन्य देते. ..... माझ्या मानसिक यातना कुठल्या कुठे गुप्त झाल्या. फार वर्षांनी मला हा निर्भेळ आनंद घेता आला. उंचउंच पर्वतरागांच्या कोंदणात (पेहलगांव) हे ठिकाण आहे. बर्फाने अच्छादलेली त्यांची पांढरीशुभ्र शिखरे वर, त्याच्याखाली नदी काठापर्यंत आलेली उंच उंच झाडांची मनोहर दरी, खळखळ करीत जाणारा स्वच्छ असा नदीचा प्रवाह आणि त्याच्या काठावर हिरव्यागार पठारावर लहान लहान तंबू टाकून आरामात राहणाऱ्या प्रवाशांची छावणी, डोळे भरून हे दृष्य मी पाहून घेतले आणि डोळे झाकून काश्मिरच्या या वातावरणाचे चित्र मनावर कोरून ठेवण्याचा प्रयत्न केला''.

यशवंतराव यांचा हा जीवनप्रवास स्वत:च्या पत्नीला आणि पत्र वाचकाला सहप्रवासी बनविण्यात समर्थ करणारा आहे. यशवंतरावांचे मन राजकारणी व्यक्तीचे, नेत्याचे का संवेदनशील साहित्यिकाचे याचा संभ्रम पडावा असे कित्येक वेळा वाटू लागते.

आपल्या स्वभावाचे, आपल्या निष्ठांचे, आपल्या संस्कृतीप्रेमाचे, आपल्या कुटुंबप्रेमाचे, आपल्या नेत्याबद्दलच्या अभिमानाचे यशवंतरावांनी या पत्रसाहित्यातून दर्शनच घडविले आहे. हे आपणास पटू लागते. बंगलोर येथील रामन इन्स्टिट्यूट पाहताना त्यांच्या मनास आलेले आनंदाचे भरते ते पत्राद्वारे व्यक्त करतातच पण त्याचबरोबर रामन यांच्या मुखातून देशनेत्याबद्दल बाहेर आलेल्या अनुद्‌गाराबद्दल तीव्र क्रोध देखील व्यक्त करतात.

''तर रामन यांच्या तोंडून 'रामन रेज' बद्‌दलची माहिती ऐकताना कालिदासाच्या तोंडून शाकुंतल ऐकण्याचा आनंद झाला. इथपर्यंत सर्व ठीक होते परंतु म्युझियम दाखविण्यासाठी जेव्हा सर्वांच्या घोळक्यातून (ते) हिंडू लागले आणि त्यांच्याविषयाशी संबंध नसलेल्या विषयावर विशेषत: देशातील अंतर्गत राजकीय प्रश्नावर आणि परराष्ट्रीय धोरणावर भराभर आणि भरमसाठ बोलू लागले तेव्हा ते सर्व न ऐकता चालू लागावे असे मनात येऊन गेले. या बोलण्याच्या ओघात पंडित नेहरूंबद्दल फार वाईट बोलले. परक्या देशाचे लोक हजर असताना त्यांचे ते बोलणे मला रुचले नाही''. देशाभिमानाचे हे जाज्ज्वल्य प्रेम ही यशवंतरावांची खासियत होती.

देश–विदेशाचा प्रवास हा यशवंतरावांनी एकट्याने केला. पत्नी वेणूताई यामध्ये सहप्रवासी नव्हत्या. त्या देहाने त्यांच्यासमवेत नाहीत पण मनाने बरोबर आहेत या विचारात यशवंतराव समाधान मानत. तरी देखील राजकारणाच्या अशा धकाधकीत त्यांनी त्यांच्या अनुभवांचे केलेले टिपण हे सर्व वेणूताईसाठीचेच आहे.

त्यामुळे परदेश प्रवासात रात्रीच्या शांत प्रहरी वेणूताईस समोर ठेवून आणि 'प्रिय सौ. वेणूस'' असे संबोधून पत्रारंभ करणे हे यशवंतरावांनी सांभाळले आहे. या नोंदी जरी जागतिक राजकारण, अर्थकारण, धोरण या संबंधातील असल्या तरी त्यामागचा उद्देश स्पष्ट करताना ते लिहितात, ''महत्त्वाच्या जागी काम करीत असलेल्या लोकांच्या विचारांची हे लिहिताना उजळणी होते. आणि नोंदही राहते एवढाच हे सर्व लिहीण्याचा उद्देश आहे.

प्रवास, प्रवासातील घटना, अनुभूती, नियोजित कार्य, त्यातील समस्या आणि उकल, नाना देशात भेटलेली नाना प्रकारची, नाना स्वभावाची माणसं, त्यांच्याशी झालेल्या चर्चा, त्याचे निष्कर्ष, जागतिक अर्थकारण, राजनीती, देशाची भूमिका हे सर्व यशवंतरावांच्या विदेशातील पत्र लेखनात अनुभवास येते. पत्रस्वरूपात केलेल्या या सर्व नोंदी म्हणजे यशवंतरावांनी आपल्या राजकीय जीवनातील केलेले प्रवासवर्णन आहे. ते जितके वैविध्यपूर्ण आहे तितकेच प्रसंगी अंतर्मुख करायला लावणारे आहे. आपली माणसं आपली किती याची ओळख आपणास किती खरी आणि किती भासमान ठरली याचेही यातून

दर्शन घडते.

सत्याधिष्ठित वर्णनाने झालेले यशवंतरावांचे पत्रलेखन हे मराठी साहित्यामध्ये वेगळेपण आहे हे खरे पण राजनितीज्ञता, मुत्सद्दीपणा, सत्तास्पर्धा, डाव-प्रतिडाव या सर्वांना वगळून देखील यशवंतरावांचे हे पत्रलेखन महाराष्ट्रातील सुजाण साहित्यिक राजकारणी नेत्याचे लेखन आहे.

यामध्ये राजकारणाचा भाग किती यापेक्षा नेत्याच्या मनाची स्पंदने आणि त्यांना व्यक्त करण्यासाठी यशवंतरावांनी वापरलेली लेखणी हे मराठीतील स्वतंत्र असे ललित साहित्याचे धन आहे.

■■■

## शहाणपणाची गोष्ट १

### मराठी शाळा

सरकारला वाटले शाळेत इंग्रजी शिकवण्यापेक्षा इंग्रजी शाळाच काढाव्यात. मग या शाळांना मुले हवीत म्हणून सरकारने खाजगी शाळा बंद करण्याचे फर्मान काढले पण काही मुले, सरकारी मराठी शाळांत जातच होती. मग तेथे वाईट शिकवण्याचे, सरकारने शिक्षकांना प्रशिक्षण दिले आता तीही मुले इंग्रजी शाळांकडे वळताहेत!

ब्रिटीश सरकारने लंडनमध्ये मराठी शाळा काढल्याचे वृत्त आहे! शहाणपण म्हणाले.

■■■

## शहाणपणाची गोष्ट २

### जागरूक पालक

एक पालक जागरूक होता; त्याने मुलाला पहिलीतच शिकवणी लावली. त्यामुळे शेजारचा पालक जास्तच जागरूक झाला. त्याने मुलाला बालवाडीतच क्लासला घातले. तिसरा एक पालक आणखीनच जागरूक झाला. त्याने शिकवणीच्या वर्गातच आपले मूल जन्माला घातले. चौथ्या पालकाने जागरूकतेत आघाडी घेऊन आईच्या पोटातच मुलाला बाहेरून शिकवणी लावली

मुले जन्माला येण्याआधी शिकवणी जन्माला आली आहे! शहाणपण म्हणाले.

**सदा शहाणे**

# बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९

**शिक्षणहक्कावर चर्चा करण्याआधी शिक्षणहक्क कायदा म्हणजे काय? तो नेमके काय सांगतो हे पाहणे योग्य ठरेल. वाचकांच्या सोईसाठी व संदर्भासाठी आम्ही मुळातील सरकार मान्य शिक्षणहक्क कायदा यथामूल 'बालकांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९'या राज्यसरकारने प्रसिध्द केलेल्या माहितीपुस्तिकेतून प्रसिध्द करीत आहोत.**

नवी दिल्ली, दिनांक २७ ऑगस्ट, २००९ संसदेच्या पुढील अधिनियम यास राष्ट्रपती यांची संमती २६ ऑगस्ट, २००९ रोजी मिळाली आणि तो याद्वारे सर्वसाधारण माहितीसाठी प्रसिध्द करण्यात आला आहे.

**बालकांना मोफत व सक्तीचे शिक्षण मिळण्याचा हक्क अधिनियम, २००९**

२००९ चा अधिनियम क्रमांक ३५

सहा ते चौदा वयोगटातील सर्व बालकांकरिता मोफत व सक्तीच्या शिक्षणाची तरतूद करण्याकरिता अधिनियम भारतीय गणराज्याच्या साठाव्या वर्षी संसदेद्वारे तो पुढीलप्रमाणे अधिनियमीत होवो :–

**प्रकरण १. प्रारंभिक**

**संक्षिप्त नाव, विस्तार व प्रारंभ**

१. ♦ या अधिनियमास, बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९ असे म्हणावे.

♦ तो, जम्मू व काश्मीर राज्याखेरीज करून संपूर्ण भारतास लागू आहे.

♦ तो केंद्र सरकार राजपात्रातील अधिसूचनेद्वारे नियम करील अशा दिनांकास अंमलात येईल.

व्याख्याः

२. ♦ या अधिनियमात, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,

(क) 'समुचित शासन' याचा अर्थ –

(एक) केंद्र सरकारने किंवा विधानमंडळ नसलेल्या संघ राज्यक्षेत्राच्या प्रशासकाने स्थापन केलेल्या,

त्याची मालकी किंवा नियंत्रण असलेल्या संबंधात केंद्र सरकार असा आहे.

(दोन) उपखंड (एक) मध्ये निर्दिष्ट केलेल्या शाळेखेरीज,

(क) राज्य क्षेत्रात स्थापन केलेल्या अन्य शाळेच्या संबंधात, राज्य शासन असा आहे.

(ख) 'प्रतिव्यक्ती शुल्क' याचा अर्थ, शाळेने

अधिसूचित केलेल्या शुल्काखेरीज अन्य कोणत्याही प्रकारची देणगी किंवा अंशदान किंवा अधिदान असा आहे.

(ग) 'बालक' याचा अर्थ, सहा ते चौदा वर्ष वयोगटातील मुलगा किंवा मुलगी असा आहे.

(घ) 'उपेक्षित गटातील बालक' याचा अर्थ, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास वर्गातील किंवा सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक, भौगोलिक, भाषा, लिंग यामुळे उपेक्षित असलेल्या इतर गटातील किंवा समुचित शासनाने अधिसूचनेद्वारे विनिर्दिष्ट केलेले असतील अशा अन्य घटकातील बालक, असा आहे.

(ड) 'दुर्बल घटकातील बालक' याचा अर्थ, ज्यांचे वार्षिक उत्पन्न समुचित शासनाने अधिसूचनेद्वारे विनिर्दिष्ट केलेल्या किमान मर्यादेहून कमी आहे, अशा माता–पित्यांचा किंवा पालकांचा बालक, असा आहे.

(च) 'प्राथमिक शिक्षण' याचा अर्थ, पहिली ते आठवी वर्गापर्यंत शिक्षण असा आहे.

(छ) 'एखाद्या बालकाच्या संबंधात 'पालक' याचा अर्थ, त्या बालकाची देखभाल व ताबा असलेली व्यक्ती, असा आहे आणि त्यामध्ये, नैसर्गिक पालकाचा, किंवा न्यायालयाद्वारे किंवा कायद्याद्वारे नियुक्त केलेल्या किंवा घोषित केलेल्या पालकाचा समावेश होतो.

(ज) 'स्थानिक प्राधिकरण' याचा अर्थ, कोणत्याही नावाने बांधण्यात येणारी महानगरपालिका किंवा नगरपरिषद किंवा जिल्हा परिषद किंवा नगर पंचायत किंवा पंचायत असा आहे. आणि त्यामध्ये शाळेवर प्रशासकीय नियंत्रण असलेल्या, किंवा कोणत्याही शहरात, नगरात किंवा गावात स्थानिक प्राधिकरण म्हणून कार्ये करण्यासाठी त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्याद्वारे किंवा त्याअन्वये अधिकार प्रदान केलेले असे अन्य प्राधिकरण किंवा निकाल याचा समावेश होतो.

(झ) 'राष्ट्रीय बाल हक्क संरक्षण आयोग' याचा अर्थ, बाल हक्क संरक्षण आयोग अधिनियम, २००५ (२००६ चा ४) याच्या कलम ३ अन्वये स्थापन केलेला राष्ट्रीय बाल हक्क संरक्षण आयोग. असा आहे.

(त्र) 'अधिसूचना' याचा अर्थ, राजपत्रात प्रसिद्ध केलेली अधिसूचना असा आहे.

(ट) 'माता–पिता' याचा अर्थ, एकतर बालकाचा नैसर्गिक किंवा सावत्र किंवा दत्तक पिता किंवा बालकाची माता असा आहे.

(ठ) 'विहित' याचा अर्थ, या अधिनियमानुसार केलेल्या नियमाद्वारे विहित केलेले, असा आहे.

(ड) 'अनुसूची' याचा अर्थ, या अधिनियमाला जोडलेली अधिसूची असा आहे.

(ढ) 'शाळा' याचा अर्थ, प्राथमिक शिक्षण देणारी कोणतीही मान्यताप्राप्त शाळा, असा आहे आणि त्यामध्ये

(एक) समुचित शासनाने किंवा स्थानिक प्राधिकरणाने स्थापन केलेली शाळा, त्याची मालकी किंवा नियंत्रण असलेली शाळा,

(दोन) समुचित शासनाकडून किंवा स्थानिक प्राधिकरणाकडून शाळेसाठीचा पूर्णतः किंवा अंशतः खर्च भागविण्यासाठी साहाय्य किंवा अनुदाने घेणारी अनुदानित शाळा.

(तीन) विनिर्दिष्ट प्रवर्गाची शाळा आणि

(चार) समुचित शासनाकडून किंवा स्थानिक प्राधिकरणाकडून शाळेसाठीचा खर्च भागविण्यासाठी कोणत्याही प्रकारचे साहाय्य किंवा अनुदाने न घेणारी विनाअनुदानित शाळा, यांचा समावेश होतो.

(ण)'चाळणी प्रक्रिया' याचा अर्थ, स्वैर पद्धतीखेरीज एकापेक्षा दुसऱ्यास अधिक पसंती देऊन एखाद्या बालकाच्या प्रवेशासाठी असलेली निवड पद्धत असा आहे.

(त) एखाद्या शाळेच्या संबंधात 'विनिर्दिष्ट प्रवर्ग' याचा अर्थ म्हणून ओळखली. केंद्रिय विद्यालय, नवोदय विद्यालय, सैनिकी या नावाची शाळा किंवा समुचित शासनाने अधिसूचनेद्वारे विनिर्दिष्ट केलेली असेल अशी, विशिष्ट स्वरूप असलेली इतर कोणतीही शाळा, असा आहे.

(थ) 'राज्य बाल हक्क संरक्षण आयोग' याचा अर्थ बाल हक्क संरक्षण आयोग, २००५ (२००६ चा ४) यांच्या कलम ३ अन्वये स्थापन केलेला राज्य बाल हक्क संरक्षण आयोग, असा आहे.

**प्रकरण २.**

**मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार**

बालकास मोफत व सक्तीचे शिक्षण मिळण्याचा अधिकार

३. ♦ सहा तो चौदा वर्ष वयोगटातील प्रत्येक बालकास प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत नजीकच्या शाळेत मोफत व सक्तीचे शिक्षण मिळण्याचा अधिकार असेल.

♦ पोटकलम (१) च्या प्रयोजनासाठी कोणतेही बालक, ज्यामुळे त्याला किंवा तिला प्राथमिक शिक्षण घेण्यापासून आणि ते पूर्ण करण्यापासून प्रतिबंध होईल, असे कोणत्याही प्रकारची फी किंवा आकार किंवा खर्च देण्यास दायी असणार नाही. परंतु विकलांग व्यक्तीसाठी (समान संधी, हक्कांचे संरक्षण आणि सहभाग) अधिनियम, १९९५ (१९९६ चा १) यांच्या कलम २ च्या खंड (च) मध्ये व्याख्या केलेल्या विकलांगतेने पीडित असलेल्या बालकास, उक्त अधिनियमाच्या प्रकरण पाचव्या तरतुदीनुसार मोफत शिक्षण व सक्तीचे प्राथमिक शिक्षण मिळण्याचा अधिकार असेल.

४. सहा वर्षापेक्षा अधिक वयाच्या बालकाने कोणत्याही शाळेत प्रवेश घेतला नसेल किंवा प्रवेश घेतला तरी त्याला किंवा तिला आपले प्राथमिक शिक्षण पूर्ण करता आले नसेल तेव्हा, त्याला किंवा तिला, त्याच्या किंवा तिच्या वयाला योग्य असलेल्या वर्गात प्रवेश देण्यात येईल.

परंतु एखाद्या बालकास, त्याच्या किंवा तिच्या वयाला योग्य असलेल्या वर्गात थेट प्रवेश दिलेला असेल तेव्हा, त्याला किंवा तिला इतर बालकांबरोबरच विहित करण्यात येईल, अशा रितीने आणि अशा कालमर्यादेच्या आत विशेष प्रशिक्षण घेण्याचा हक्क असेल.

परंतु आणखी असे की, प्राथमिक शिक्षणासाठी ज्या बालकास अशा रितीने प्रवेश देण्यात आलेला आहे ते बालक, चौदा वर्षे वयानंतर सुध्दा प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत मोफत शिक्षण मिळण्यास हक्कदार असेल.

दुसऱ्या शाळेत दाखला हस्तांतरित करण्याचा हक्क

५. ♦ एखाद्या शाळेत, प्राथमिक शिक्षण पूर्ण करण्याबद्दलची तरतूद नसेल त्याबाबतीत, एखाद्या बालकास, त्याचे किंवा तिचे प्राथमिक शिक्षण पूर्ण करण्यासाठी, कलम २ च्या खंड (ढ) चे उपखंड (तीन) आणि (चार) यामध्ये विनिर्दिष्ट केलेली शाळा वगळून, इतर कोणत्याही शाळेत दाखला हस्तांतरित करून मागण्याचा हक्क असेल.

♦ एखाद्या बालकास, कोणत्याही कारणामुळे एकतर राज्यांतर्गत किंवा राज्याबाहेरील एका शाळेतून दुसऱ्या शाळेत जाणे आवश्यक असेल त्याबाबतीत, अशा बालकास, त्यांचे किंवा तिचे प्राथमिक शिक्षण पूर्ण करण्यासाठी कलम २ च्या खंड (ढ) चे उपखंड (तीन) आणि (चार) यांमध्ये विनिर्दिष्ट केलेली शाळा वगळून, इतर कोणत्याही शाळेत दाखला हस्तांतरित करून मागण्याचा हक्क असेल.

♦ अशा अन्य शाळेत प्रवेश घेण्यासाठी ज्या शाळेत अशा बालकाने शेवटी प्रवेश घेतला होता त्या शाळेचा मुख्याध्यापक किंवा प्रभारी ताबडतोब हस्तांतरित प्रमाणपत्र देईल.

परंतु हस्तांतरण प्रमाणपत्र सादर करण्यात होणारा विलंब हा अशा अन्य शाळेतील प्रवेशासाठी विलंबाचे किंवा प्रवेश नाकारण्याचे कारण ठरणार नाही. परंतु आणखी असे की हस्तांतरण प्रमाणपत्र देण्यास विलंब करण्याऱ्यास शाळेस मुख्याध्यापक किंवा प्रभारी हा, त्याला किंवा तिला लागू असलेल्या सेवा नियमांनुसार, शिस्तभंगाची कारवाई केली जाण्यास पात्र असेल.

**प्रकरण ३.**

**समुचित शासन, स्थानिक प्राधिकरण आणि माता-पिता यांची कर्तव्ये**

समुचित शासन आणि स्थानिक प्राधिकरण यांची शाळा स्थापन

६. या अधिनियमाच्या तरतुदीची अंमलबजावणी करण्यासाठी, समुचित शासन आणि स्थानिक प्राधिकरण, विहित करण्यात येईल. अशा क्षेत्रात किंवा नजीकच्या क्षेत्राच्या हद्दीत, जेथे कोणतीही शाळा स्थापन केलेली नसेल तेथे, या अधिनियमाच्या प्रारंभापासून तीन वर्षांच्या कालावधीच्या आत अशी शाळा स्थापन करतील.

**आर्थिक व इतर जबाबदाऱ्या वाहून घेणे**

७. ♦ केंद्र सरकार आणि राज्य शासन यांची या अधिनियमाच्या तरतुदींची अंमलबजावणी करण्यासाठी निधी पुरविण्याची बरोबरीची जबाबदारी राहील.

♦ केंद्र सरकार या अधिनियमाच्या तरतुदीची अंमलबजावणी करण्यासाठी भांडवली व आवर्ती खर्चाचे अंदाज तयार करील.

♦ केंद्र सरकार, राज्य शासनाशी विचारविनिमय करून, वेळोवेळी निर्धारित करीत अशी पोटकलम (२) मध्ये निर्दिष्ट केलेल्या खर्चाची टक्केवारी, महसुलाकरिता साहाय्यक अनुदान म्हणून राज्य शासनांना देईल.

♦ केंद्र सरकार कोणत्याही राज्य शासनाकरिता तरतूद करावयाच्या अतिरिक्त साधन संपत्तीची गरज तपासण्यासाठी अनुच्छेद २८० च्या खंड (३) च्या उपखंड (घ) अन्वये वित्त आयोगाकडे निर्देश करण्याकरिता राष्ट्रपतींना विनंती करू शकेल. जेणेकरून, उक्त राज्य शासनांना या अधिनियमाच्या तरतुदींची अंमलबजावणी करण्यासाठी आपल्या हिश्श्याच्या निधीची

तरतूद करता येईल.

- पोट कलम (४) मध्ये काहीही अंतर्भूत केलेले असले तरी, राज्य शासन, पोटकलम (३) अन्वये राज्य शासनाला केंद्र सरकारकडून देण्यात आलेल्या रकमा आणि त्याची इतर साधनसंपत्ती विचारात घेऊन, या अधिनियमाच्या तरतुदींच्या अंमलबजावणीसाठी निधी देण्यास जबाबदार असेल.
- **केंद्र सरकार –**

(क) कलम २९ अन्वये विनिर्दिष्ट केलेल्या शिक्षण प्राधिकरणाच्या साहाय्याने राष्ट्रीय अभ्यासक्रमाची एक रुपरेषा विकसित करील.

(ख) शिक्षकांच्या प्रशिक्षणासाठी मानके विकसित करील आणि त्याची अंमलबजावणी करील.

(ग) नवनवीन कल्पना, संशोधन, नियोजन आणि याकरिता राज्य शासनाला तांत्रिक साहाय्य व साधनसंपत्ती पुरवेल.

## समुचित शासनाची कर्तव्ये

८. समुचित शासन

(क) प्रत्येक बालकास मोफत आणि सक्तीने प्राथमिक शिक्षण देईल :

परंतु, समुचित शासनाने किंवा स्थानिक प्राधिकरणाने स्थापन केलेल्या, त्याची मालकी, नियंत्रण असलेल्या किंवा त्यांच्याकडून प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे पुरविण्यात आलेल्या निधीतून मोठ्या प्रमाणात वित्त पुरवठा केलेल्या शाळेवरील, अन्य शाळेत एखाद्या बालकाच्या प्रवेश त्याच्या किंवा तिच्या माता–पित्याने किंवा यथास्थिती, पालकाने घेतलेला असेल त्याबाबतची असा बालक किंवा त्याचे किंवा तिचे माता–पिता किंवा पालक अशा अन्य शाळेत बालकाच्या प्राथमिक शिक्षणावर केलेल्या खर्चाच्या प्रतिपूर्तीची मागणी करण्यास हक्कदार असणार नाही.

**स्पष्टीकरण :–** 'सक्तीचे शिक्षण' या संज्ञेचा अर्थ, पुढील गोष्टी करण्याचे समुचित शासनाचे आबंधन, असा आहे.

(एक) सहा ते चौदा वर्षे वयोगटातील प्रत्येक बालकास मोफत प्राथमिक शिक्षण

(दोन) सहा ते चौदा वर्षे वयोगटातील प्रत्येक बालकाच्या सक्तीच्या प्रवेशाची, हजेरीची आणि त्याचे प्राथमिक शिक्षण पूर्ण केले जात असल्याची खात्री करणे.

(ख) कलम ६ मध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे, नजीकच्या शाळेच्या उपलब्धतेची सुनिश्चिती करणे :

(ग) दुर्बल घटकातील बालकास आणि तसेच, उपेक्षित गटातील बालकास कोणत्याही कारणावरून प्राथमिक शिक्षण घेण्यापासून भेदभाव केला जाणार नाही आणि ते पूर्ण करण्यापासून त्यास प्रतिबंध केला जाणार नाही, याची सुनिश्चिती करणे.

(घ) पायाभूत सुविधा आणि शाळेची इमारत, शिक्षण कर्मचारी वर्ग व अध्यापन साधनसामग्री पुरविणे.

(ड) कलम ४ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या विशेष प्रशिक्षण सुविधेची तरतूद करणे.

(च) प्रत्येक बालकाच्या शाळा प्रवेशाचे, हजेरीचे आणि त्याचे प्राथमिक शिक्षण केले जात असल्याचे संनियंत्रण करणे व त्याबाबतची खात्री करणे.

(छ) अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केलेले मानके व निकष यांना अनुरुप असणारे उत्तम दर्जाचे प्राथमिक शिक्षण दिले जात असल्याबद्दलची खात्री करणे.

(ज) प्राथमिक शिक्षणासाठी अभ्यासक्रम आणि स्वाध्याय पाठ्यक्रम वेळेवर विहीत करण्याची खातरजमा करणे; आणि

(झ) शिक्षकांसाठी प्रशिक्षण सुविधा पुरविणे.

स्थानिक प्राधिकरणाची कर्तव्ये

**९. प्रत्येक स्थानिक प्राधिकरण**

(क) प्रत्येक बालकास मोफत आणि सक्तीने प्राथमिक शिक्षण पुरवील :

परंतु, समुचित शासनाने किंवा स्थानिक प्राधिकरणाने स्थापन केलेल्या किंवा त्याची मालकी नियंत्रण असलेल्या किंवा प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे पुरविण्यात आलेल्या निधीतून भरावा. प्रमाणात वित्त पुरवठा केलेल्या शाळेव्यतिरिक्त शाळेत एखाद्या बालकाच्या प्रवेश किंवा तिच्या

(ड) त्याच्या अधिकार क्षेत्रात राहणाऱ्या प्रत्येक बालकाच्या शाळाप्रवेशाची उपस्थितीची आणि प्राथमिक शिक्षण पूर्ण करण्यासाठी खातरजमा करून त्यांचे संनियंत्रण करील.

(च) शाळेची इमारत, अध्यापन कर्मचारी वर्ग आणि अध्यापन साधनसामग्री तसेच पायाभूत सुविधा पुरवील,

(छ) कलम ४ मध्ये विनिर्दिष्ट केलेली विशेष प्रशिक्षण सुविधा पुरवील.

(ज) अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केलेली मानके व निकष यांना अनुरुप असणाऱ्या उत्तम दर्जाच्या प्राथमिक शिक्षणाची सुनिश्चिती करेल.

(झ) प्राथमिक शिक्षणासाठी अभ्यासक्रम व स्वाध्याय (पाठ्यक्रम) वेळेवर विहित करण्याची खातरजमा करील,

(ञ) शिक्षकांसाठी प्रशिक्षण सुविधा पुरवेल,

(त) स्थलांतरीत कुटुंबातील बालकांचा प्रवेश सुनिश्चित करेल.

(थ) त्याच्या अधिकारक्षेत्रातील शाळांच्या कामकाजाचे संनियंत्रण करील, आणि

(द) शैक्षणिक वर्ष निश्चित करील.

**माता / पिता व पालक यांचे कर्तव्य**

१०. प्रत्येक मातापित्याने किंवा पालकाने त्यांच्या किंवा तिच्या बालकाला किंवा यथास्थिती, पाल्याला नजिकच्या शाळेत प्राथमिक शिक्षणासाठी दाखल करणे. हे त्यांचे कर्तव्य असेल.

समुचित शासनाने शाळापूर्व शिक्षणाची तरतूद करणे.

११. तीन वर्षे वयावरील बालकांना प्राथमिक शिक्षणासाठी तीन वर्षे वयावरील बालकांना तयार करण्याच्या आणि सर्व बालके सहा वर्षे वयाची होईपर्यंत, त्यांच्या आरंभीच्या बालसंगोपनाची व शिक्षणाची तरतूद करण्याच्या हेतूने, समुचित शासनास, अशा सर्व बालकांना मोफत शाळा पूर्व प्रशिक्षण देण्याची योग्य ती व्यवस्था करता येईल.

**प्रकरण ४.**

**शाळा व शिक्षक यांच्या जबाबदाऱ्या**

मोफत व सक्तीच्या शिक्षणासाठी शाळांच्या जबाबदाऱ्याचं व्याप्ती

१२. (१) या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ तरतुदी

(क) कलम २ च्या खंड (ढ) च्या उपखंड (एक) मध्ये विनिर्दिष्ट केलेली शाळा, त्यात प्रवेश दिलेल्या सर्व बालकांना मोफत व सक्तीचे शिक्षण देईल.

(ख) कलम २ च्या खंड (ढ) च्या उपखंड (दोन) मध्ये विनिर्दिष्ट केलेली शाळा, तिला अशा प्रकारे प्राप्त झालेले वार्षिक आवर्ती साहाय्य किंवा अनुदान यातून किमान आवर्ती खर्च भागतो त्याप्रमाणात किमान पंचवीस टक्क्यांच्या अधीन राहून तिचा त्यामध्ये प्रवेश दिलेल्या बालकांना असे मोफत व सक्तीचे शिक्षण देईल.

(ग) कलम २ च्या खंड (ढ) च्या उपखंड (तीन) व (चार) मध्ये निविर्दिष्ट केलेली शाळा, नजीकच्या शाळेतील दुर्बल घटकातील आणि उपेक्षित गटांतील

बालकांना पहिल्या वर्गात त्या वर्गाच्या विद्यार्थी क्षमतेच्या किमान पंचवीस टक्के मर्यादेपर्यंत प्रवेश देईल आणि व प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत त्यांना मोफत व सक्तीचे शिक्षण पुरवेल.

परंतु आणखी असे की, कलम २ च्या खंड (ढ) मध्ये विनिर्दिष्ट केलेली व एखादी शाळा पूर्व शिक्षण देईल त्याबाबत ती अशा शाळापूर्व शिक्षणाच्या प्रवेशासाठी खंड (क) ते (ग) च्या तरतुदी लागू होतील.

(२) कलम (२) च्या खंड (ढ) च्या उपखंड (चार) मध्ये विनिर्दिष्ट केलेली आणि पोटकलम (१) च्या खंड (ग) मध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे मोफत व सक्तीचे प्राथमिक शिक्षण देणाऱ्या शाळेला, तिने अशाप्रकारे केलेल्या खर्चाची, विहीत करण्यात येईल अशा रितीने, राज्याने केलेल्या प्रति–बालक खर्चाच्या मर्यादेपर्यंत किंवा बालकाकडून आकारण्यात आलेली प्रत्यक्ष रक्कम, यांपैकी जी कमी असेल तेवढ्या रकमेची प्रतिपूर्ती करण्यात येईल.

परंतु, अशी प्रतिपूर्ती, कलम २ च्या खंड (ढ) च्या उपखंड (एक) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या शाळेने प्रति बालकापेक्षा खर्चाच्या रक्कमेपेक्षा जास्त असणार नाही.

परंतु असे की, अशा शाळेला, तिच्याकडे कोणतीही जमीन, इमारत, साधनसामग्री किंवा इतर सुविधा मिळाल्याच्या कारणास्तव विनिर्दिष्ट संस्थेतील बालकांना एक तर मोफत किंवा सवलतीच्या दरात मोफत शिक्षण देण्याचे अगोदरच बंधन घातले असल्यास अशी शाळा, अशा आबंधनाच्या मर्यादेपर्यंत प्रतिपूर्तीसाठी हक्कदार असणार नाही.

(३) प्रत्येक शाळा आवश्यक करण्यात येईल अशी माहिती समुचित सरकारला किंवा यथास्थिती, स्थानिक प्राधिकरणाला पुरवील.

प्रवेशासाठी ती कोणतीही प्रति व्यक्ती फी किंवा चाळणी पद्धत नसणे.

१३. (१) कोणतीही शाळा किंवा व्यक्ती बालकाला प्रवेश देताना कोणतीही प्रति व्यक्ती फी वसूल करणार नाही आणि कोणत्याही चाळणी प्रक्रियेसाठी बालकास किंवा त्याच्या किंवा तिच्या मातापित्यास किंवा पालकास भाग पाडणार नाही.

(२) कोणतीही शाळा किंवा व्यक्तिने पोटकलम (१) च्या पुढील तरतुदींचे उल्लंघन करून १ (क) प्रतिव्यक्ती फी (कॅपिटेशन फी) होईल तर ती आकारलेल्या प्रति व्यक्ती फीच्या दहापटी इतके असू शकेल इतक्या द्रव्यदंडाच्या शिक्षेस पात्र होईल.

(ख) एखाद्या बालकास प्रक्रियेत भाग पाडेल तर ती पहिल्या उल्लंघनाबद्दल पंचवीस हजार रुपयांपर्यंत आणि त्यानंतरच्या प्रत्येक उल्लंघनाबद्दल पन्नास हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाच्या शिक्षेस पात्र ठरेल...

**प्रवेशासाठी वयाचा पुरावा**

१४. (१) प्राथमिक शिक्षणाच्या प्रवेशाच्या प्रयोजनासाठी बालकाचे वय, जन्म, मृत्यू व विवाहनोंदणी अधिनियम, १९८६ चा ५.........तरतुदींनुसार देण्यात आलेल्या जन्म दाखल्याच्या आधारे किंवा विहीत करण्यात येईल अशा अन्य कोणत्याही दस्तऐवजाच्या आधारे निर्धारित करण्यात येईल.

(२) वयाच्या पुराव्याच्या अभावी कोणत्याही बालकास, शाळेमध्ये प्रवेश नाकारण्यात येणारी नाही.

**प्रवेशास नकार न देणे**

१५. एखाद्या बालकास शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीला किंवा विहीत करण्यात येईल अशा

वाढवलेल्या कालावधीमध्ये शाळेत प्रवेश देण्यात येईल.

परंतु, वाढवलेल्या कालावधीनंतर जर असा प्रवेश मागितला असेल तर कोणत्याही बालकास प्रवेश नाकारण्यात येणार नाही.

परंतु आणखी असे की, वाढवलेल्या कालावधीनंतर प्रवेश देण्यात आलेल्या कोणत्याही बालकास समुचित शासनाद्वारे विहीत करण्यात येईल अशा रितीने त्याचा अभ्यास पूर्ण करता येईल.

**बालकास मागे ठेवण्यास व निष्कासनास प्रतिबंध**

१६. शाळेत प्रवेश दिलेल्या कोणत्याही बालकास, कोणत्याही वर्गामध्ये मागे ठेवता येणार नाही किंवा प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत शाळेतून काढून टाकता येणार नाही.

**बालकास शारीरिक शिक्षा आणि मानसिक त्रास देण्यास प्रतिबंध**

१७. (१) कोणत्याही बालकास शारीरिक शिक्षा किंवा मानसिक त्रास देण्यात येणार नाही.

(२) पोटकलम (१)च्या तरतुदींचे जो कोणी उल्लंघन करील, अशा व्यक्तीला लागू असणाऱ्या सेवा नियमांन्वये ती शिस्तभंगाच्या कारवाईस पात्र ठरेल.

**मान्यता प्रमाणपत्र मिळविल्याशिवाय कोणतीही शाळा स्थापन न करणे.**

१८. (१) समुचित शासनाने किंवा स्थानिक प्राधिकरणाने स्थापन केलेल्या त्यांच्या मालकी किंवा नियंत्रण असलेल्या शाळे व्यतिरिक्त इतर कोणतीही शाळा या अधिनियमाच्या प्रारंभानंतर, विहीत करण्यात येईल अशा नमुन्यात व अशा रितीने अर्ज करून, अशा प्राधिकरणाकडून मान्यता प्रमाणपत्र मिळविल्याशिवाय स्थापन करण्यात येणार नाही किंवा ती सुरू करण्यात येणार नाही.

(२) पोटकलम (१) अन्वये विहीत केलेले प्राधिकरण, विहित करण्यात येईल अशा कालावधीत अशा रितीने व अशा शर्तीच्या अधीन राहून मान्यता प्रमाणपत्र देईल. परंतु एखाद्या शाळेने कलम १९ खालील मानके आणि निकष यांची पूर्तता केल्याखेरीज अशा शाळेला मान्यता देण्यात येणार नाही.

(३) मान्यतेसाठीच्या शर्तींचे उल्लंघन केल्यानंतर विहीत प्राधिकारी, लेखा आदेशाद्वारे मान्यता काढून घेईल. परंतु, अशा प्रकारे मान्यता काढून घेतलेल्या शाळेत शिकत असलेल्या विद्यार्थ्यांना, शेजारच्या कोणत्या शाळेत प्रवेश घेता येईल याबद्दलचे निर्देश, अशा आदेशात दिलेले असतील. परंतु, आणखी असे की अशा शाळेला, विहीत केले असेल अशा रितीने आपले म्हणणे मांडण्याची संधी दिल्याखेरीज अशा प्रकारे मान्यता काढून घेण्यात येणार नाही.

(४) पोटकलम (३) अन्वये मान्यता काढून घेतल्याच्या दिनांकापासून अशी शाळा आपले कार्य चालू ठेवणार नाही.

(५) जी कोणतीही व्यक्ती, मान्यता प्रमाणपत्र मिळाल्याखेरीज एखादी शाळा स्थापन करेल किंवा चालवील किंवा मान्यता काढून घेतल्यानंतरही शाळा चालूच ठेवेल ती एक लाख रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्य दंडास आणि ज्या कालावधीत असे उल्लंघन करण्याचे चालूच ठेवले असेल त्या कालावधीतील प्रत्येक दिवसाकरिता व निकष यांची पूर्ती केल्याखेरीज, कलम १८ अन्वये कोणतीही शाळा स्थापन करण्यात येणार नाही किंवा तिला मान्यता देण्यात येणार नाही.

(२) या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी स्थापन केलेली एखादी शाळा अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केलेली मानके व निकष यांची पूर्तता करीत नसेल तर ती शाळा अशा प्रारंभाच्या दिनांकापासून तीन वर्षांच्या कालावधीत अशी मानके व निकष यांची स्वखर्चाने पूर्तता करण्यासाठी पावले उचलील.

(३) जर एखादी शाळा, पोटकलम (२) अन्वये विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीत मानके व निकष यांची पूर्तता करण्यात कसूर करील तर कलम १८ च्या पोटकलम (१) अन्वये विहित केलेले प्राधिकरण व कलमातील पोटकलम (३) अन्वये विनिर्दिष्ट केलेल्या रितीने अशा शाळेला दिलेली मान्यता काढून घेईल.

(४) पोटकलम (३) अन्वये मान्यता काढून घेतल्याच्या दिनांकापासून कोणतीही शाळा आपले कार्य चालू ठेवणार नाही.

(५) जी कोणतीही व्यक्ती, मान्यता काढून घेतल्यानंतर शाळा चालविणे सुरुच ठेवील ती, एक लाख रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्य दंडास, आणि ज्या कालावधीत असे उल्लंघन करण्याचे चालू ठेवले असेल त्या कालावधीतील प्रत्येक दिवसाकरिता दहा हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडास पात्र असेल.

**अनुसूचीमध्ये सुधारणा करण्याचा अधिकार**

२०. केंद्र सरकारला, अधिसूचनेद्वारे, अनुसूचीमध्ये कोणतीही मानके आणि निकष यांची भर घालून किंवा ते वगळून त्या अनुसूचीची सुधारणा करता येईल.

**शाळा व्यवस्थापन समिती**

२१. (१) कलम २, खंड (ढ) उपखंड (चार) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या शाळेखेरीज इतर शाळा, एक शाळा व्यवस्थापन समिती गठीत करतील. या समितीमध्ये, स्थानिक प्राधिकरणाचे निवडून आलेले प्रतिनिधी, अशा शाळेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांचे माता–पिता किंवा पालक तसेच शिक्षकांचा समावेश असेल.

परंतु, अशा समितीतील किमान तीन चतुर्थांश सदस्य हे माता–पिता किंवा पालक असतील.

परंतु, आणखी असे की, उपेक्षित गटांतील आणि दुर्बल घटकांतील बालकांचेच माता–पिता किंवा पालक यांना प्रमाणशीर प्रतिनिधित्व देण्यात येईल.

परंतु, तसेच अशा समितीतील पन्नास टक्के सदस्य या महिला असतील.

**(२) शाळा व्यवस्थापन समिती ही, पुढील कार्ये पार पाडील :–**

- शाळेच्या कामकाजाचे संनियंत्रण करणे,
- शालेय विकास योजना तयार करून त्यांची शिफारस करणे,
- समुचित शासनाकडून किंवा स्थानिक प्राधिकरणाकडून अथवा इतर कोणत्याही मार्गांनी मिळालेल्या निधीच्या वापरावर देखरेख ठेवणे, आणि
- विहीत करण्यात येतील अशी इतर कामे पार पाडणे.

**शालेय विकास योजना**

२२. (१) कलम २१ च्या पोटकलम (१) अन्वये गठीत करण्यात आलेली प्रत्येक शाळा व्यवस्थापन समिती, विहीत करण्यात येईल, अशा रितीने शालेय विकास योजना तयार करील.

(२) अशा प्रकारे पोटकलम (१) अन्वये तयार केलेली शालेय विकास योजना ही समुचित शासनाकडून किंवा यथास्थिती, स्थानिक प्राधिकरणाकडून मिळवावयाच्या योजना आणि अनुदान यांचा आधार असेल.

शिक्षकांची नेमणूक करण्यासाठी अर्हता आणि त्यांच्या सेवेच्या अटी व शर्ती

२३. (१) केंद्र सरकारने अधिसूचनेद्वारे प्राधिकृत केलेल्या शिक्षण प्राधिकरणाने निर्धारित केली असेल, अशी किमान अर्हता धारण करणारी कोणतीही व्यक्ती, शिक्षक म्हणून नियुक्त करण्यासाठी, पात्र असेल.

(२) एखाद्या राज्यात अध्यापक शिक्षण पीचक्रम देऊ करणाऱ्या किंवा अध्यापक प्रशिक्षण देणाऱ्या पुरेशा संस्था नसतील. अथवा पोटकलम (१) अन्वये निर्धारित केलेली किमान अर्हता धारण करणारे पुरेसे शिक्षक उपलब्ध नसतील त्याबाबत तर, केंद्र सरकारला त्यास योग्य वाटल्यास अधिसूचनेद्वारे, त्यात विनिर्दिष्ट करण्यात येईल, अशा व पाच वर्षाहून अधिक नसलेल्या कालावधीकरिता शिक्षकांची नेमणूक करण्यासाठी आवश्यक असलेली किमान अर्हता, शिथिल करता येईल. परंतु, जो शिक्षक या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी, पोटकलम (१) अन्वये नमूद केलेली किमान अर्हता धारण करीत नसेल, तो पाच वर्षाच्या कालावधीत अशी किमान अर्हता प्राप्त करील.

(३) शिक्षकांना द्यावयाचे वेतन व भत्ते आणि त्यांच्या सेवेच्या अर्टी व शर्ती, विहित केल्याप्रमाणे असतील.

**शिक्षकाची कर्तव्ये आणि गाऱ्हाणी दूर करणे**

२४. (१) कलम २३, पोटकलम (१) अन्वये नियुक्त केलेला शिक्षक, पुढील कर्तव्ये पार पाडील :–

(क) शाळेत नियमितपणे व वक्तशीरपणे हजर राहणे.

(ख) कलम २९, पोटकलम (२) च्या तरतुदींनुसार अभ्यासक्रम संचलित करणे व तो पूर्ण करणे.

(ग) विनिर्दिष्ट कालावधीत संपूर्ण अभ्यासक्रम पूर्ण करणे,

(घ) प्रत्येक बालकाच्या अध्ययन क्षमतेचे मूल्यमापन करणे आणि त्यानुसार कोणतीही आवश्यकता भासल्यास अतिरिक्त पूरक शिक्षण देणे.

(ड) माता–पिता आणि पालकांबरोबर नियमित पालकसभा घेऊन त्यांना बालकाची नियमित हजेरी, अध्ययन क्षमता, अध्ययनातील प्रगती याबाबतची माहिती आणि बालकाशी संबंधित अशी इतर कोणतीही माहिती देणे, आणि

(च) विहीत करण्यात येतील अशी इतर कर्तव्ये पार पाडणे.

(२) पोटकलम (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेली कर्तव्ये पार पाडण्यात जो शिक्षक कसूर करील तो, त्याला अथवा तिला लागू असलेल्या सेवा नियमान्वये शिस्तभंगविषयक कारवाई केली जाण्यास पात्र असेल. परंतु, अशी शिस्तभंगविषयक कारवाई करण्यापूर्वी, अशा शिक्षकाला आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी देण्यात येईल.

(३) शिक्षकांची कोणतीही गाऱ्हाणी असल्यास ती विहीत करण्यात येईल. अशा रितीने दूर करण्यात येतील.

**विद्यार्थी–शिक्षक प्रमाण**

२५. (१) या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या आत, प्रत्येक शाळेत, अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे, विद्यार्थी–शिक्षक प्रमाण राखण्यात येत आहे. याची, समुचित शासन आणि स्थानिक प्राधिकरण, सुनिश्चिती करील.

(२) पोटकलम (१) अन्वये विद्यार्थी–शिक्षक प्रमाण राखण्याच्या प्रयोजनासाठी, शाळेत पदस्थापित केलेला कोणताही शिक्षक इतर कोणत्याही शाळेत किंवा कार्यालयात काम करणार नाही किंवा त्यास कलम २७ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कामांखेरीज इतर कोणत्याही शिक्षणेतर प्रयोजनांसाठी तैनात करण्यात येणार नाही.

**शिक्षकांची रिक्त पदे भरणे**

२६. समुचित शासनाने किंवा स्थानिक प्राधिकरणाने स्थापन केलेल्या, त्याच्या मालकीच्या असलेल्या त्यांच्या नियंत्रणाखाली असलेल्या किंवा त्यांच्याकडून प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्षपणे भरीव निधी देण्यात येणाऱ्या शाळांबाबत नियुक्ती प्राधिकरण, त्यांच्या नियंत्रणाखाली असलेल्या शाळेतील शिक्षकांची रिक्त पदे, एकूण मंजूर पदांच्या दहा टक्क्यांहून अधिक असणार नाही याची खात्री कण न घेईल.

**शिक्षणेतर प्रयोजनासाठी शिक्षकांची नेमणूक करण्यास प्रतिबंध असणे.**

२७. कोणत्याही शिक्षकास, दशवार्षिक जनगणना, आपत्ती निवारणाची कामे किंवा स्थानिक प्राधिकरण अथवा राज्य विधानसभा किंवा यथास्थिती लोकसभेच्या निवडणूकांच्या कर्तव्याखेरीज, इतर कोणत्याही शिक्षणेतर प्रयोजनासाठी नेमण्यात येणार नाही.

**शिक्षकांना खाजगी शिकवणी घेण्यास प्रतिबंध असणे.**

२८. कोणताही शिक्षक अथवा शिक्षिका खाजगी शिकवणी घेणार नाही अथवा खाजगीरित्या शिकवण्याच्या कामात स्वतःला गुंतवून घेणार नाही.

प्रकरण ५.

**प्राथमिक शिक्षणाचा अभ्यासक्रम व तो पूर्ण करणे.**

अभ्यासक्रम व मूल्यमापन प्रक्रिया :

२९. (१) प्राथमिक शिक्षणाचा अभ्यासक्रम व मूल्यमापनप्रक्रिया ही समुचित शासनाने अधिसूचनेद्वारे विनिर्दिष्ट केलेल्या शिक्षण प्राधिकरणाकडून निर्धारित करण्यात येईल.

(२) शिक्षण प्राधिकरण पोटकलम (१) खाली अभ्यासक्रम व मूल्यमापन प्रक्रिया निर्धारित करताना पुढील बाबी विचारात घेईल, त्या अशा :–

- संविधानात असलेल्या मूल्यांशी अभिसंगत असणे,
- बालकाचा सर्वंकष विकास साधणे,
- बालकाचे ज्ञान, क्षमता व विशेष बुद्धिमत्ता विकसित करणे.
- शारीरिक व बौद्धिक क्षमतांचा जास्तीतजास्त विकास करणे.
- बालसुलभ व बालकेंद्रित पद्धतीने उपक्रम, शोध व संशोधन या माध्यमांतून शिक्षण देणे.
- शक्य असेल तेथवर शिक्षणाचे माध्यम बालकांची मातृभाषा असणे.
- बालकाला भीती, दडपण व चिंतेपासून मुक्त ठेवणे आणि आपली मते मुक्तपणे व्यक्त करण्यास त्याला मदत करणे.
- बालकाच्या ज्ञान आकलनाचे व्यापक व अखंडपणे मूल्यमापन करणे आणि त्याकरिता त्याची योग्यता वाढविणे.

**परीक्षा व पूर्तता प्रमाणपत्र :**

३०. (१) कोणत्याही बालकास प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत कोणतीही मंडळाची परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक असणार नाही.

(२) प्राथमिक शिक्षण पूर्ण केलेल्या प्रत्येक बालकास विहीत करण्यात येईल, अशा नमुन्यात व अशा रितीने ; एक प्रमाणपत्र देण्यात येईल.

**प्रकरण ६.**

**बालकांच्या हक्कांचे संरक्षण**

मुलाच्या शिक्षणाच्या हक्काचे संनियंत्रण :

३१. (१) बाल हक्क संरक्षण आयोग अधिनियम, २००५ याच्या कलम ३ खाली स्थान केलेला २००५ चा ४ राष्ट्रीय बाल हक्क संरक्षण आयोग किंवा यथास्थिती, कलम – १७ खाली स्थापन केलेला राज्य बाल हक्क संरक्षण आयोग, त्या अधिनियमान्वये त्याला नेमून दिलेल्या कार्याव्यतिरिक्त पुढील कार्येदेखील पार पाडतील:

(क) या अधिनियमाद्वारे किंवा या खाली तरतूद केलेल्या हक्काबद्दलच्या संरक्षण उपाययोजनांची तपासणी करणे व त्यांचा आढावा घेणे आणि त्यांची प्रभावी अंमलबजावणीसाठी व उपाययोजनांची शिफारस करणे.

(ख) बालकांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षण हक्कासंबंधीच्या तक्रारींची चौकशी करणे आणि

(ग) उक्त बाल हक्क संरक्षण आयोग अधिनियमाची कलमे १५ व २४ या अन्वये तरतूद केल्याप्रमाणे आवश्यक ती पावले उचलणे.

(२) उक्त आयोगास पोटकलम (१) खंड (ग) अन्वये बालकाच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाच्या हक्काशी संबंधित कोणत्याही बाबींची चौकशी करताना उक्त बाल हक्क संरक्षण आयोग अधिनियम याची कलमे १४ व २५ अन्वये यांना अनुक्रमे जे अधिकार नेमून देण्यात आलेले असतील तेच अधिकार असतील.

(३) राज्य बाल हक्क संरक्षण आयोग, एखाद्या राज्यामध्ये स्थापन करण्यात आला नसेल त्याबाबतीत समुचित शासनास पोटकलम (१) खंड (क) ते (ग) यांमध्ये विनिर्दिष्ट केलेली कार्ये पार पाडण्याच्या प्रयोजनार्थ विहीत करण्यात येईल अशा रितीने व अशा अटी शर्तींच्या अधीनतेने, असे प्राधिकरण घटित करता येईल.

**गाऱ्हाणी दूर करणे :**

३२. (१) कलम ३१ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी या अधिनियमांखाली कोणत्याही व्यक्तीला एखाद्या बालकांच्या अधिकाराशी संबंधित कोणतेही गाऱ्हाणे मांडावयाचे असल्यास, तिला त्या ठिकाणाची अधिकारिता असलेल्या स्थानिक प्राधिकरणाकडे लेखी तक्रार करता येईल.

(२) पोटकलम (१) खाली केलेली तक्रार प्राप्त झाल्यानंतर स्थानिक प्राधिकरण, संबंधित पक्षांना आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर तीन महिन्यांच्या कालावधीच्या आत, या बाबीवर निर्णय देईल.

(३) स्थानिक प्राधिकरणाच्या निर्णयामुळे व्यथित झालेल्या कोणत्याही व्यक्तीस, राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाकडे किंवा यथास्थिती, कलम ३१, पोटकलम (३) अन्वये विहित केलेल्या प्राधिकरणाकडे अपील करता येईल.

(४) पोटकलम (३) खाली केलेल्या अपिलावर, कलम ३१, पोटकलम (१) खंड (ग) अन्वये करण्यात आलेल्या तरतुदींनुसार राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाकडून किंवा यथास्थिती, कलम ३१, पोटकलम (३) अन्वये विहित केलेल्या प्राधिकरणाकडून निर्णय करण्यात येईल.

**राष्ट्रीय सल्लागार परिषदेची स्थापना :**

३३. (१) केंद्रशासन, अधिसूचनेद्वारे प्राथमिक शिक्षण व बालविकास या क्षेत्रातील ज्ञान

व प्रत्यक्ष अनुभव असणाऱ्या व्यक्तींमधून, केंद्र शासनास आवश्यक वाटतील अशा नियुक्त करावयाच्या जास्तीत जास्त पंधरा सदस्यांचा समावेश असलेल्या राष्ट्रीय सल्लागार परिषद स्थापन करील.

(२) अधिनियमाच्या तरतुदींची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याबाबत केंद्र सरकारला सल्ला देणे ही राष्ट्रीय सल्लागार परिषदेची कार्ये असतील.

(३) राष्ट्रीय सल्लागार परिषदेच्या सदस्यांचे भत्ते व त्यांच्या नेमणुकीच्या अन्य अटी व शर्ती विहीत करण्यात येतील त्याप्रमाणे असतील.

**राज्य सल्लागार परिषदेची स्थापना :**

३४. (१) राज्यशासन, अधिसूचनेद्वारे प्राथमिक शिक्षण व बाल विकास या क्षेत्रातील ज्ञान व प्रत्यक्ष अनुभव असणाऱ्या व्यक्तिंमधून, राज्यशासनास आवश्यक वाटतील अशा नियुक्त करावयाच्या जास्तीत जास्त पंधरा सदस्यांचा समावेश असलेली राज्य सल्लागार परिषद स्थापन करील.

(२) राज्य सल्लागार परिषदेच्या सदस्यांचे भत्ते व त्यांच्या नेमणुकीच्या अन्य अटी व शर्ती विहीत करण्यात येतील त्याप्रमाणे असतील.

**निर्देश देण्याचा अधिकार :**

३५. (१) केंद्र शासनास, या अधिनियमाच्या तरतुदी अंमलात आणण्याच्या प्रयोजनार्थ, त्यास योग्य वाटतील अशी मार्गदर्शक तत्त्वे समुचित शासनाला किंवा यथास्थिती, स्थानिक प्राधिकरणाला देता येतील.

(२) समुचित शासनास या अधिनियमाच्या तरतुदी अंमलात आणण्याच्या संबंधात त्यास योग्य वाटतील अशी मार्गदर्शक तत्त्वे व असे निर्देश, स्थानिक प्राधिकरणाला किंवा शाळाव्यवस्थापन समितीला देता येतील.

(३) स्थानिक प्राधिकरणास, या अधिनियमाच्या तरतुदी अंमलात आणण्याच्या संबंधात त्यास योग्य वाटतील अशी मार्गदर्शक तत्त्वे व असे निर्देश शाळाव्यवस्थापन समितीला देता येतील.

**खटला चालविण्यासाठी पूर्व मंजूरी घेणे :**

३६. कलम १३, पोटकलम (२), कलम १८, पोटकलम (५) आणि कलम १९, पोटकलम (५) याखाली शिक्षापात्र असलेल्या अपराधांबद्दलचा कोणताही खटला, समुचित शासनाने अधिसूचनेद्वारे याबाबतीत प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्यांची पूर्वमंजूरी घेतल्याशिवाय दाखल करता येणार नाही.

**सद्‌भावनापूर्वक केलेल्या कारवाईस संरक्षण :**

३७. या अधिनियमान्वये किंवा त्याखाली करण्यात आलेले कोणतेही नियम किंवा आदेश या अन्वये सद्‌भावनेने केलेल्या किंवा करण्याचे अभिप्रेत असलेल्या कोणत्याही कृतिसंबंधात केंद्र सरकार, राज्य शासन, राष्ट्रीय बाल हक्क संरक्षण आयोग, राज्य बालहक्क संरक्षण आयोग, स्थानिक प्राधिकरण, शाळाव्यवस्थापन समिती किंवा कोणतीही व्यक्ती यांच्याविरुद्ध कोणताही दावा किंवा अन्य कायदेशीर कार्यवाही केली जाणार नाही.

**समुचित शासनाचा नियम करण्यात अधिकार :**

३८. (१) समुचित शासनास या अधिनियमाच्या तरतुदी अंमलात आणण्यासाठी अधिसूचनेद्वारे, नियम करता येतील.

(२) विशेषतः व पूर्वगामी अधिकारांच्या सर्वसाधारणतेस बाधा न येता, पुढीलपैकी

वर्ग किंवा कोणत्याही बाबींसाठी असे नियम करता येतील.

(क) कलम ४ च्या पहिल्या परंतुकान्वये, विशेष प्रशिक्षण देण्याची पद्धती व त्यासाठीची कालमर्यादा

(ख) कलम ६ अन्वये एका शाळेच्या नजीक दुसरी शाळा स्थापन करण्यासाठी क्षेत्र किंवा हद्द,

(ग) कलम ९ च्या खंड (घ) अन्वये चौदा वर्षे वयापर्यंतच्या मुलांचा अभिलेख ठेवण्याची रीत,

(घ) कलम १२ च्या पोटकलम (२) अन्वये खर्चाच्या प्रतिपूर्तीची रीत आणि मर्यादा

(ड) कलम १४ च्या पोटकलम (१) अन्वये मुलाचे वय निश्चित करण्यासाठी कोणताही इतर दस्तऐवज,

(च) कलम १५ अन्वये प्रवेशासाठी वाढीव कालावधी आणि वाढीव कालावधीनंतर प्रवेश देण्यात आला असेल तर, अभ्यासक्रम पूर्ण करण्याची रीत,

(छ) कलम १८ च्या पोटकलम (१) खालील प्राधिकरण आणि मान्यता प्रमाणपत्रासाठी अर्ज करण्याची रीत व अजार्चा नमुना.

(ज) कलम १८ च्या पोटकलम (२) खालील मान्यता प्रमाणपत्राचा नमुना, मान्यता प्रमाणपत्र देण्यासाठीचा कलावधी, रीत आणि त्याबद्दलच्या शर्ती,

(झ) कलम १८ च्या पोटकलम (३) दुसऱ्या परंतुकान्वये म्हणणे मांडण्याची रीत,

(ट) कलम २१ च्या पोटकलम (२) च्या खंड (घ) अन्वये व शाळाव्यवस्थापन समितीने पार पाडावयाची इतर कार्ये

(ठ) कलम २२ च्या पोटकलम (१) अन्वये शालेय विकास योजना तयार करण्याची रीत.

(ड) कलम २३ च्या पोटकलम (३) अन्वये शिक्षकांना देय असलेले वेतन व भत्ते आणि त्यांच्या सेवेच्या अटी व शर्ती,

(ढ) कलम २४ च्या पोटकलम (१) च्या खंड (च) अन्वये शिक्षकाने पार पाडावयाची कर्तव्ये

(ण) कलम २४ च्या पोटकलम (३) अन्वये शिक्षकांची गाऱ्हाणी दूर करण्याची रीत,

(प) कलम ३० च्या पोटकलम (२) अन्वये प्राथमिक शिक्षण पूर्ण झाल्यावर त्यासाठी देण्यात येणाऱ्या प्रमाणपत्राचा नमुना आणि रीत,

(फ) कलम ३१ च्या पोटकलम (३) खालील प्राधिकरण, त्याच्या रचनेची रीत आणि त्यासाठीच्या अटी व शर्ती

(ब) कलम ३३ च्या पोटकलम (३) अन्वये राष्ट्रीय सल्लागार परिषदेच्या सदस्यांची भत्ते आणि त्यांच्या नेमणुकीच्या इतर अटी व शर्ती.

(३) या अधिनियमान्वये, केंद्र सरकारने केलेला प्रत्येक नियम आणि कलमे २० व २३ या अन्वये काढलेली प्रत्येक अधिसूचना, तो करण्यात, ती काढण्यात आल्यानंतर शक्य होईल तितक्या लवकर, संसदेच्या प्रत्येक सभागृहापुढे, ते एका सत्राने बनलेल्या अथवा दोन किंवा अधिक क्रमवर्ती सत्रे मिळून बनलेल्या अशा एकूण तीस दिवसांच्या कालावधिकरिता सत्रासीन असताना ठेवला/ठेवली जाईल, आणि पूर्वोक्त सत्राच्या किंवा क्रमवर्ती सत्रांच्या पाठोपाठचे सत्र संपण्यापूर्वी जर, ज्या नियमात किंवा अधिसूचनेत कोणतेही फेरबदल करण्याबाबत दोनही सभागृहांचे मतैक्य झाले अथवा तो नियम करण्यात किंवा अधिसूचना काढण्यात येऊ नये, याबाबत दोन्ही सभागृहांचे मतैक्य झाले तर, त्यानंतर, तो नियम किंवा ती अधिसूचना

अशा फेरबदल केलेल्या स्वरूपातच अंमलात येईल किंवा यथास्थिती, मुळीच अंमलात येणार नाही, तथापि, अशा कोणत्याही फेरबदलामुळे किंवा शून्यीकरणामुळे तत्पूर्वी या नियमाखाली किंवा अधिसूचनेखाली करण्यात आलेल्या कोणत्याही गोष्टीच्या विधिग्राह्यतेस बाधा येणार नाही.

(४) या अधिनियमान्वये राज्य शासनाने केलेला प्रत्येक नियम किंवा काढलेली अधिसूचना तो करण्यात/ती काढण्यात आल्यानंतर शक्य तितक्या लवकर, राज्य विधानमंडळासमोर ठेवला/ठेवली जाईल.

■■■

---

# (२) बालकांचा हक्क

बालकांच्या मोफत आणि सक्तीच्या अधिनियमाची पार्श्वभूमी आपण माहिती करून घेतली आहे. भारतातील ६ ते १४ वयोगटातील सर्व मुलांच्या दृष्टीने बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९ पारित होणे हा क्रांतिकारी क्षण आहे. या कायद्यामुळे उत्तम दर्जाचे प्राथमिक शिक्षण मिळण्याचा बालकांना अधिकार प्राप्त झाला आहे. बालकांना बालस्नेही वातावरणामध्ये सहज व सोप्या पद्धतीने गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळण्यासाठी अधिनियम व नियमावलीमध्ये विविध तरतुदींचा समावेश करण्यात आला आहे. अशा तरतुदींचे आकलन आपण करून घेऊन त्याची योग्य अंमलबजावणी केली तरच बालकांना शिक्षणाचा हक्क प्राप्त होईल. अशा काही महत्त्वाच्या तरतुदींचा परिचय करून घेऊ.

**१) चाळणी प्रक्रियेशिवाय प्रवेश :- (कलम १३)**

अधिनियम लागू होण्यापूर्वी बऱ्याच शाळांमध्ये मुलाखती, लेखी परीक्षा इत्यादी प्रकारे चाळणी प्रक्रिया घेऊन बालकांना प्रवेश दिला जात होता. शाळा प्रवेश होण्यासाठीच मुलांना अशा परीक्षांना सामोरे जावे लागले तर, बालक पुढे शाळेत कसे काय करणार? त्याला शाळा आपली कशी वाटणार? या अधिनियमामुळे आता बालकांना कोणत्याही चाळणी प्रक्रियेशिवाय शाळेत प्रवेश मिळण्याचा हक्क प्राप्त झाला आहे. यापुढे कोणत्याही शाळेत प्रवेशासाठी मुलाखती, लेखी परीक्षा अथवा अन्य चाळणी परीक्षा घेता येणार नाही. प्राथमिक शाळेत प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या प्रवेशपात्र असणाऱ्या बालकांना प्रवेश घेण्याचा हक्क प्राप्त झाला आहे.

**२) निःशुल्क प्रवेश व शिक्षण :- (कलम ३)**

६ ते १४ वयोगटातील बालकाला आपले प्राथमिक शिक्षण पूर्ण करण्याचा मूलभूत हक्क प्राप्त झाला आहे. बालकाचे प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत त्याच्याकडून कोणत्याही प्रकारची फी घेता येणार नाही. बालकाला आपले प्राथमिक शिक्षण तो राहत असलेल्या परिसरात पूर्ण करण्याचा हक्क आहे. प्राथमिक शिक्षण पूर्णपणे मोफत मिळण्याचा बालकाला हक्क आहे.

**३) वयानुसार प्रवेश व शिक्षण :-**
**(कलम ४, नियम ३ (२))**

बालकाचे वय सहा वर्षापेक्षा अधिक असेल मात्र

त्याने अद्याप कोणत्याही शाळेत प्रवेश घेतला नसेल तर, त्याला वयानुसार योग्य त्या वर्गात प्रवेश मिळण्याचा हक्क आहे. उदा. – आठ वर्षे पूर्ण वय असलेल्या बालकाला थेट इयत्ता तिसरीत प्रवेश मिळेल. वयानुसार प्रवेश घेतलेल्या बालकाला विशेष शिक्षण मिळण्याचा हक्क आहे. अशा बालकांना वर्गात भावनिक दृष्ट्या समायोजन करण्यासाठी पूरक असे वातावरण मिळण्याचा हक्क आहे.

**४) वर्षभरात केव्हाही प्रवेश :–**
**(कलम १५, नियम १० (१ व २))**

प्रवेशाचा वाढीव कालावधी शाळेचे नवीन सत्र सुरू होण्याच्या दिनांकापासून पहिले सत्र संपण्यापूर्वीच्या शेवटच्या दिनांकापर्यंत निश्चित करण्यात आला आहे.

बालकाला शाळेमध्ये वाढीव कालावधीपर्यंत प्रवेश मिळण्याचा हक्क आहे. वाढीव कालावधीनंतरही बालकाला शाळेत प्रवेश मिळण्याचा हक्क आहे. अशा उशिरा प्रवेश घेतलेल्या बालकाला विशेष शिक्षण मिळण्याचा हक्क आहे.

**५) वयाचा पुरावा नसल्यासही प्रवेश :–**
**(कलम १४)**

बालकाला शाळेत प्रवेश घेताना, त्याच्याकडे कोणत्याही प्रकारचा वयाचा पुरावा नसेल तरीही त्याला शाळेत प्रवेश मिळण्याचा हक्क आहे.

**६) दाखला हस्तांतरण :– (कलम ५)**

बालक शिकत असलेल्या शाळेत प्राथमिक शिक्षण पूर्ण करण्याची सोय नसल्यास त्याला नजीकच्या शाळेत प्राथमिक शिक्षण पूर्ण करण्याचा हक्क आहे. बालकाला एका शाळेतून दुसऱ्या शाळेत प्रवेश मिळण्यासाठी विनाविलंब दाखल मिळण्याचा हक्क आहे.

**७) शिक्षणातील सातत्य :– (कलम १६)**

कोणत्याही बालकाला कोणत्याही वर्गात मागे ठेवता येणार नाही. कोणत्याही बालकाला प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत शाळेतून काढून टाकता येणार नाही.

**८) शिक्षण पूर्तता प्रमाणपत्र :– (कलम ३०)**

बालकाने प्राथमिक शिक्षण पूर्ण केल्यानंतर ‘प्राथमिक शिक्षण पूर्तता प्रमाणपत्र’ मिळण्याचा त्याला हक्क आहे.

**९)हक्क संरक्षण :–**
**(कलम ३१ व ३२ नियम २४ (१))**

बालकांना प्रदान करण्यात आलेल्या हक्कांना संरक्षण मिळण्याचा त्याला हक्क आहे. याकरिता बालक राज्य बालहक्क संरक्षण आयोग यांनी बालकांसाठी सुरू केलेल्या हेल्पलाईनच्या मदतीने एसएमएस, दूरध्वनी अथवा पत्राद्वारे किंवा अन्य कोणत्याही सुविधेद्वारे तक्रार नोंदवू शकतो किंवा त्याच्यावतीने पालक किंवा इतर कोणतीही व्यक्ती तक्रार नोंदवू शकते.

वरील हक्क कायद्याने बालकाला बहाल करण्यात आले आहेत. बालकांना त्याचे हे हक्क मिळण्यासाठी पालक, शिक्षक, मुख्याध्यापक, शाळाव्यवस्थापन समिती, स्थानिक प्राधिकरण, शासन यांच्या जबाबदाऱ्या कायद्याने निश्चित केल्या आहेत. अधिनियमाच्या अनुषंगाने वरील सर्व घटकांची भूमिका पुढील प्रकरणांमध्ये आपण समजून घेणार आहोत.

**१०) बालस्नेही शिक्षण :– (कलम १७,२९)**

बालस्नेही व आनंददायी शालेय वातावरणात बालकेंद्रित पद्धतीने प्राथमिक शिक्षण पूर्ण करण्याचा बालकाला हक्क आहे.

**११) मंडळाच्या परीक्षांची सक्ती नाही :– (कलम ३०)**

प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत बालकाला कोणत्याही मंडळाची परीक्षा उत्तीर्ण होणे बंधनकारक असणार नाही.

■■■

# काय आहे हा शिक्षणहक्क कायदा?

ॲड.रमा सरोदे

घटनेमध्ये (८६ वे कलम) कायदा २००२ कलम २१ A चा समावेश झाल्याने सहा ते चौदा वयोगटातील मुलांना मोफत आणि सक्तीचे शिक्षण दिले जाईल, असे नियोजन करण्यात आले आहे. हा कायदा संमत करण्यामागचा उद्देशच,सर्वांना समान संधी देऊन लोकशाहीची पाळेमुळे बळकट करणे हा होता. समाजातल्या दुर्बल आणि कमजोर घटकांसाठी त्याचप्रमाणे जिथे गळतीचे प्रमाण जास्त आहे तिथे अशाप्रकारच्या कायद्यामुळे सक्तीचे आणि मोफत माध्यमिक शिक्षण मिळणार आहे. यामुळे या नीतिनिर्देशक तत्त्वांचे जगण्याच्या हक्काइतक्या मूलभूत हक्कामध्ये झालेला हा बदल नक्कीच खूप महत्त्वाचा आणि निर्णायक आहे. या कायद्यामुळे सहा ते चौदा वयोगटातील प्रत्येक मुलाला मोफत आणि सक्तीच्या शिक्षणाचा हक्क मिळणार आहे. याचबरोबर हे माध्यमिक शिक्षण ते मूल आपल्या घरा शेजारील शाळेत पूर्ण कण शकते. या शाळेत प्रवेश घेण्यासाठी मुलाला कोणतीही प्रवेश फी भरावी लागणार नाही. जर मुलाला काही कारणांमुळे शाळा सोडावी लागली असेल किंवा सहाव्या वर्षांपर्यंत ते मूल शाळेत जाऊ शकले नसेल तर त्याला त्याच्या वयानुसार वर्गात बसविण्यात येईल. या कायद्यान्वये शाळेवरती अशी जबाबदारी देण्यात आली आहे की त्यांनी त्या मुलांची विशेष तालीम घेऊन त्याच्या बरोबरीच्या इतर मुलांएवढी तयारी करून घ्यायची आहे. चौदाव्या वर्षानंतरही मूल त्याचे माध्यमिक शिक्षण पूर्ण करू शकते.

जर मूल एखाद्या शाळेत जात असेल आणि जर त्याचे कुटुंब एका ठिकाणाहून दुसरीकडे बदली होणार असेल तर त्याच्या शाळेच्या मुख्याध्यापकांनी त्याला शाळेचा दाखला दिलाच पाहिजे. आणि जर असा शाळेचा दाखला मिळण्यासाठी दिरंगाई होत असेल तरीही नवीन शाळा त्या मुलाला प्रवेश नाकारू शकत नाही. यामुळे सतत बदली होणाऱ्या कुटुंबातील मुलांना निश्चित प्रवेशाची खात्री राहणार आहे. मुलाला प्रवेश मिळण्याबरोबरच शाळांची अशी काही यंत्रणा हवी की ज्यामध्ये शाळा बदलणाऱ्या मुलांचा मागोवा घेता येईल. यासाठी जिल्ह्यातंर्गत आणि राज्यांतर्गत एक सुसंबंध असण्याची गरज आहे. दुर्दैवाने या कायद्यांतर्गत अशी कोणतीही तजवीज नाही की ज्यामुळे सरकार स्थलांतरित कामगारांच्या मुलांच्या माध्यमिक शिक्षणाची योग्य तरतूद करू शकेल.

(Appropriate government) केंद्रीय सरकारकडून स्थापन झालेल्या आणि त्याच्या अखत्यारीत असलेल्या शाळांसाठी योग्य प्रशासन म्हणजे केंद्रीय सरकारच असेल. पण शाळा जर राज्य सरकारच्या किंवा केंद्रशासीत प्रदेशाच्या (Union territory) अखत्यारीत असेल तर त्याचे योग्य प्रशासक (Appropriate government) म्हणून राज्य सरकार आणि केंद्रशासीत प्रदेश (Union territory) हे काम पाहतील. काही अधिकारी आणि जबाबदाऱ्या या स्थानिक नगर

पंचायत किंवा ग्रामपंचायतीवर देखील सोपविण्यात आल्या आहेत. या कायद्याची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याची जबाबदारी ही योग्य प्रशासन आणि स्थानिक प्रशासन यांच्यावर असेल. तर या कायद्याच्या अंमलबजावणीची देखरेख करण्याची जबाबदारी नॅशनल कमीशन फॉर प्रोटेक्शन ऑफ चाईल्ड राईटस् आणि स्टेट कमिशन फॉर प्रोटेक्शन ऑफ चाईल्ड राईटस् यांची असेल. या कायद्यांतर्गत अशीही तजवीज आहे की शाळेत एक व्यवस्थापक कमिटी बनविता येईल आणि त्यामध्ये स्थानिक प्रशासनामध्ये निवडलेले प्रतिनिधी, पालक आणि शिक्षक यांचा समावेश असेल. पालकांमधील प्रतिनिधीत्व निवडताना त्यामध्ये योग्य प्रमाणात दुर्बल आणि कमजोर आर्थिक गटातील पालकांचाही समावेश केला गेला पाहिजे. व्यवस्थापनामध्ये महिलांनाही ५०% प्रतिनिधीत्व दिले गेले पाहिजे. अर्थात दुर्दैवाने या कायद्याचे ध्येय पूर्ण करण्यासाठी प्रत्येकाने कशा पध्दतीने काम केलं पाहिजे. याबद्दल मात्र काहीच रुपरेषा (विवेचन) दिलेली नाही. अनेक नागरी संस्था शिक्षणाच्या मुद्यावर काम करत आहेत. पण या कायद्यात या नागरी संस्थासाठी कोणतीच भूमिका नसणं ही एक मोठीच पोकळी आहे.

घराजवळील शाळा जर या विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध नसतील तर नवीन शाळा उभारण्याची जबाबदारी योग्य प्रशासकाची असेल. (Appropriate government) पण अशा शाळा काढण्यासाठी कमीत कमी किती मुले लागतील हे मात्र त्यात नमूद केलेले नाही. शाळा काढण्याबरोबरच मुलांना शाळेत पोहचवण्यासाठी वाहतुकींची सोय करणे हेही योग्य प्रशासकांवर बंधनकारक आहे.

सक्तीचे शिक्षण म्हणजेच सहा ते चौदा वयोगटातील मुलांना मोफत माध्यमिक शिक्षण देणे, त्यांना सक्तीने शाळेत प्रवेश घ्यायला लावणे, हजेरी पूर्ण असणे आणि या सर्वांतून त्या मुलांची शिक्षणप्रक्रिया पूर्ण होणे. आर्थिकदृष्ट्या कमजोर आणि दुर्बल घटकांच्या मुलांना कोणत्याही भेदभावाला सामोरे न जाऊ देण्याची जबाबदारी योग्य प्रशासकाची असेल. मूलभूत सुविधा, विशेष प्रशिक्षणाची सोय, गुणात्मक शिक्षण, योग्य वेळेनुसार दिलेला अभ्यासक्रम आणि शिक्षकांसाठी प्रशिक्षणांची सोय या सगळ्या गोष्टी पुरविण्याची जबाबदारी योग्य प्रशासकाची आहे. पण हा कायदा शिक्षण प्रक्रियेच्या गुणवत्तेबद्दल काहीच बोलत नाही.

समाजामध्ये समानता प्रस्थापित करण्यासाठी २५% विद्यार्थी समाजातील दुर्बल आणि कमजोर घटकातील असतील ही चांगलीच तरतूद आहे. पण जोपर्यंत शाळेतील शिक्षण, कर्मचारी वर्ग आणि पालक यांच्याकडून या दुर्बल आणि कमजोर गटातील मुलांचा स्वीकार होत नाही तोपर्यंत ही तरतूद अर्थहीन आहे. कायद्याने शाळांना Capitation फी (दरडोई शुल्क) घेण्यापासून मनाई केलेली आहे. आणि जर एखाद्या शाळेने अशी फी घेतली तर त्या फीच्या दहापट दंड शाळेला भरावा लागेल. तसेच या कायद्याने मुलांची किंवा पालकांची कोणत्याही पद्धतीची प्रवेश परीक्षा किंवा चाळणी पद्धत शाळांना वापरता येणार नाही. आणि जर असे आढळून आले तर पहिल्या वेळेला २५,००० दंड भरावा लागेल आणि परत जर अशी पद्धत आढळून आली तर ५०,००० रु. दंड शाळांना भरावा लागेल.

मुलांचा प्रवेश वयाच्या दाखल्यासाठी नाकारता येणार नाही. शाळेत मुलाला प्रवेश हा प्रवेश प्रक्रियेच्या वेळे व्यतिरिक्त वाढवलेल्या काळात (extended period) देखील देण्यात यावा. त्याचे माध्यमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत त्यांना शाळेतून काढले जाऊ शकत नाही. शाळेतील शिक्षक आणि कर्मचारी वर्ग या मुलांना शारीरिक किंवा मानसिकदृष्ट्या त्रास देऊ शकत नाहीत आणि या कायद्याचे उल्लघन करणाऱ्यास कडक शासन होऊ शकते. मुलांचं लहान वय लक्षात घेता कशा प्रकारच्या शारीरिक आणि मानसिक छळ कसा होईल हे लक्षात घेऊन त्यांना त्यापासून संरक्षण दिले गेले पोहिजे आणि अशा घटना घडल्या तर काय

पध्दतीची शिक्षा होऊ शकेल या विषयीचा पूर्ण आराखडा तयार ठेवावा लागेल. जर असे काही घडत असेल तर अशा शाळा बंद करण्यात येऊन मुलांना दुसऱ्या, जवळील शाळेत प्रवेश देण्यात यावा. जर शाळा योग्य ते नियम आचरणात आणत नसेल तर त्या शाळेची परवानगीही नाकारण्यात येऊ शकेल. कायदा लागू होण्यापूर्वीच जर शाळा स्थापन झाली असेल तर त्यांनी कायदा लागू झाल्यानंतरच्या तीन वर्षात कायद्याच्या अटींचे पालन करायचे आहे. नाहीतर त्यांची परवानगी नाकारली जावू शकते. आणि जर परवानगी नसतानाही शाळा चालवली जात असेल तर त्यांना १0,000 ते १,00,000 पर्यंत दंड होऊ शकतो.

शिक्षकांनी मुलांच्या शैक्षणिक क्षमतांचा योग्य तो मागोवा घेऊन त्यांना योग्य त्या सूचना दिल्या पाहिजेत. वेळोवेळी पालकांची भेट घेऊन पाल्याच्या शैक्षणिक प्रगतीची माहिती दिली गेली पाहिजे. शिक्षकांनी मुलांची पारख करताना त्यांच्या सर्वांगीण विकासाचा विचार कण्न त्यांच्या क्षमता आणि गुणवत्ता यांचा मागोवा घेतला पाहिजे. मुलांचा शारीरिक आणि मानसिक विकास हा शिक्षणाच्या मध्यवर्ती असला पाहिजे. शैक्षणिक प्रक्रिया ही मैत्रीपूर्ण आणि मुलांना केंद्रस्थानी ठेवून आखलेली असावी. वेगवेगळ्या खेळांच्या, प्रयोगाच्या आणि शोधांच्या माध्यमातून ते मूल शिक्षण घेऊ शकेल. कोणतीही भीती, राग, चिंता यापासून मुक्त वातावरण मुलांच्या शिक्षणासाठी मिळावं की, ज्यामुळे मूल स्वतःच्या भावना चांगल्या पद्धतीने सांगू शकेल. मुलाच्या समजण्याच्या आणि त्याच्या वापर करण्याच्या क्षमतांचे सतत आणि समग्र असे परीक्षण केले जावे आणि शिक्षक जर या बाबींचा योग्य पाठपुरावा करत नसतील तर त्यांच्यावर योग्य ती कारवाई करण्यात येईल.

लोकसंख्या गणना, आपतकालीन घटना किंवा निवडणुकीच्या वेळीची कामे सोडली तर या कायद्याने इतर कोणतीही कामे शिक्षकांवर सोपवली जाणार नाहीत. पण अर्थातच हा कायदा लोकसंख्या गणना, आपतकालीन घटना किंवा निवडणुकीची कामे यावेळी शिक्षकांच्या अनुपस्थितीमुळे होणाऱ्या मुलांच्या नुकसानाविषयक काहीच बोलत नाही. शिक्षकांनी स्वतःच्या शिकवण्या घेण्यापासूनही हा कायदा प्रतिबंध घालतो. कायद्याची योग्य अंमलबजावणी होते किंवा नाही हे पाहण्याचा हक्क NCPCR किंवा SCPCR यांना आहे. जर मुलाच्या हक्कांचे उल्लंघन होत असेल तर स्थानिक अधिकारी संस्थांना याविषयी लेखी तक्रार केली गेली पाहिजे. दोन्ही पक्षांच्या योग्य त्या चौकशीनंतर स्थानिक अधिकारी संस्था तीन महिन्यात योग्य ती कारवाई करू शकेल. राष्ट्रीय सल्लागार समिती सरकारला या कायद्याची योग्य ती अंमलबजावणी करण्यासाठी मदत करेल. केंद्र सरकार योग्य प्रशासनाला मार्गदर्शन करेल. योग्य प्रशासन स्थानिक प्रशासनाला मार्गदर्शन केल आणि स्थानिक प्रशासन शालेय व्यवस्थापन समितीला मार्गदशन करेल.

मुलांना मोफत आणि सक्तीच्या शिक्षणाचा हा २००९ चा कायदा कलम-21-अ च्या खाली शिक्षणाचा कायदा हा मूलभूत हक्कांशी नेऊन जोडतो. पण समाज आणि या कायद्यांच्या सुरळीत अंमलबजावणीमध्ये जी मोठी दरी आहे ती कशी मिटवता येईल याविषयी विवेचन करत नाही. तसेच हा कायदा प्राथमिक शिक्षणासाठीची कोणतीच तरतूद करत नाही. त्यामुळे सहा वर्षांपर्यंत मूल शिक्षणाशिवाय राहण्याची शक्यता आहे. तसेच हा कायदा पर्यायी शाळांविषयी काहीच बाबी लक्षात घेत नाही. त्यामुळे एक मोठा वर्ग या कायद्यांतर्गत येवू शकत नाही.

योग्य शिक्षण हा प्रत्येक व्यक्तीचा हक्क आहे. योग्य आणि समान संधी मिळाल्या तर जीवनाची एक प्रतिष्ठीत बाजू सगळ्यांसाठी मोकळी होईल म्हणून आपण सर्वांनीच याची परिणामकारक अंमलबजावणी करण्यात सामील होऊ या.

■■■

# जागतिक पातळीवरील शिक्षणहक्क

बालकांच्या हक्कांची संहिता २० नोव्हेंबर १९९० रोजी संयुक्त राष्ट्र परिषदेच्या सर्वसाधारण सभेने मंजूर केली यात स्वातंत्र्य, न्याय व शांती यावर आधारित बालकाची प्रतिष्ठा व त्याचे मूलभूत हक्क यावर विचार केला गेला. संपूर्ण स्वतंत्र वातावरणात मानवाची प्रगती व्हावी हा त्यामागचा उद्देश होता. वंश, रंग, लिंग, धर्म, राजकीय नेते, राष्ट्रीयता, संपत्ती, सामाजिक प्रतिष्ठा या कशाचाही भेद न करता विशेष काळजी घेतली जाणे व योग्य मदत मिळणे हे बालकाचे हक्क आहेत असे या संहितेत म्हटले आहे. या जबाबदाऱ्या कुटुंब पुऱ्या करू शकते म्हणून कुटुंबसंस्था जपली पाहिजे, तसेच शांतता, मानमान्यता, सहिष्णुता, स्वातंत्र्य, समता व एकता या मूल्यांनी भरलेल्या वातावरणातच मुलांना वाढवले पाहिजे असे सांगितले गेले.

परिषदेसाठी जमलेल्या व या संहितेला मंजुरी देणाऱ्या सर्व राष्ट्रांनी मिळून बालकाच्या शिक्षणहक्का विषयक काही महत्त्वाची कलमेही मंजूर केली आहेत.

**कलम २८**

सर्व राष्ट्रांना मुलांचा शिक्षणाचा हक्क मान्य आहे. सर्वांना शिक्षणाची समान संधी मिळावी आणि या हक्काची जास्त जास्त पूर्तता करता यावी म्हणून सर्व राष्ट्रे खालील गोष्टी करतील –

- ♦ प्राथमिक शिक्षण सक्तीचे व सर्वांना मोफत.
- ♦ निरनिराळ्या तऱ्हेचे माध्यमिक शिक्षण, धंदेशिक्षण यांच्या वाढीला प्रोत्साहन आणि ते सर्वांना घेता यावे म्हणून जरूर तेथे आर्थिक मदत.
- ♦ ज्याच्या त्याच्या बुद्धीच्या कुवतीप्रमाणे त्याला उच्च शिक्षण घेता येईल अशी व्यवस्था.
- ♦ शिक्षणाबद्दल व धंदेशिक्षणाबद्दल सर्व मुलांना माहिती व सल्ला मिळेल ह्याची व्यवस्था.
- ♦ शाळा अर्धवट सोडणाऱ्यांचे प्रमाण कमी करण्यासाठी शाळेत नियमित हजर राहण्याला उत्तेजन.

शाळेमधील शिस्त राबविताना मुलाचा मान राखला जाईल. त्याच्या हक्कांचे उल्लंघन होणार नाही, हे खात्रीपूर्वक बघण्याची व्यवस्था सर्व राष्ट्रे करतील.

सर्व जगातून अज्ञान व निरक्षरता यांचे निर्मूलन व्हावे आणि शास्त्रीय आणि तांत्रिक शिक्षण देण्याच्या नव्या नव्या पद्धतींचा सर्वांना लाभ मिळावा याकरिता सर्व राष्ट्रे आंतरराष्ट्रीय सहकाराला प्रोत्साहन देतील. विकसनशील राष्ट्रांच्या गरजांकडे अधिक लक्ष पुरविले जाईल.

**कलम २९**

मुलांच्या शिक्षणाची दिशा कशी असावी याबद्दल सर्व राष्ट्रांत एकमत आहे. ती अशी असावी की

ज्यामुळे –

- मुलाची शारीरिक व मानसिक शक्ती, त्यांचे सुप्त गुण, त्याचे व्यक्तिमत्व यांचा विकास व्हावा.
- शांतता, सहिष्णुता, एकता, समता, मानवाचे हक्क व त्याचे स्वातंत्र्य याबद्दल आदर, इत्यादी सर्व राष्ट्रांनी संमत केलेल्या तत्त्वांबद्दल मुलाच्या मनात आदर वाढीला लागावा.
- आपले आईवडील, आपली संस्कृती, भाषा, आपली राष्ट्रीय मूल्ये आणि आपल्याहून निराळे असलेले समाज, संस्कृती ह्या सर्वांबद्दल आदरभाव निर्माण व्हावा.
- स्वतंत्र समाजात जबाबदार नागरिक म्हणून जगता यावे व सर्व धर्मांच्या अगर राष्ट्राच्या लोकांशी मैत्रीचे संबंध ठेवता यावे अशी मुलाच्या मनाची तयारी व्हावी.
- नैसर्गिक पर्यावरणाबद्दल मुलांना आदर वाटावा.

एखाद्या व्यक्तिने अगर संस्थेने नवीन शिक्षणसंस्था काढण्याचे ठरविले तर या अगर याच्या मागच्या कलमांतील कोठलीही तत्त्वे त्याच्या आड येत नाहीत. मात्र ती शिक्षणसंस्था शासनाने घालून दिलेल्या गुणवत्तेची असावी आणि तिने वरील तत्त्वे पाळावी.

**कलम ३०**

ज्या देशात वंशीय, धार्मिक, भाषिक, अल्पसंख्यांक गट आहेत, अगर मूळच्या रहिवाशांचे गट आहेत, त्या देशात अशा गटांतील मुलांना आपला धर्म, भाषा, संस्कृती यांचा वापर करण्याचा अधिकार नाकारला जाणार नाही.

**कलम ३१**

मुलांचा विश्रांती घेण्याचा, खेळण्याचा, योग्य अशा करमणुकीत रमण्याचा, मोकळा वेळ असण्याचा, सांस्कृतिक जीवन व कला यात भाग घेण्याचा हक्क सर्व राष्ट्रे मान्य करीत आहेत. याकरता नाना तऱ्हेने करमणुकीचे अगर कलात्मक व्यवसाय मुलांना पुरविण्यास सर्व राष्ट्रे उत्तेजन देतील.

**कलम ३२**

आर्थिक शोषणापासून आणि कोणत्याही धोकादायक, शिक्षणाच्या शारीरिक व मानसिक प्रगतीच्या आड येणाऱ्या कामापासून संरक्षण मिळण्याचा मुलाचा हक्क सर्व राष्ट्रांना मान्य आहे.

या हक्काच्या पूर्ततेकरिता जरूर ते शासकीय, कायदेशीर व शैक्षणिक उपाय सर्व राष्ट्रांनी योजावे, व शिवाय खालील गोष्टी कराव्यातः

- नोकरीत प्रवेश मिळण्यासाठी कमीत कमी वयोमर्यादा.
- कामाचे तास व कामाच्या सभोवतालची परिस्थिती याबद्दल योग्य कायदे.
- या कलमाच्या अंमलबजावणीकरिता यंत्रणा व शिक्षा.

बालकाच्या शैक्षणिक हक्काबद्दल जागरूक असणाऱ्या संयुक्त राष्ट्र परिषदेच्या संहितेतील कलमांची पूर्तता आपल्याकडून होत आहे का? हा खरा कळीचा मुद्दा आहे.

■■■

**शिक्षण म्हणजे वास्तविकतेशी संबंध नसलेले, दिवसातले काही तास चालणारे, निरूपयोगी गौडबंगाल ठरणार नाही, अशी दक्षता ही नवी व्यवस्था आखताना आपण घेतली पाहिजे.**

**रवींद्रनाथ टागोर**

# सुदामा वर्गात येणार ना...?

**श्रुती पानसे**

शिक्षणहक्क विधेयकाच्या अंतर्गत आर्थिक व दुर्बल घटकातील, ६ ते १४ वयोगटातल्या मुलांसाठी, विनानुदानित शाळांमध्ये २५ टक्के जागा राखीव ठेवण्याबद्दल आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिलेले आहेत. १२ एप्रिल २०१२ ला आदेश निघाला आणि २०१२ च्या शैक्षणिक वर्षांपासून याची अंमलबजावणी करावी असेही सांगितले होते. मात्र काही शाळा लगेचच या संदर्भात न्यायालयात गेल्या. या वर्षीची सर्व प्रवेश प्रक्रिया पूर्ण झालेली आहे, असं कारण त्यांनी यासाठी दिले. काही दिवसांपूर्वीच या आदेशाला एक नवी जोड मिळालेली आहे. ती म्हणजे मदरसे, वैदिक पाठशाळा आणि तत्सम प्रकारच्या शाळांना या कायद्यातून वगळण्यात आलेले आहे.

शासनाने असा आदेश काढण्यामागे अनेक कारणं आहेत. त्यातलं महत्त्वाचं कारण आहे की, यामुळे सामाजिकीकरणास पोषक वातावरण तयार होईल. गरीब विद्यार्थीसुद्धा सधन मुलांच्या बरोबरीने एकाच शाळेत शिकू शकतील. सधन मुलांना ज्या प्रकारचे शिक्षण आणि इतर सुविधा मिळतात, तशाच यांनाही मिळतील.

या आदेशामुळे सामाजिक अभिसरण होईल हे तर खरेच. मात्र ज्या मुलांना योग्य शिक्षण आणि दिशा न मिळाल्यामुळे ज्यांची बुद्धिमत्ता झाकलेलीच राहते, त्यांना पुढे येण्याची संधी यामुळे नक्कीच मिळेल, अशीही आशा आहे. मात्र समाजातील एक वर्ग मात्र या आदेशामुळे अस्वस्थ झालेला आहे. या वर्गाचे अनेक प्रश्न आहेत, जसे.

सरकार असे फतवे काढून शाळांना विनाकारण त्रास देत आहे.

ज्या शाळांची फी जास्त आहे, अशांना ही शंका सतावते आहे की या मुलांची फी भरणार कोण? जरी सरकारने आदेशात असे म्हटले आहे की, या मुलांची फी सरकार भरेल, तरीही त्या बाबतीत पुरेशी स्पष्टता नाही. अशा परिस्थितीत या फीचा बोजा एक तर इतर पालकांवर पडेल किंवा मग खुद्द त्या शाळेला हा खर्च उचलावा लागेल. हे शाळेला त्रासदायक ठरणार आहे.

गरीब–श्रीमंत मुलं एकत्र नकोतच, असंही स्पष्टपणे म्हणण्यात येतंय. तर आडून असंही मत व्यक्त होतंय की काही मुलं चांगले कपडे घालून, कारमध्ये बसून शाळेत येणार तर काही जण चालत येणार अशा वेळेला गरीब मुलांच्या मनावर त्याचा परिणाम होईल.

एक भन्नाट सूचना अशी आहे की, त्या मुलांना शाळेत येऊ द्यावं, फक्त त्यांच्यासाठी वेगळ्या शिफ्टमध्ये शाळा भरवावी. म्हणजे शिक्षक तेच असतील, सर्व सुविधाही त्यांना मिळतील.

असा काही आदेश निघाला आहे, हे अजून सर्व पालकांपर्यंत पोहचलं आहे की नाही याचा काही

अंदाज आलेला नाही. त्यामुळे असे पालक शाळांमध्ये जाऊन धडकताहेत का, हे ही नक्की माहिती नाही. मात्र काही ठिकाणी पालक पोहचून सुद्धा शासनाचा लेखी आदेश आमच्याकडे आलेला नाही, असं काही शाळांना सांगून टाकलंय.

एकूण काय तर सध्या तरी ही परिस्थिती गोंधळाची आहे. कदाचित पुढच्या वर्षीपर्यंत पुरेशा स्पष्टतेसह चित्र बदललेलं असेल किंवा...?

या आदेशाचं नक्की काय होईल, या विषयावर साध्य केवळ ऊहापोह चाललेला आहे. एक मात्र खरं की या आदेशामुळे तथाकथित उच्चभ्रू समाजाला नक्कीच धक्का बसलेला जाणवतो आहे. मनाने कायम इंडियात राहणाऱ्या काही जणांना भारत नकोसा असतो. आपलं बेट कायमच सुरक्षित हवं असतं. त्याचंच प्रतिबिंब सध्या ऐकायला-वाचायला मिळतं आहे. तर दुसरीकडे शासनाच्या अशा आदेशाची वाट न बघता, पूर्वीपासूनच दुर्बल घटकातल्या मुलांना आपल्या शाळेत घेणाऱ्या शाळाही आहे. त्यांची फी कधी सधन पालक भरतात, तर कधी शाळा भरते. त्यांचा प्रश्न ते सोडवतात. मुलांच्या बाबतीत बोलायचं तर, मोठ्या माणसांच्या मनात गरीब-श्रीमंत वगैरे भेद असतात. पण मुलांच्या मनात असं काही नसतं, ते निर्व्याज मनाने मैत्री करतात. त्यामुळे त्यांची मैत्री नक्कीच होईल आणि त्यामुळे एकमेकांची जीवनशैलीही एकमेकांना कळेल.

या आदेशामुळे भारताच्या भविष्यात नक्कीच काही बदल घडून येतील. या अतिशय महत्त्वाच्या विषयावर एक खुली चर्चा व्हावी असं नक्कीच वाटतं. आपलंही काही एक मत निश्चितच असणार आहे. ते मत आम्हाला शिक्षणवेधच्या पत्त्यावर सविस्तर लिहून पाठवा. आम्ही ते प्रसिद्ध करू.

■■■

**स्वातंत्र्यानंतर आंबेडकरांनी 'शिक्षणाचा हक्क हा मूलभूत अधिकार म्हणून मान्य केला गेला पाहिजे' हा आग्रह धरला. तळागाळातल्या, पिढ्यानपिढ्या शिक्षण नाकारल्या गेलेल्या समाजातून आलेल्या या युगद्रष्ट्याला समाजाच्या उत्थानासाठी शिक्षण किती महत्त्वाचं आहे हे स्वतःच्या अनुभवातून शिकायला मिळालं होतं; म्हणूनच 'शिक्षणाचा हक्क हा मूलभूत आणि जन्मापासून (० वर्षांपासून) किमान १४ वर्षांपर्यंत असलाच पाहिजे' हा त्यांचा आग्रह होता. नेहमीप्रमाणे याही वेळेस विरोध झाला आणि सरकारने फक्त ११ वर्षांपर्यंत शिक्षणाची जबाबदारी घ्यावी असे काही सदस्यांकडून सांगण्यात आले. बाबासाहेबांनी त्यास कडाडून विरोध केला. जर फक्त ११ वर्षांपर्यंतच शिक्षणाची जबाबदारी सरकारने घेतली तर गरीब, श्रमिकांची मुलं फक्त पाच वर्षांच्या शालेय शिक्षणानंतर बालमजुरीलाच लागतील (किंवा मुलींचे बालविवाह करून दिले जातील) हे पटवून दिलं. कमीतकमी १४ वर्षांपर्यंत तरी शिक्षणाचा (आठ वर्षे शालेय शिक्षण) मूलभूत अधिकार सर्व बालकांना समान पद्धतीने मिळालाच पाहिजे हा मुद्दा बाबासाहेबांनी लावून धरला.**

# गुणवत्ता शिक्षण : मुलांचा हक्क

**मुग्धा नलावडे**

मला लहानपणापासून 'शिक्षण' हे चार भिंतीच्या आत असते का, असा प्रश्न पडायचा कारण मी झोपेतून उठले की सकाळी सकाळी बाहेर वऱ्हांड्यात बसून निवांत १५-२० मिनिटे आकाश निरीक्षण, सभोवतालच्या निसर्गाचे निरीक्षण करत असे, मला ते १५-२० मिनिटे खूप हवीहवीशी असायची. पण आईच्या दृष्टीने उठल्या उठल्या असे रिकामटेकडे बसणे म्हणजे वेळ वाया घालवणे ठरायचे. ती सारखी नुसती 'बसू नको ब्रश कर, अभ्यास कर, आपापली वह्या पुस्तके पाहून घे' अशा असंख्य सूचनांचा मारा करायची. माझे शिक्षण खरेतर लहानशा गावात (परभणी जिल्ह्यातील जिंतूर तालुक्यातील येलदरी) झाले. (इथे पूर्णा नदीवर जलविद्युत केंद्र आहे). त्यामुळे आम्हाला पायीच शाळेत जावे लागे; शाळा घरापासून खूप जवळ होती. शाळेची घंटा घरापर्यंत ऐकायला यायची, माझे वडील त्याच शाळेत शिक्षक होते. म्हणून सगळे शिक्षकवृंद वडिलांचे मित्र होते. माझे भाऊ-बहीणही त्याच शाळेत होते.शाळेचे ठिकाणही निसर्गरम्य होते. अगदी तलावाच्या काठावर, प्रदूषणमुक्त (आमच्या गावांत एकही गाडी, रिक्षा नव्हती) हवेशीर परिसरात. त्यात शिक्षकही बहुतांश वेळा बाहेर झाडाखाली बसवूनच वर्ग घ्यायचे. घरातलं वातावरणही तसेच मोकळे पण थोडे शिस्तीचे, सणवार, नातेवाईकांची गर्दी, निरनिराळे धार्मिक, कौटुंबिक उत्सवांची मालिका असे होते. माझ्या शाळेतील वातावरण घराइतकेच सुरक्षित होते.

एकूणच निसर्ग, सणवार,संस्कृती, नात्यांची कोडी या सर्व गोष्टींसाठी कधीच पुस्तक हातात घ्यावे लागले नाही. कडधान्य, गळीत धान्य, अन्नधान्य यातील फरक समजायलाही पुस्तक हातात घ्यावे लागले नाही. आणि मला वाटते आपल्यापैकी बहुतांश जणांचे शिक्षण यापेक्षा वेगळे झाले नसावे.

तरीही आज आपण आपल्या मुलाला तिसऱ्या वर्षापासून चार भिंतीच्या आत चालणाऱ्या शाळेत नव्हे कोंडवाड्यात सोडून देतो. नुसते शिक्षणव्यवस्थेच्या नावाने खडे फोडतो; शाळा इतकी गल्लेलठ्ठ फी घेते तरीही तिथे काय गुणवत्तेचे शिकवले जाते. तिथे मुलांचे मानसशास्त्र जाणणारा शिक्षकवृंद आहे का? तिथे पालकसभेस आपणास बोलण्याचे स्वातंत्र्य आहे का? फी भरून रांगेत उभे राहून सुद्धा शाळेत प्रवेश मिळेपर्यंत डोक्यावर टांगती तलवार आहेच. एवढे करून चांगले शिक्षण मिळते आहे याचे समाधानसुद्धा नाही. का असे घडते आहे याचा विचार करायला थोडासा वेळ काढावा लागणार आहे. माझ्या 'चार भिंतीत शिक्षण नसते' या विचाराशी मी ठाम होते. म्हणून मी माझ्या मुलीसाठी शाळा निवडताना अतिशय अस्वस्थ झाले होते. बसमधला प्रवास, शाळेत पोहचण्यासाठी लागणारा वेळ, कापावे लागणारे अंतर त्यासाठी वय वर्षे तीनपासून झोपेचा करावा लागणारा त्याग आणि

एवढे करून मार्कावर आधारित गुणवत्तेचे अमानुष निकष या बाबींपासून तिला सुरक्षित ठेवण्यासाठी; यामुळे निर्माण होणाऱ्या तणावापासून तिला दूर ठेवण्यासाठी मी शाळा शोधत होते. शाळा नाही सापडली तर तिला घरीच शिकवावे या विचारापर्यंत मी पोहचले. त्यातच रमेश पानसे सरांच्या ग्राममंगल संस्थेचे शिक्षणसंदर्भातले नवनवीन संशोधनात्मक साहित्य वाचायला मिळाले आणि याच संस्थेत मुलीला घालण्याचा निर्णय घेतला. आज ग्राममंगलच्या या 'शिकत्या घरात' माझ्या सारखे ७० पालक आहेत. ते सर्वजण हाच विचार घेऊन आपल्या पाल्यासाठी मुक्त, आनंददायी शिक्षणासाठी पोषक वातावरण देण्याचा प्रयत्न करत आहेत. हा प्रयोग, हा प्रयत्न यशस्वीही होत असल्याचे आमच्या पाल्यांच्या रूपात आम्ही पाहात आहोत. या 'शिकत्या घरात' मुलांना घरासारखे वातावरण आहे. इथे गणवेश नाही, परीक्षा नाही, गृहपाठ नाही, शिस्त नाही पण स्वयंशिस्त आहे, मॅडम किंवा सर नाहीत इथे आहेत ताई, दादा, काका, मावशी. ही शाळा नसून खऱ्या अर्थाने शिक्षणासाठी पोषक वातावरण जाणीवपूर्वक निर्माण केलेले आमच्या मुलांचे घर आहे. खरे तर घरासारखी उत्तम शाळा दुसरी असत नाही. घर हे इतिहास, भूगोल, विज्ञान, गणित इतकेच काय पण सर्वात प्रमुख म्हणजे 'भाषा' शिकण्याचे मुख्य केंद्र असते. आपल्या घराची आणि परिसराची भाषा मूल शाळेत न जाताही उत्तम आत्मसात करतं याचा अनुभव आपणाला आला असेलच, त्याप्रमाणे भांड्याचे विविध आवाज, घरात वापरण्यात येणाऱ्या विविध वस्तू, उपकरणे, तंत्रज्ञान, घराचे स्थान, घरातील व्यक्तींची नावे, जन्मदिवस, आजी-आजोबांचा इतिहास, विशिष्ट मूळ गाव असेल तर त्याची माहिती या आणि अशा अनेक गोष्टींचा समावेश अभ्यासात करता येतो. 'स्वयंपाकघर' ही तर मुलांची अतिशय आवडती प्रयोगशाळा असते.

यासाठी आवश्यक साधनेही घरात असतात. यात आणखी एक महत्त्वाची गोष्ट घरात असते ती म्हणजे मुलाला शिकण्यासाठी लागणारे सुरक्षित, आनंददायी आणि मुक्त वातावरण.

मूल वय वर्षे ० ते २.५ पर्यंत वेगाने विकसित होते यामागे हेच कारण आहे. यानंतर ते रडके, चिडके, हेकेखोर आणि चिडचिडे व्हायला लागते कारण घरासारख्या एकदम सुरक्षित, प्रेमळ वातावरणातून ते 'शाळा' नावाच्या असुरक्षित, बंदिस्त वातावरणात प्रवेश करते. त्याचा 'घरात' तल्लख चालणारा 'मेंदू' शाळेतल्या असुरक्षित वातावरणामुळे शिकण्यापेक्षा तणावामुळेच थकायला सुरुवात होते. त्यामुळे घरासारखे वातावरण शाळेत असावे आणि शाळेसारखे म्हणजे आनंदी, सुरक्षित वातावरणात ज्ञान देणारे वातावरण घरात असावे.

घरात व शाळेत साम्य असावे. घरात एक वातावरण आणि शाळेत दुसरेच यामुळे मुलांचा ताण वाढतो आणि ताणामध्ये कधीच मूल चांगले बौद्धिक काम करू शकत नाही याचा अनुभव आपण आजही घेतो आहोत, ते तर जगाची नव्याने ओळख होणारे मूल आहे! त्यामुळे मुलांसाठी शाळा निवडताना शिक्षण कसं असावं? शिक्षणाचे प्रयोजन काय? शिक्षण म्हणजे काय? याविषयी पालकाच्या संकल्पना स्पष्ट व स्वच्छ असणे आवश्यक आहे.

पुस्तकातले पाठ करून, चांगले मार्क मिळवून गल्लेलठ्ठ पगाराची नोकरी करणारे यंत्र मला तयार करायचे आहे की, संवेदनशील मनाने दुसऱ्यांचे प्रश्न सोडविणारा,स्वतःच्या प्रश्नांना संपूर्ण मानसिक क्षमतेने हाताळणारा, जीवनाच्या प्रत्येक क्षणाचा आनंद होऊन माणूसपणाचा निर्व्याज, निस्वार्थ, निखळ, नितळ झरा बनून वाहणारा माणूस मला घडवायला आहे याचा विचार होण्याची वेळ आली आहे. रमेश पानसे सर आपल्या व्याख्यानात नेहमी सांगतात, ''आजवरचे शिक्षण हे वर्तनवादी मानसशास्त्रावर आधारित होते, शिक्षा होईल म्हणून



चांगले वर्तन करावे अशीच आपली मानसिकता यांमुळे घडली आहे. 'शिक्षा' होणार नाही असे कळताच यामुळे आपण स्वैर वर्तन करतो पण स्वयंशिस्तीने चांगले वर्तन करत नाही. याचाच अर्थ वर्तन बदलणारे शिक्षण घ्यायचे की वृत्ती बदलणारे शिक्षण घ्यायचे हे आपण ठरवणे गरजेचे आहे. वर्तन बदलणाऱ्या व्यवस्थेचा आधार होऊन वृत्ती बदलण्याचा असफल प्रयत्न आपण करत आहोत.''

याचाच अर्थ आपल्या 'शिक्षणाचे उद्दिष्ट' बदलण्याची आणि त्यानुसार व्यवस्थेत आवश्यक ते बदल घडवून आणण्याची गरज आहे. शिक्षण हे अनुभवाधिष्ठित आणि कृतिशील असावे. कोणत्याही गोष्टीचे संपूर्ण ज्ञान व आकलन होण्यासाठी कृतीतून अनुभव घ्यावा लागतो. जोपर्यंत तसे घडत नाही तोपर्यंत ती केवळ माहिती असते. कृतीतून, अनुभवाच्या माध्यमातून आत्मसात केलेली माहिती ज्ञानात रुपांतरीत होत असते आणि तीच संकल्पना समजवण्याची अवस्था असते. एखादी संकल्पना अनुभवाच्या पातळीवर स्पष्ट झाली की मगच त्यातला आनंद घेता येतो. उदा. ४ ते ५ महिन्याच्या बाळाला आपण जबरदस्तीने रांगायला लावत नाही, ते स्वतःच्या शारीरिक क्षमतेनुसार अनेक दिवस सराव करून ८ व्या महिन्यांपर्यंत रांगायला लागते, एकाच घरात दोन बाळं असतील तरी त्यांच्या शारीरिक विकासाच्या गतीत आपल्याला फरक जाणवतो. तिथे आपण ते अत्यंत प्रेमाने, संयमाने हाताळत असतो पण मूल 'शाळा' नावाच्या संस्थेत दाखल झाले की तो संयम, ते प्रेम केवळ तुलना व सामाजिक प्रतिष्ठा याकडे झुकतो आणि इथे प्रत्येकाच्या शारीरिक क्षमतेप्रमाणेच बौद्धिक क्षमताही वेगवेगळी असू शकते याचा विसर पडतो. यामुळे ते मूल ज्ञानाचा आनंद घेऊ शकत नाही कारण त्याला एखाद्या माहितीचा अनुभव होवून आकलन होण्यासाठी लागणारा वेळ देण्याची शाळेतील शिक्षकांची आणि घरातील आई-वडिलांची तयारी नसते.

ज्ञान मिळवण्याच्या आनंदाऐवजी मार्क मिळवण्याकडे मुलांचा/पालकांचा कल वाढतो आहे. यातून एकच घडते आहे, मूल मार्क मिळवून नोकरी मिळवते पण जीवनात संकट आले की ते सोडविण्याऐवजी व्यसनाच्या आहारी जाते किंवा आत्महत्या करते कारण मुलाला मार्क घेण्यासाठी पालकांनी spoon feeding करूनच मदत केलेली असते. यातून त्याची विचार प्रक्रियाच विकसित झाली नाही. प्रश्न समोर आला की काय करावे लागते? याचा विचारच आयुष्यभर त्या मेंदूने केला नसेल तर तो मेंदू मोठेपणी पण प्रश्न समोर आला की ठप्प होतो. कारण आयुष्यातील प्रश्न सोडविण्याचे

कोणतेही शास्त्रशुद्ध गाईड उपलब्ध नसते; इथे प्रत्येकाच्या प्रश्नपत्रिकेतला प्रश्न सारखा नसतो. आणि मग प्रश्न सोडविण्याऐवजी पळवाट शोधणे श्रेयस्कर समजले जाते. या संपूर्ण चर्चेवरून शिक्षण हे अनुभवाधिष्ठित, कृतिशील, विचारप्रक्रिया विकसित करणारे आणि ज्ञान देणारे असावे हे नक्की स्पष्ट झाले असेल. यावरून आपल्या वर्तनात नव्हे तर वृत्तीत बदल घडविणारे शिक्षण असावे; हेच शिक्षणाचे प्रयोजन असावे हे नक्की होते.

एकंदरीतच वृत्ती घडविणारे शिक्षण घेण्यासाठीचे आपले सामाजिक व कौटुंबिक वातावरण आहे याचा विचार इथे होणे आवश्यक आहे. सध्याची सामाजिक रचना, सामाजिक परिस्थिती हे आपल्या शिक्षणव्यवस्थेचेच फलीत आहे, असे म्हणता येईल. तेव्हा 'माणुसकीला' कलंक लावणारी ही सामाजिक रचना बदलण्यासाठी किंवा समाजाची संरचना बदलण्यासाठी शिक्षणाची दिशा बदलण्याची आवश्यकता आहे. शिक्षणाची दिशा बदलायची असेल तर संपूर्ण समाजरचनेलाच आपले 'पालककेंद्री' रूप बदलून 'बालककेंद्री' व्हावे लागेल. याचाच अर्थ आपल्या घरातील 'मुलाला' गृहीत न धरता एक व्यक्ती म्हणून त्याच्या व्यक्तिमत्वाचा, भावभावनांचा, मतांचा, विचारांचा आदर केला पाहिजे. मोठ्या माणसांच्या प्रत्येक कृतीतून त्याला आपली वृत्ती घडविणारे अनुकरणीय वर्तन निदर्शनास आले पाहिजे. उदा. जेव्हा आम्ही आमची मुलगी ग्राममंगलच्या 'शिकत्या घरात' पाठवायला लागलो त्या दिवसापासून आमच्या शाळेचे कोणतेही ताण वाट्याला आले नाहीत. उलट आमच्या वृत्तीत सकारात्मक व वर्तनात कृतिशील बदल घडून आले. आदर्श बोलण्याऐवजी आदर्श कृती आमच्या हातून घडायला लागली. पालकांचे बोलणे एक आणि कृती वेगळी असे असेल तरी मुले गोंधळलेल्या, असुरक्षित अवस्थेत असतात. पालक वारंवार खोटे बोलत असतील तर तेही मुलाला त्रासदायक ठरते. अशावेळी मुलाच्या वागण्यातील बदल त्याचा आगाऊपणा नसून घरातील मोठ्यांच्या वागण्या-बोलण्यातली तफावत आहे. असे जेव्हा येथील शिक्षणतज्ज्ञांच्या आणि मानसशास्त्रज्ञांच्या लक्षात येते. तेव्हा त्यावेळी ते आमच्या मानसिक अडचणींवर, प्रश्नांवर काम करायला आम्हाला मदत करतात त्यामुळे आमच्या मुलांबरोबर पालक म्हणून आम्हीपण घडत आहोत. म्हणूनच 'आम्ही घेतली आमच्या मुलांच्या शिक्षणाची जबाबदारी तन-मन-धनाने'. असे सांगावे वाटते. आमच्या ७५ पालकांच्या गटाच्या सहकार्यातून, सहभागातून हे 'शिकते घर' दररोज मुलाला,तेथील पालकाला आणि शिक्षकाला नवे ज्ञान देण्याचे केंद्र बनले आहे. यामुळे आम्हीच आमच्या मुलांना गुणवत्ताधिष्ठीत शिक्षण देण्याचे व्रत हाती घेतले आहे, या प्रकल्पाला शासकीय मान्यतेचे पाठबळ नसले तरी गुणवत्ता शिक्षण हा आमचा हक्क आहे या मतावर ठाम असणारा पालक वर्ग आहे!

■■■

**एखाद्या भव्य हेतूने तुम्ही प्रेरित होता, तेव्हा तुमच्या विचारांच्या शक्तीला मर्यादा रहात नाहीत, तुमचे मन, तुमचे अवघे अस्तित्व विशाल होते आणि तुम्ही एक नव्या जगात प्रवेश करता. तुमच्या अंतर्मनातील सुप्त शक्ती, कलाकौशल्ये जागृत होतात. तुम्ही तुमच्या स्वप्नातही कल्पिले नसेल, इतके समर्थ झालेले अनुभवता.**

**स्वत:चाच तुम्हाला नव्याने शोध लागतो.**

**ए. पी. जे. अब्दुल कलाम**

# शाळाव्यवस्थापन समिती–महत्त्वाचा दुवा

**नीला आपटे**

शिक्षण आणि समाज या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत असे म्हटले जाते. जेव्हा आपण शिक्षणासंबंधी विचार करतो तेव्हा त्या काळात अस्तित्वात असलेल्या समाजरचनेचाही विचार करणे आवश्यक असते आणि जेव्हा आपण समाजाचा अभ्यास करत असतो तेव्हा त्याच्या जडणघडणीची बीजे शिक्षणात आहेत हे लक्षात घ्यावे लागते. पूर्वीच्या काळी समाजामध्येच अनौपचारिक, सहज शिक्षणाची व्यवस्था होती. ती पिढ्यानपिढ्या, शतकानुशतके सक्रिय होती. अर्थात यातील बहुतांश शिक्षण हे उत्पादन प्रक्रियेशी, कुटुंबाच्या निर्वाहासाठी आणि व्यवसायाशी संबंधित होते. तसेच औपचारिक पद्धतीचे शिक्षण घेण्याचा अधिकार परंपरेने फक्त काही निवडक उच्चवर्णीयांनाच दिलेला होता. पण बहुजन समाज हा ज्ञानार्जनापासून, औपचारिक शिक्षणापासून हजारो वर्षे, पिढ्यान्‌पिढ्या १९ व्या शतकाच्या मध्यापर्यंत वंचितच राहिला होता. कालांतराने शाळा नावाची औपचारिक शिक्षण देणारी संस्था निर्माण झाली. मात्र तिचा विस्तार वसाहतवादी अमलात कूर्मगतीने झाला त्यामुळे सुरुवातीला शोषित, काबाडकष्ट करणारा वर्ग हा ज्ञानार्जनापासून दूरच राहिला होता. उच्चवर्णीय स्त्रिया देखील शैक्षणिक दृष्टीने वंचितांमध्येच होत्या. काही मोजक्या उच्चवर्णीयांची मक्तेदारी असणारे औपचारिक शिक्षण सुरुवातीला इंग्रजांच्या काळात आणि त्यानंतर स्वतंत्र भारतामध्ये सर्वांसाठी खुले करण्यात आले. कोणत्याही प्रकारचे भेद न मानता सर्वांना शिक्षणाची संधी मिळाली पाहिजे याची जनतेला जाणीव होऊ लागली आणि तिची अभिव्यक्ती भारताच्या राज्यघटनेत (संविधानात) झाली आणि शिक्षणव्यवस्था एका निर्णायक टप्प्यावर येऊन पोहोचली.

यानंतर राष्ट्रीय इ.स. २००२ मध्ये ८६ वी घटनादुरुस्ती झाली, ज्यामध्ये कलम २१ अ द्वारे ६ ते १४ वयाच्या मुलांना मोफत व सक्तीचे शिक्षण हा मूलभूत हक्क म्हणून मान्य करण्यात आला. या मूलभूत हक्काची घोषणा झाल्यानंतर इ.स. २००५ मध्ये मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार विधेयक तयार करण्यात आले आणि त्यानंतर चार वर्षांनी प्रथम राज्यसभेने व त्यानंतर लोकसभेने या विधेयकास मंजुरी दिली आणि २००९ च्या ऑगस्ट महिन्यामध्ये मुलांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००६ अस्तित्वात आला. (संदर्भः -What are the different Strategies and approaches to realizeright to Education in India - a study report by Shantanu Gupta, Institute of Development studie, Uni.Of Sussex ) १ एप्रिल २०१० पासून संपूर्ण देशात या कायद्याची अंमलबजावणी सुरू झाली. शिक्षण हक्ककायदा हा भारतीय शिक्षणव्यवस्थेतील अतिशय महत्त्वाचा, निर्णायक व प्रभावशाली टप्पा आहे, ज्यामध्ये व्यवस्था परिवर्तनाची बीजे लपलेली आहेत. इथल्या

जमिनीची, अर्थात समाजाची, योग्य पद्धतीने मशागत करून त्यात ही बीजे रूजवली तर नक्कीच गुणवत्तापूर्ण शिक्षणाचा प्रसार झपाट्याने होईल.

आजच्या घडीला शिक्षणहक्क कायद्याच्या रूपाने एक क्रांतीची मशाल समाजाच्या हातात आली आहे. याच्या मदतीने शिक्षणव्यवस्थेमध्ये अमूलाग्र परिवर्तन होऊ शकते. अर्थात यासाठी ही मशाल समाजाने, नागरिकांनी, पालकांनी, शिक्षकांनी, प्रामुख्याने शाळा व्यवस्थापन समितीने आपल्या हातात घेतली पाहिजे. आजपर्यंत अनेक शिक्षणतज्ज्ञ, थोर विचारवंत, यांनी समाजाला शिक्षणविषयक मार्गदर्शन करण्याची, शिक्षणाला एक दिशा देण्याची कामगिरी बजावली आहे. आता ही धुरा सर्वसामान्य जनतेच्या, पालकांच्या, ग्रामस्थांच्या हातात आलेली आहे. शाळा व्यवस्थापन समितीच्या माध्यमातून शाळेचे दैनंदिन कामकाज, मुलांची नावनोंदणी, मुलांची उपस्थिती, शिक्षकांची अध्यापन पद्धती, शाळेची शैक्षणिक प्रगती, शाळेच्या विकासाचे नियोजन (शाळेचा विकास आराखडा), भौतिक पायाभूत सुविधांची उभारणी अशा सर्वच बाबींमध्ये समाजाचा, ग्रामस्थांचा सहभाग महत्त्वपूर्ण मानला गेलेला आहे. शाळा व्यवस्थापन समितीच्या रूपाने शालेय शिक्षणक्षेत्राच्या विकेंद्रीकरणाचा अंतिम टप्पा खऱ्या अर्थाने गाठलेला आहे. त्याची सकारात्मक अंमलबजावणी झाली तरच शिक्षणक्षेत्राचे आजचे असमाधानकारक चित्र पालटू शकेल.

**शाळाव्यवस्थापन समितीचे कार्य कसे आहे....कसे हवे....**

शाळाव्यवस्थापन समितीला विविध स्तरावर वेगवेगळी कामे करावी लागतात. जेव्हा जेव्हा शिक्षण प्रक्रियेत लोकसहभाग मिळविण्याचा, लोकांना, पालकांना, एखादी गोष्ट पटविण्याचा, समजावण्याचा, काही आवाहन करण्याचा प्रसंग येतो तेव्हा शाळा व्यवस्थापन समितीलाच पुढाकार घ्यावा लागतो. शाळाव्यवस्थापन समितीमध्ये जशी एखाद्या शैक्षणिक कामासाठी लोकसहभाग मिळविण्याची क्षमता असते तशीच शासनाचा एखादा मुद्दा अथवा कार्यक्रम पटला नाही तर जनमताचा आधार घेऊन त्याला पर्याय देण्याची, गरज पडल्यास विरोध करण्याचीही सिद्धता असते. अर्थात, एखादा मुद्दा नेटाने, निग्रहाने तडीस नेण्याचा निर्धार शाळाव्यवस्थापन समितीने बाळगायला हवा. आपल्या अधिकारांची योग्य जाणीव असणारी शाळाव्यवस्थापन समिती अनेक निर्णयांबाबत ठाम भूमिका घेऊ शकते.

शाळाव्यवस्थापन समितीची सदस्य म्हणून या वर्षाच्या सुरुवातीला काही महिने आणि त्यानंतर शाळाव्यवस्थापन समितीची अध्यक्ष म्हणून काही महिने मी घेतलेले अनुभव, काही इतरांकडून ऐकलेले, येथे नमूद करणे उचित वाटते. शाळाव्यवस्थापन समितीने काय करायला हवे, ती काय करू शकते या गोष्टींचा ऊहापोह करण्यासाठी या घटना, प्रसंग विचारार्थ येथे मांडले आहेत. यावर विचार करत असताना शाळाव्यवस्थापन समितीच्या भूमिकेविषयी दिशा निश्चित करण्यास नक्कीच मदत होईल. अशाच मुद्याचा ऊहापोह इथे केला आहे.

**जिल्हा परिषद शाळांना व्यावसायिक वीजशुल्क–** मागच्या वर्षी एकदा एका जि. प. च्या शाळेत, शाळेचे वीजबिल भरण्यासाठी पालकांकडून पैसे घेतले गेले. काही पालकांनी त्याविषयी नाराजी व्यक्त केली. तक्रारही केली. त्यावेळेस मुख्याध्यापकांनी, शाळांना व्यावसायिक बिल लावले जात आहे असे सांगितले. मी गटशिक्षणाधिकाऱ्यांना जाऊन भेटले तर त्यांनीही व्यावसायिक शुल्क आकारणी हेच कारण देऊन पुढील वर्षी वाढीव अनुदान मिळावे अशी मागणी केलेली असल्याचे सांगितले.

खरे तर सरकारी शिक्षणव्यवस्था ही समाजाच्या तळागाळापर्यंत शिक्षण पोहोचविणारी लोककल्याणकारी व सार्वजनिक सेवा व्यवस्था आहे. सरकारी शाळांचा उद्देश व्यावसायिक मुळीच नाही. खासगी शाळासंस्थांना व्यावसायिक वीज शुल्क

आकारण्यास काहीच हरकत नाही. कारण बऱ्याच अंशी खासगी शाळा चालविणे हा एक व्यवसाय बनलेला आहे हे आपण आपल्या आजूबाजूला पाहतोच. परंतु सरकारी शाळांना व्यावसायिक ठरवून त्यांना व्यावसायिक वीजशुल्क आकारणे पूर्णपणे गैर आहे. एका बाजूला मोफत व सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाचा हक्क मुलांना देत असताना पोषण आहार, गणवेष, वह्या–पुस्तके ही शाळेत मोफत द्यायची आणि शाळेचे वीजबिल भरण्यासाठी मुलांकडून पैसे गोळा करावे लागावेत ही परस्पर विरोधी व हास्यास्पद गोष्ट आहे. शालेय अनुदान वाढवून मिळण्याचा प्रस्ताव देणे, तसे अनुदान वाढवून मिळणे, हे शक्य होईलही. परंतु मुळात सरकारी शाळांकडून व्यावसायिक वीज शुल्क आकारणे हेच अयोग्य व अन्याय्य आहे असे वाटते. असा सर्व बाजूंनी विचार करून शाळाव्यवस्थापन समितीच्या माध्यमातून या संदर्भात वरिष्ठांपर्यंत रीतसर तक्रार करून त्याचा पाठपुरावा करण्याचा निर्णय घेतला गेला व त्यानुसार मुख्य कार्यकारी अधिकारींना लेखी निवेदन देण्यात आले.

**इयत्ता पहिलीपासून सेमीइंग्लीश सुरू करण्याचा निर्णय–**

इयत्ता पहिली पासून सेमी इंग्लीश माध्यम सुरू करण्याचा प्रस्ताव सर्व जिल्हा परिषदेच्या शाळांकडून मागविण्यात आला. सिंधुदुर्ग जिल्हापरिषदेने हा निर्णय घेतला असल्याचे कळले. ही बातमी ऐकली आणि माझ्या मनात विचारचक्र सुरू झाले. हल्ली इंग्रजी माध्यमाकडे पालकांचा ओढा वाढला आहे. बहुतेक सुशिक्षित व सधन पालक आपल्या पाल्यांना खासगी इंग्रजी माध्यमाच्या शाळेतच घालतात. कष्टकरी वर्गातील अनेकजण ही आपल्या पोटाला चिमटा काढून का होईना आपल्या मुलांचे शिक्षण चांगले होईल या भाबड्या भावनेने उच्चवर्गीयांचे अनुकरण करत, आपल्या मुलांना इंग्रजी माध्यमाच्या शाळेत घालतात. सरकारी शाळांमधील मुलांची पटसंख्या झपाट्याने कमी होत आहे. अनेक शाळा पटसंख्ये अभावी बंद पडत आहेत. अशी परिस्थिती असताना सरकारी शाळाच जर इंग्रजी माध्यमाच्या केल्या तर मोठ्या प्रमाणात पालक पुन्हा सरकारी शाळांकडे वळतील अशी आशा वाटणे स्वाभाविकच म्हणावे लागेल. इंग्रजी भाषा प्रभावीपणे बोलता न येण्याचा न्यूनगंड अनेक प्रौढ माणसांना, पालकांना जाणवत असतो. त्यामुळे जणू काही आपल्या मुलाला इंग्रजी यावे हे एकच शिक्षणाचे उद्दिष्ट असल्याप्रमाणे कोणत्याही प्रकारची, दूरगामी परिणामांचा विचार न करता इंग्रजी माध्यमाचा स्वीकार करण्याकडे पालकांचा वाढता कल आहे. मुलांनाही नाइलाजाने ते स्वीकारावे लागते. पण मुळात भाषा शिकणे आणि समृद्ध करणे आणि परकीय भाषा माध्यम म्हणून वापरली जाणे यात खूप मोठा फरक आहे. २००९ मध्ये लागू झालेल्या शिक्षणहक्क कायद्याने मातृभाषेतून शिक्षणाचे महत्त्व जाणून 'Medium of instruction shall, as far as practicable, be in child's mother tongue' असे नमूद केले आहे (संदर्भ – मुलांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९) भारताचे शैक्षणिक धोरण ठरविण्यासाठी राष्ट्रीय स्तरावरती ज्या विविध समित्या, शिक्षण आयोग आजपर्यंत स्थापन झाले त्या सर्वांनीच मातृभाषेतून प्राथमिक शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित केलेले आहे.

१९२१ साली म. गांधीनी 'यंग इंडिया' मध्ये लिहिलेल्या एका लेखात म्हटले आहे की,'परक्या भाषेच्या माध्यमाने आमच्या मुलांच्या बुद्धीवर आणि त्यांच्या एकूण शक्तीवर विलक्षण ताण पडून ती थकून जातात. हे परके माध्यम त्यांना केवळ पोपटपंची आणि अनुकरण करायला शिकवते. कोणत्याही प्रकारचा मूलभूत विचार अथवा कृती करण्यास ती असमर्थ ठरतात आणि आपले ज्ञान आपल्या लोकांपर्यंतच नव्हे तर कुटुंबियांपर्यंतही पोहोचवू शकत नाहीत. परक्या भाषेच्या माध्यमाने ही मुले आपल्या स्वतःच्या देशातच परकी झालेली

आढळतात. हा मोठाच दैवदुर्विलास आहे. या परक्या भाषेने देशीय भाषांची वाढच कुंठीत केली आहे. मला जर सर्वंकष सत्ता प्राप्त झाली तर मी प्रथम ही परक्या भाषेतून शिकवण्याची पध्दत ताबडतोब बंद करीन आणि मातृभाषेतून शिकवण्याची सक्ती करीन. पाठ्यपुस्तकांसाठी मी थांबणार नाही. ती या बदलामागोमाग येतीलच. परक्या भाषेचे हे संकट ताबडतोब दूर होणे आवश्यक आहे.'

केवळ भारतातीलच नाही तर जगभरातील सर्व शिक्षणतज्ज्ञांनी मातृभाषेतून, अर्थात परिसराच्या भाषेतून शिक्षण होणे किती आवश्यक आहे हे वेळोवेळी सांगितलेले आहे. आपला राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा हा ज्ञानरचनावादाच्या सिद्धांतावर आधारलेला आहे. त्यानुसार पूर्वज्ञान व पूर्वानुभवांच्या आधारेच प्रत्येकाच्या मनामध्ये नवीन ज्ञानाची रचना होत असते. असे असताना ज्या मुलांची शाळेत पाऊल ठेवेपर्यंत ना घरात, ना परिसरात, कोठेही इंग्रजी भाषा ऐकलेली नाही, इंग्रजी भाषेतून संभाषण करण्याचा कधी अनुभव घेतलेला नाही, नजिकच्या भविष्यात तसे होण्याचा संभव नाही, अशा मुलांच्या मनात गणित व विज्ञानासारख्या विषयातील मूलभूत संकल्पनांच्या ज्ञानाची अर्थाची रचना कशी काय होणार? कोणत्या पूर्वज्ञानाच्या किंवा पूर्वानुभवांच्या आधारे? कशा त्यांना मूलभूत संकल्पना समजणार? ग्रामीण शाळामधून शिकणाऱ्या मुलांची बरेचदा ही शिकणारी पहिली पिढी आहे/ असते या वास्तवाचा विसर शैक्षणिक धोरण आखताना पडणे योग्य नाही.

मी व्यक्तिशः याला विरोध केला अजून एका शाळाव्यवस्थापन समितीच्या अध्यक्ष आणि सदस्य यांचाही या इंग्रजी सक्तीला विरोध होता. आम्ही तिघांनी मिळून या संदर्भातील आमचे म्हणणे मांडणारे एक निवेदन जिल्हा परिषद मुख्यकार्यकारी अधिकारी यांचेकडे सादर केले आहे. खरे तर हा निर्णय हा शिक्षणहक्क कायद्याची पायमल्ली करणारा आहे. बालकांचा मातृभाषेतून मिळणारे जीवनाभिमुख शिक्षण नाकारणारा, बालमानसशास्त्र, शिक्षणशास्त्र, यातील मूलभूत तत्त्वांच्या विरोधात जाणारा, आणि खरे तर राष्ट्रीय शैक्षणिक धोरणातील एक महत्त्वाचे मूल्य नाकारणारा आहे. त्यामुळे सर्वांनीच त्याला विरोध केला पाहिजे. हा झाला काही मोजक्या पालकांचा, शाळाव्यवस्थापन समित्यांचा विचार. परंतु अनेक सदस्य, शिक्षक, व पालकांना सेमी इंग्लीश हवे आहे. त्यामुळे जिल्हा परिषद सिंधुदुर्गने हा निर्णय पुढे नेण्याचा निर्णय घेतलेला आहे. अर्थात शाळाव्यवस्थापन समित्यांनी ठरविले असते तर त्या हे थोपवू शकल्या असत्या. तेवढी ताकद त्यांच्या निर्णयात नक्कीच आहे.

**शाळाव्यवस्थापन समितीच्या सभा–**

दर महिन्यातून एकदा शाळाव्यवस्थापन समितीची सभा व्हावी अशी अपेक्षा,नियम आहे. मात्र बरेच ठिकाणी या मासिक सभा नियमितपणे होतच नाहीत, झाल्याच तर त्यात ठरावीकच विषयांवर सभेच्या विषय पत्रिकेनुसार चर्चा होते. यामध्ये प्रामुख्याने पोषण आहार, अनुपस्थित विद्यार्थी, आगामी शालेय कार्यक्रम, झालेल्या कार्यक्रमांचा आढावा घेणे, स्पर्धांमधील शाळेचे यश, शाळेच्या भौतिक गरजा, इ. विषयी चर्चा होते. शाळाव्यवस्थापन समितीमध्ये एकच शिक्षक प्रतिनिधी असतो. त्यामुळे वर्गवार शैक्षणिक प्रगतीविषयी चर्चा, तपशीलवार मांडणी, होऊ शकत नाही. मी स्वतः एका शाळाव्यवस्थापन समितीत आहे. आमच्या शाळाव्यवस्थापन समितीच्या बैठकांमध्ये झालेल्या काही चर्चा शाळाव्यवस्थापन समितीची भूमिका समजून घेण्याच्या दृष्टीने खूपच बोलक्या वाटतात.

दि. २ जुलै २०११ या शाळाव्यवस्थापन समितीच्या बैठकीमध्ये विद्यार्थ्यांना गणवेष वाटपाचा विषय होता. यावर्षी शासनाने शाळेतील सर्व मुली व मागासवर्गीय मुलांना गणवेष द्यायचे ठरविले. मुलांची संख्या लक्षात घेऊन कापडच पाठविले. प्रत्येक मुलास दोन गणवेष देणे अपेक्षित होते. पण प्रत्यक्षात

दिलेल्या कापडात एकच गणवेष बसत होता. शिलाईसाठीची रक्कम अगदीच अपुरी व अव्यवहार्य होती. त्यामुळे शाळाव्यवस्थापन समितीच्या बैठकीमध्ये व्यवस्थित असा एकच गणवेष शिवून द्यावा असे ठरले. नंतर पालकसभा घेऊन त्यामध्ये हा विषय मांडला व एक गणवेष देऊ पण दोन गणवेषांवर सह्या घ्याव्या लागतील असे सांगितले. मी याला विरोध केला. आपण एकाच गणवेषावर सही घ्यावी, रीतसर वरिष्ठांकडे तक्रार करावी, दिलेल्या कापडात एकच गणवेष होणे शक्य होते असे स्पष्ट लिहून अहवाल द्यावा. सोबत शाळाव्यवस्थापन समितीचा ठराव जोडावा असे सुचविले. परंतु एकाही सदस्याने–पालकाने या गोष्टीला होकार दिला नाही. शेवटी मला शांत रहावे लागले.

अनेकांनी माझा मुद्दा त्यांना पटतोय असे सांगितले परंतु असे केल्याने मुख्याध्यापिका अडचणीत येतील, आपली एकच शाळा वेगळी पडेल, बाकी सर्व शाळांमध्ये अशाच पद्धतीने केलेले आहे, या वेळेस दोनवर सह्या करूया, पुढच्या वर्षी कापड घेतानाच त्याचा नीटपणे विचार करू या. सरकारने सर्वच फुकट द्यावे असे का म्हणायचे? एकच गणवेश व्यवस्थित घेऊ...अशी अनेक उत्तरे आली. मला मात्र ठामपणे वाटत होते की शाळाव्यवस्थापन समितीने काही स्वतःची अशी भूमिका घेण्याची हीच वेळ आहे. शासनाचे गोंधळाचे गैरव्यवहार झाकण्यासाठी आपण पालकांना खोटेपणा करायला का भाग पाडायचे? ही जबाबदारी शाळाव्यवस्थापन समितीने आपल्यावर का घेऊ नये?...पण माझे मत मांडण्यापलीकडे मी काहीच करू शकले नाही कारण शाळाव्यवस्थापन समितीही तितकीशी खंबीर नव्हती किंवा त्यांना झाल्या प्रकाराचे गांभीर्य लक्षात आले नाही किंवा अगतिक वाटले.

दुसरा एक प्रसंग शाळाव्यवस्थापन समितीच्या सभेतला. वर्ष २०११ च्या जुलै महिन्यातला. शाळाव्यवस्थापन समितीच्या विद्यमान अध्यक्षांच्या मुलाने दुसऱ्या शाळेत प्रवेश घेतला होता. त्या आता शाळेच्या पालक नव्हत्या. त्यामुळे नियमाप्रमाणे त्या शाळेच्या अध्यक्षा राहू शकत नव्हत्या. अध्यक्ष बदलावेत असा विषय मांडला. सर्वजण एकदम स्तंभित झाले. अध्यक्ष बाई खास मुख्याध्यापिकांच्या मर्जीतल्या होत्या. त्याच्या व्यक्तिगत कारणासाठी त्या रोजच शाळेत यायच्या. कुठेही सही करायला नेहमी उपलब्ध असायच्या. ही त्यांची जमेची बाजू. तर त्या दिवशी मी मांडलेल्या प्रस्तावाला अनेक कारणे देऊन सर्वानी स्थगिती दिली. उदाहरणार्थ ‘मुख्याध्यापिका डिसें. २०११ मध्ये निवृत्त होणार आहेत त्याच वेळेस अध्यक्ष बदलू म्हणजे बँकेमध्ये एकाच वेळेस खातेबदल करता येईल. पुन्हा पुन्हा ते करावयास नको, मुलाची आई या नात्याने त्या पालक नसल्या तरी त्यांची पुतणी याच शाळेत आहे. त्यामुळे त्या पालकच आहेत. त्या अध्यक्ष राहू शकतात. शैक्षणिक उठावात त्या मदत करतात. शाळेसाठी जास्तीतजास्त वेळ देऊ शकतात. मुख्याध्यापिका व उपाध्यक्ष. बाकी सर्व सदस्य, त्यांना अध्यक्ष ठेऊ नका म्हणून उगाच वाईटपणा का घ्यायचा अशा विचारात असावेत. (कदाचित मला अध्यक्ष व्हायचे आहे असेही काहींना वाटले असावे.) या चर्चा आहेत एका छोट्याशा शहरातील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेतील शाळा व्यवस्थापन समितीच्या बैठकीतील, जिथे बऱ्यापैकी सुशिक्षित आणि सर्वच्या सर्व सदस्य साक्षर तरी आहेतच. मला सतत वाटत राहिले आपण स्वतः ज्या समितीचे सदस्य आहोत त्या शाळाव्यवस्थापन समितीची निर्णय प्रक्रिया जर अशा पद्धतीची असेल तर खेडोपाडी, जिथे निरक्षर, अडाणी, कधीही सभेमध्ये बोलू न शकणारे पालक शाळाव्यवस्थापन समितीचे सदस्य म्हणून घेतले असतील तिथे कसे निर्णय होत असतील?......याची कल्पनाच केलेली बरी.

यानंतर काही महिन्यांनी मुख्याध्यापकांनी निवृत्त होण्यापूर्वी एक बैठक घेतली. त्यात अध्यक्षांनी

राजीनामा दिला व सर्व सदस्यानी मला समितीचे अध्यक्ष केले. हे एवढ्यासाठी सांगितले की, मी अध्यक्ष झाल्यानंतर आणि नवीन मुख्याध्यापिका नियुक्त झाल्यानंतर एकदा गट शिक्षणाधिकाऱ्यांचे एक पत्र माझ्या वाचनात आले ज्यामध्ये शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षस्थानी मुलांचे नैसर्गिक पालकच आहेत याची खात्री करावी,नसल्यास शाळेतील विद्यार्थ्यांची आई अथवा वडील (नैसर्गिक पालक) यांनाच तातडीने अध्यक्ष म्हणून नेमावे, अनेक शाळांमध्ये असे नसल्याच्या तक्रारी मुख्य कार्यकारी अधिकारी, जि. प. सिंधूदुर्ग यांच्याकडे आल्याने हे मुद्दाम कळविले आहे अशा आशयाचा मजकूर त्यात होता. याचा अर्थ, मी पाहिलेली एकच शाळा अशी नव्हती तर जिल्ह्यात अशा इतरही शाळा होत्या जिथे विद्यमान शाळाव्यवस्थापन समिती अध्यक्ष हे नियमबाह्य होते. प्रस्थापित, सत्ताधाऱ्यांचं पाठबळ असणारे, मुख्याध्यापक, शिक्षक यांच्या मर्जीतले किंवा असेच काहीतरी होते. २००९ च्या शिक्षणहक्क कायद्यानुसार शाळाव्यवस्थापन समितीकडे बरेच अधिकार दिलेले आहेत. त्यामुळे शाळाव्यवस्थापन समिती हे एक सत्ताकेंद्र बनू लागले आहे आणि त्यालाही राजकीय वलय प्राप्त होत आहे. शाळाव्यवस्थापन समितीतील अनेक सदस्यांना आपल्या पदाला असलेल्या अधिकारांची जाणीव असते. हे एका दृष्टीने सुचिन्हच आहे. परंतु अधिकार गाजविण्याचा मोका काही सदस्यांना आवरत नसल्याने आणि शाळा व शिक्षक यांच्याशी ते सतत विरोधाचीच भूमिका ते घेत राहिल्याने त्याचे विपरित परिणाम शालेय शिक्षणावर, तेथील वातावरणावर झालेले ही काही ठिकाणी दिसतात. शिक्षक आणि शाळाव्यवस्थापन समिती यांच्यात दुरावा, संघर्ष असतो. यामुळे काही फारसे साध्य होत नाही. आपल्याकडे असणाऱ्या अधिकारांचा देखावा करणे, काही शिक्षकांना निष्कारण त्रास देणे असे प्रकारही काही ठिकाणी घडतात. यामुळे शाळेच्या व्यवस्थापनात एकसूत्रता रहात नाही. निर्णय प्रक्रियेत पारदर्शकता रहात नाही. महत्त्वाची माहिती दडवून ठेवणे, उडवाउडवीची उत्तरे देणे, गटबाजी, झालेल्या चुकांची सारवासारव करणे, असे अनेक प्रकार घडू लागतात. शिक्षक व शाळाव्यवस्थापन समिती यामध्ये निर्माण झालेल्या तणावपूर्ण वातावरणामुळे शाळेच्या एकूण अध्ययन अध्यापनाचा दर्जा ढासळतो व विद्यार्थ्यांचे अतोनात नुकसान होते.

शाळाव्यवस्थापन समितीला शालेय व्यवस्थापनाचे विशेष अधिकार मिळालेले आहेत हे जरी खरे असले तरी फक्त अधिकार गाजविण्याने काही साध्य करता येणार नाही हेही तितकेच खरे आहे. शिक्षक शाळेत वेळेवर येतात किंवा नाही यावर लक्ष ठेवून भागणार नाही तर शाळेत आल्यानंतर ते काय काम करतात हे ही जाणून घेणे तितकेच महत्त्वाचे आहे. शाळेने तालुका, जिल्हा स्तरावर मिळवलेले यश पाहून हुरळून जाऊन चालणार नाही तर शाळेतील सर्व मुलांना आपले कलागुण जोपासण्याची संधी मिळते का, दिली जाते का हेही पहावे लागेल. दोन तीन मुलांनी शिष्यवृत्ती मिळविणे हे श्रेयस्कर असेलही, परंतु शाळेतील सर्व मुलांना त्या स्तरावरील अपेक्षित क्षमता प्राप्त झाल्या आहेत का हे पाहणेही तितकेच आवश्यक आहे आणि हे जर साध्य होत नसेल तर शाळाव्यवस्थापन समितीची भूमिका खूप मर्यादित स्वरूपाची, म्हणजे औपचारिक कर्मकांडाप्रमाणे राहील व प्रत्यक्ष गुणवत्ता वाढीमध्ये शाळा व्यवस्थापन समिती योगदान देऊ शकणार नाही. खरे तर शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठीही आपली काही भूमिका आहे हेच बऱ्याच सदस्यांना माहिती नसते. मुलांच्या शैक्षणिक प्रगतीचा आढावा घेणे व मागे राहिलेल्या मुलांसाठी शिक्षकांडून विशेष प्रयत्न केले जातील हे पहाणे ही शाळाव्यवस्थापन समितीची महत्त्वाची जबाबदारी आहे. परंतु या बाबतीत शाळाव्यवस्थापन समिती चे सदस्य बव्हंशी अनभिज्ञ असतात. किंबहुना त्यांना तसे ठेवले जाते.

शिक्षण सक्तीचे केले असल्याने व जागोजागी पटनोंदणी मोहीम राबविली जात असल्याने आता शाळेत नावनोंदणी करणाऱ्यांचे प्रमाणही बऱ्यापैकी वाढलेले आहे. सर्व जाती, जमाती, भटक्या विमुक्त जमातींची मुलेही शाळेत येवू लागली आहेत. शासनाच्या एकूण योजनांमुळे (आश्रमशाळा, वस्तीशाळा, कस्तुरबा शिक्षण केंद्र इ.) अतिशय प्रतिकूल परिस्थिती असणाऱ्या मुलांनाही शाळेत येणे आता शक्य झाले आहे. पालकांचीही मानसिकता बदलत आहे. आपले जरी भटकंतीचे काम असले तरी आपल्या मुलांनी शिकावे अशी त्यांना तळमळ आहे. आश्रमशाळा, मुलांची वसतीगृहे, सामाजिक संस्था, नातेवाइकांची घरे अशा अनेक ठिकाणी मुलांची निवासव्यवस्था व्हावी यासाठी पालक प्रयत्न करतात व त्यांच्या शिक्षणात खंड पडू नये याची काळजी घेऊनच कामासाठी स्थलांतरित होणाऱ्या पालकांची संख्याही आता वाढू लागली आहे. आपले मूल शिकून सवरून मोठे होईल, शहाणे होईल, कुठे तरी नोकरी मिळवेल, पैसे कमवेल, स्थिर होईल, उदरनिर्वाहासाठी आपल्यासारखे त्याला वणवण भटकावे लागणार नाही, अशा भाबड्या आशेपायी ते आपल्या मुलांना शाळेत घालत असतात, ही वस्तुस्थिती आहे. ही सगळी परिस्थिती लक्षात घेतली तर पालकांनी मुलांच्या अभ्यासाकडे लक्ष दिले तरच ती शिकू शकतील, किमान क्षमता प्राप्त करू शकतील. असे शिक्षकांचे म्हणणे निरर्थकच म्हणावे लागेल. त्या त्या इयत्तेला ठरवून दिलेला अभ्यासक्रम, किमान अपेक्षित क्षमता या शाळेतील शिक्षकांनीच शिकविल्या पाहिजेत, ती पूर्णपणे त्यांचीच जबाबदारी आहे. पालकांना यासाठी जबाबदार धरता येणार नाही. हे निर्विवाद सत्य आहे. पुढचा प्रश्न उरतो तो हा आग्रह कुणी धरायचा याचा! शासनाने याची जबाबदारी शाळाव्यवस्थापन समितीवर सोपविली आहे. शाळाव्यवस्थापन समितीच्या जबाबदाऱ्यांमधील क्र. ५, १० व १७ (महाराष्ट्र-शासन निर्णयक्र. २१७/प्राशि १) नुसार शाळेतील मुलांच्या शैक्षणिक प्रगतीचा आढावा घेणे, शाळेतील शिक्षक आपल्या कर्तव्यांचे पालन करतात किंवा नाही हे पाहणे, तसेच शालेय कामकाजाचे संनियंत्रण करणे ही सर्व कामे शाळाव्यवस्थापन समितीची आहेत. त्यामुळे ठरावीक इयत्तेमध्ये शाळेतील प्रत्येक मुलाला अपेक्षित क्षमता प्राप्त होतील याचा आग्रह पालकांच्या वतीने शाळाव्यवस्थापन समितीने धरणे अत्यंत आवश्यक आहे. ही जबाबदारी चोखपणे बजावली जावी यासाठीच बहुतेक शाळा व्यवस्थापन समितीच्या निकषांमध्ये, वेगवेगळ्या स्तरावरील संपादणूक असणाऱ्या मुलांच्या पालकांचे प्रतिनिधित्व असावे असे म्हटले आहे. कारण वर उल्लेखलेल्या उदाहरणानुसार शाळाव्यवस्थापन समिती मधील सर्व सदस्यांची मुले जर अभ्यासात प्रगत असतील तर ते सदस्य इतर मुलांच्या अध्ययनक्षमता प्राप्तीचा आग्रह धरण्यास उदासीन असू शकतील. त्यामुळेच विविध नैपुण्य पातळीवरील (निम्न, मध्यम, व उच्च) विद्यार्थ्यांच्या पालकांचे प्रतिनिधित्व असावे हा निकष अत्यंत महत्त्वपूर्ण आणि दूरदर्शी आहे असे मला वाटते.

शिक्षणहक्क कायदा आणि व्यवहार याचा एकत्रितपणे विचार करताना, 'शिक्षण' जिथे होते त्या शाळेच्या कामकाजाचे संनियंत्रण करणे ही ज्याची जबाबदारी आहे त्या शाळाव्यवस्थापन समितीचे, शिक्षण आणि समाज यांच्यातील संबंध-व्यवहार ज्याच्या माध्यमातून होतो त्या शाळाव्यवस्थापन समितीचे शैक्षणिक कामातील महत्त्वाचे स्थान लक्षात घ्यावेच लागेल.

शिक्षणहक्क कायद्याची अर्थपूर्ण अंमलबजावणी शाळाव्यवस्थापन समितीच्या सहभागाशिवाय आणि त्यासाठी त्याच्या सक्षमीकरणाशिवाय पूर्ण होऊ शकणार नाही.

**सौजन्य : साधना प्रकाशन**

# || अनुभव ||

## शिक्षणविषयक दृष्टिकोन बदलायलाच हवेत

**सुधीर मुतालीक**

' टच में नहीं हु, सर. अब तीन महिने हो गये, कॉलेज से बाहर आकर.'क्वालिटी कंट्रोल इंजिनियरच्या पदासाठी मुलाखत देणाऱ्या उमेदवाराने हे सांगितलं. त्याचे नाव पाटील. म्हणजे मराठी मुलगा. पण मी इंग्रजी मधून विचारलेल्या एका प्रश्नाला त्याने असं हिंदी मधून उत्तर दिलं. मुलाखतीची सुरुवात मी मराठीत केली होती. त्यामुळे मी मराठी भाषक नाही असा त्याचा गैरसमज नक्की नव्हता.

१९९६ साली सुरू झालेल्या माझ्या व्यवसायाची २000 सालामध्ये गरज आता माणसं उभी करण्याची होती, संस्था उभी करण्याची होती. त्यामुळे उद्योगाला आवश्यक असणाऱ्या वेगवेगळ्या खात्यांसाठी 'योग्य' माणसं शोधायच्या एक कलमी कार्यक्रमात स्वत:ला मी गुंतवलं होतं. खरेदी, सेवा, उत्पादन, अकौंटस, वगैरे खात्यांसाठी शेकडो उमेदवारांच्या मुलाखती काही महिन्यामध्ये घ्याव्या लागल्या आणि हादरलोच! अंतर्बाह्य हादरलो!! वेगवेगळ्या विषयातल्या पदवीधरांची स्थिती ज्या विषयात त्यांनी पदवी घेतली आहे त्या विषयातल्या अगदी सामान्य किंवा मूलगामी मुद्यांची चर्चा चालू केली की 'टच में नहीं हु, सर......' अशीच होती. म्हणजे अभियंत्यांशी गोलाकार पाण्याच्या टाकीचे घनफळ किंवा व्हर्नियर कॅलिपरचे लघुत्तम मोजमापन, व्याजदराच्या संकल्पना अशा साध्यासाध्या मुद्यांवर चर्चा होऊ शकली नाही. त्यानंतर मी नावाजलेल्या शैक्षणिक संस्थेतून उमेदवार मुलाखतीला बोलावू लागलो. पण अपेक्षाभंगाचे धक्के वाढतच गेले. यात अपेक्षा त्यांनी एखाद्या प्रश्नाचे सूत्र रूपाने उत्तर द्यावे अशी नव्हती. शोध होता एका वृतीचा, अभियंत्याकडून अभियांत्रिकी वृत्तीचा. पाण्याच्या टाकीच्या घनफळाकडे पोचण्याच्या लॉजिकचा. या लॉजिकचा अभाव मात्र उद्विग्न करणारा होता आणि आहे. सुमारे सोळा वर्षे ऐन उमेदीची गुंतवणूक केल्यावरही एखाद्या प्रश्नाच्या मुळाशी जाण्याची वृत्तीच निर्माण न करू शकणाऱ्या



शिक्षणाचा उपयोग काय ? यात पराभव कशाचा आहे ? कुणाचा आहे ?

मी या पराभवाचे विच्छेदन करताना 'व्यवस्था' किंवा 'सरकारचे शिक्षण विषयक धोरण' याकडे येणार नाही. कारण ते समाज रोजच या ना त्या निमित्ताने करत असता आणि ते मला आजमितीस अमान्य आहे. या पराभवाची चिरफाड करताना एक प्रश्न त्या मंथनातून बाहेर येतो तो म्हणजे 'शिक्षण या विषयाचा अर्थ समाजाने आज काय लावलाय?' 'समाजाने' हे फार जनरल होतंय. त्यामुळे आपण प्रत्येक समाज घटकापर्यंत म्हणजे प्रत्यक्ष एका कुटुंबापर्यंत येऊ या. कारण समाज कुटुंबांनी बनतो. कुटुंब व्यक्तींनी बनतं. त्यामुळे प्रश्न असा आहे की शिक्षणाचा अर्थ प्रत्येक कुटुंबाने काय लावलाय? मला गोची इथेच दिसते. व्यवस्थेमध्ये नाही. साधारणपणे वीसवर्षा पूर्वी म्हणजे १९९० ते १९९३ च्या दरम्यान पदवी धारण केलेल्या विद्यार्थ्यांचे वय आज चाळीस बेचाळीसच्या आसपास असेल. त्यांना आपआपल्या क्षेत्रात नोकरी व्यवसाय केल्याचा वीसेक वर्षांचा अनुभव असेल. हे सगळे या देशात जागतिकीकरणाचे तोरण लागताना विद्यार्थी म्हणून बाहेर पडले आणि उदारीकरणाच्या सनईचौघड्यांचे सूर हवेत विरायच्या सुमारास पालक म्हणून जन्माला आले. त्यांनी नवीन पद्धतीने चालणाऱ्या बँका, कारखाने, इस्पितळे, मॉल्स इत्यादी बघितलंय, अशा ठीकाणी कामही केलय. पण या बहुतेक बहाद्दरांनी आपल्या पाल्याच्या शिक्षणाचा विचार किंवा त्या विषयीचे धोरण हे त्यांच्या पालकांचे – म्हणजे सुमारे पस्तीस वर्षा पूर्वीचेच–ठेवले आहे. इंजिनियरिंग किंवा मेडिकलला प्रवेश! आणि त्यासाठी प्रचंड कौटुंबिक हाणामारी! म्हणजे ज्या क्षेत्रात एखादा काम करतो आहे, त्याच्या आयुष्यातला सगळ्यात महत्वाचा वेळ देतो आहे (आणि जे त्याच्यासाठी आणि त्याच्या कुटुंबासाठी सगळ्यात महत्वाचे आहे) तिथे त्याच्या आणि त्याच्या सहकाऱ्यांच्या शालेय आणि महाविद्यालयीन शिक्षणाची नेमकी भूमिका काय? किंवा त्या आत्मसात केलेल्या पदवीची व्यावहारिक जगामध्ये काय भूमिका असते ? याचा विचार करूनच कुटुंबाचे पाल्यांसाठीचे शैक्षणिक धोरण ठरवले गेले पाहिजे ना ? आणि त्या धोरणाला अनुसरून मार्गदर्शकाची भूमिका घरामध्ये बजावली पाहिजे ना ? दुर्दैवाने असे दिसत नाही. हा ही पालक वर्ग इंजिनियरिंग किंवा मेडिकलला प्रवेश या साठमारीत अडकला आहे. 'शिक्षण' या संकल्पनेचा अर्थ त्यांनी 'प्रतिष्ठापना' असाच लावलाय. म्हणजे शिक्षण पदवीसाठी आणि पदवी स्थापना होण्यासाठी एव्हढाच लावलाय. हा काही व्यवस्थेचा दोष नाही. हा व्यक्तीचा दोष आहे. म्हणजे प्राथमिक किंवा माध्यमिक शाळेमध्ये विज्ञानाविषयी गोडी निर्माण व्हावी म्हणून वैज्ञानिक प्रकल्पांची स्पर्धा भरविण्यात येतात. काही प्रदर्शनात विद्यार्थ्यांनी भाग घ्यावा म्हणून सरकार पाच हजार इतकी रक्कम विद्यार्थ्यांना एका योजनेअंतर्गत देते, ते विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचतात देखील. घरोघरीच्या पालकांना ही संधी आहे, त्यानिमित्ताने आपल्या पाल्याला विचार करायला प्रवृत्त करावे. त्याला निरीक्षण करायला लावावे.पण अशा चक्कर मारल्यानंतर प्रदर्शनातून चक्कर मारल्यानंतर असे लक्षात येते की बहुतेक प्रकल्प हे पालकांनी तयार केलेले असतात किंवा शिक्षकांनी विद्यार्थ्यांना दिलेले असतात, रेडिमेड! पालकांनी त्यातली संधी न ओळखता केवळ त्यातून नंबर मिळविण्याच्या हावरटपणा करायचा हे चक्रावणारे आहे. या पालकांना अनुभवातून आपल्या पाल्याला कसे घडवावे हे कळत कसे नाही ? पाल्याच्या शालेय शिक्षणाचा रोजच्या जगण्याशी सबंध लावण्याचे काम पालकांचे आहे. पण किती पालकांना विशेषत: बाबांना आपल्या पाल्याची पुस्तकं वाचावीशी वाटतात कोण जाणे आणि म्हणून असा प्रश्न पडतो की यांना शिक्षणाचा अर्थ तरी समजतो का? आणि ज्यांना शिक्षणाचा अर्थ ही समजत नाही अशा समाजाकडून

केल्या जाणाऱ्या व्यवस्थेविषयक भाष्याला अर्थ तरी काय ? त्यांना मुळातच व्यवस्थेतील काही दोष दाखवायचा नैतिक अधिकार तरी आहे का ? म्हणून असे वाटते की एकूणच समाजाचे 'मूलगामी शिक्षणाचा अर्थ' समजून सांगण्याचे सातत्याने प्रशिक्षण वर्ग असावेत.

शिक्षणाविषयीचा दृष्टिकोन आधी बदलायला पाहिजे. या अपेक्षेच्या पार्श्वभूमीवर अत्यंत दिलासा देणारे केले गेलेले प्रयत्न म्हणजे पुण्यातील माझे मित्र समीर शिपूरकर यांनी बनविलेले तीन माहितीपट. यातले दोन माहितीपट हे प्रातिनिधिक स्वरूपात शिक्षणाचा रोजच्या जगण्याशी थेट संबध लावणाऱ्या महाराष्ट्रातल्या दोन शाळांच्या कामकाजाविषयी आहेत. 'विज्ञान आश्रम' नावाने चालणारा हा प्रयोग जगण्यातले विज्ञान शिकवतो आणि पुस्तकातले विज्ञान प्रत्यक्ष जगायला शिकवतो. दुसरा माहितीपट 'मूलगामी' नावाचा. या माहितीपटामधली शाळा भरते कोल्हापुरात 'सृजन आनंद' नावाने. जी प्राथमिक स्वरूपातली म्हणजे त्या वयातल्या मुलांसाठी आहे. त्या वयातल्या मुलांचा त्यांना ज्या घटना, खेळ, गाणी, कार्यक्रमातून निखळ आनंद मिळेल त्या वेगवेगळ्या माध्यमातून त्या वयाला झेपेलसे शिक्षण देणारी शाळा. तिसरा माहितीपट प्रसिद्ध शिक्षणतज्ज्ञ डॉ श्री अनिल सदगोपाल यांच्या मुलाखती विषयीचा. या तीनही माहितीपटांची निर्मिती एका महत्त्वाच्या मुद्याला स्पर्श करते तो म्हणजे 'कृतीशील शिक्षणाचा', काम करत शिकण्याचा आणि मला हाच शिक्षणाचा मूलगामी विचार वाटतो. पाठ करून नंबर मिळविण्याची इतकी सवय झालेल्या समाजाला हे माहितीपट पाहिल्यावर 'हे कसे काय बुवा शक्य आहे ?' असा प्रश्न पडतो इथेच मला एक मोठा पराभव दिसतो. म्हणजे मुख्यप्रवाहामध्ये कृतिशील शिक्षणाचा पर्याय कसा आणणार असा माझ्या मित्राने मला विचारलेला प्रश्न झोंबलाच. कारण मुख्यप्रवाहामध्ये कुठले ? ते की हे ? म्हणजे पाठ करायला लावणारे शिक्षण की कृतीशील शिक्षण ? मुळ संकल्पनेतच गोची असल्याने या माहितीपटांचे महत्व अनन्यसाधारण आहे असे मला वाटते. आणि खऱ्या अर्थाने 'मुख्यप्रवाहामध्ये' शिक्षण देणाऱ्या शाळांचे प्रयोग सुरू आहेत त्यांच्या विषयीच्या माहितीचा फैलाव करण्याचे काम हे पट करत आहेत त्यामुळे मला समीरला सलामच ठोकावासा वाटतो. या माहितीपटांचा रोख शाळा किंवा एकूणच व्यवस्था आहे की नाही या विषयी फार मला लिहावयाचे नाही आणि कर्तव्यही नाही. पण समस्त समाजाने या माहितीपटांची पारायणे करावयाची गरज मला नक्की वाटते. कारण शिक्षणाच्या मूलगामी विचाराविषयी वास्तववादी समाज मन तयार झाल्याशिवाय संपूर्ण व्यवस्था बदलणार नाही. मुलांच्या बुद्धीचा विकास करणारे शिक्षण आवश्यक आहे हे प्रत्येक व्यक्तीला पटल्याशिवाय शिक्षणव्यवस्थेचे पुनर्निर्माण होणार नाही. एका बाजूला महासत्तेची स्वप्ने बघणाऱ्या या समाजाला पाठांतर करणारी पिढी त्यांचे स्वप्न धुळीला मिळविणार आहे हे ताबडतोब कळण्याची आवश्यकता आहे. २००८ च्या तुलनेत २०११ सालामध्ये मुंबई विद्यापठीत पीएचडी करणाऱ्या संशोधकांची संख्येने ५८ % इतकी घसरण झाली आहे. नंबर मिळवण्याच्या हावरटपणामुळे रेडीमेड प्रकल्प शालेय जीवनातच दिल्या जाणाऱ्या समाजात संशोधक वृत्ती बळावेल कशी ? आणि संशोधकांची गळती लागलेला समाज महासत्ता कसा होणार ? या माहितीपटांच्या निमित्ताने आज ही चर्चा होते आहे हे ही नसे थोडके.

■■■

---

समता व गुणवत्ता या दोन्ही गोष्टींमध्ये अजिबात द्वंद्व नसून
शिक्षणात गुणवत्ता नसेल तर समता येणे केवळ अशक्य आहे.

# महाराष्ट्र बालशिक्षण परिषदेची वाटचाल

जेवढे महत्त्वाचे तेवढेच दुर्लक्षित, विस्कळीत, अशास्त्रीय, असुरक्षित असे बालशिक्षणाचे क्षेत्र आहे. आजच्या बालशाळा, बालकेंद्री आणि शास्त्रीय पध्दतीने कशा चालतील हा कळीचा प्रश्न ठरू शकतो. हे जाणून घेण्यासाठी, बालशिक्षणाच्या क्षेत्रात काही चांगले घडवू पहाणाऱ्यांसाठी एकत्रित व प्रभावी प्रयत्न करण्यासाठी समाजाच्या जागृतीचे काम प्रभावीपणे होणे फार जरूरी असते. संपूर्ण राष्ट्राच्याच पातळीवरती हे घडायला हवे आहे. परंतु महाराष्ट्र राज्य पातळीवर 'महाराष्ट्र बालशिक्षण परिषद' उभी करून एक नव्या आंदोलनाची, नव्या पर्वाची सुरुवात झाली असे म्हणता येईल. देशव्यापी संघटना उभी राहण्याची ही पहिली पायरी आहे. परिषदेची पहिली तीन अधिवेशने राम जोशी यांच्या अध्यक्षतेखाली भरवली गेली. त्यानंतरच्या चार अधिवेशनाचे (अनुक्रमे, १९९८ रत्नागिरी, १९९९ वर्धा, २००० नांदेड, २००१ कोसबाड व २००२ नाशिक) अध्यक्ष थोर बालशिक्षणतज्ज्ञ व शैक्षणिक क्षेत्रातील प्रयोगशील व्यक्तिमत्व श्री. रमेश पानसे हे होते. या काळात बालशिक्षणावर आधारित काही शोधनिबंध सादर झाले. राज्यस्तरीय बालशिक्षण समितीच्या शिफारशींमागील भूमिका –सुषमा पाध्ये. राम जोशी अहवालातील शैक्षणिक सप्तपदीमागील विचार–मीना वानखेडे, राम जोशी समितीच्या शिफारशी व कायदा – माधुरी देशपांडे, बालशिक्षण म्हणजे काय – श्रीमती बलंग, बालशाळेतील सिद्धातांधारित नियोजन –सुचेता पाडळकर, भावनिक बुद्धिमत्ता व बालस्वातंत्र्य–कुंदाताई वर्तक, बालशाळेत करता येण्याजोगे बालस्वातंत्र्याचे उपक्रम–संगीता पाटणकर, बालस्वातंत्र्याचे सामाजिक परिमाण–बीना जोशी, बालस्वातंत्र्याधारित कुटुंब–भारती मराठे, बालकाच्या शैक्षणिक प्रगतीत बालस्वातंत्र्याला स्थान – श्वेता साठे, बालकाचा विकास–पालक एक सर्वेक्षण – डॉ. करुणा, दीपक कुशारे, बालकाचा विकास–पियाजे यांचे बालविकासाच्या बौध्दिक विकासातील योगदान–डॉ. अनंत जोशी व डॉ. संजीवनी महाले, बालशिक्षण–पाश्चात्य देशातील संशोधन–डॉ. कविता साळुंके व डॉ. शशी गायकवाड, बालशिक्षण–भारतीय संशोधन–विजया पाटील, व्हॅगोटस्कीचे शैक्षणिक विचार–सुषमा पाध्ये, हॉवर्ड गार्डनर यांचा बुध्दिमत्तेविषयी नवा सिध्दांत –रमेश पानसे अशा काही महत्त्वाच्या निबंधांवर या अधिवेशनातून चर्चा करण्यात आली. परिषदेने आपल्या स्थापनेच्या अधिवेशनातच दोन ठराव, महाराष्ट्र शासनाला विनंती करणारे केले होते.

- यश पाल समितीचा अहवाल स्वीकारावा;
- बालशिक्षणविषयक धोरण निश्चित करावे, व त्यासाठी एक शासकीय तज्ज्ञांची समिती नेमावी.

शासनाने या सूचना त्वरित स्वीकारून, परिषदेचे अध्यक्ष प्रा. राम जोशी यांच्याच अध्यक्षतेखाली

'राज्यस्तरीय बालशिक्षण समिती' निर्माण केली. (सप्टें. १९९५)

या समितीने आपला अहवाला शासनाला सादर केला (जाने. १९९६) तो पूर्णतया स्वीकारल्याचे मुख्यमंत्र्यांनी जाहीरही केले. त्यानंतर यासंदर्भात, रामजोशी समितीच्या केवळ एका शिफारसीवर आधारित असा कायदा शासनाने केला. (१९९६) काही अल्पसंख्यांकांच्या शाळांनी विरोध केला. म्हणून शासनाने त्यास एक वर्षासाठी स्थगिती दिली. (जून १९९८) पुढील वर्षीही अशीच आणखी एक वर्षासाठी स्थगिती दिली. (जून १९९९)

**बालशिक्षण विषयक समाजप्रबोधनाचे कार्य**

- परिषदेने ठिकठीकाणी शाखाविस्तार करून बालशिक्षणविषयक समाजप्रबोधन कार्यासाठी यंत्रणा बांधण्याचे ठरविले आहे. सध्या अशा काही शाखा कार्यरत झाल्या आहेत. उदा. पुणे विभागीय शाखा, कोल्हापूर, नांदेड, सोलापूर, अहमदनगर या जिल्हा शाखा. अशाच शाखा इतर जिल्ह्यांच्या ठिकाणी उघडण्याचा परिषदेचा मानस आहे.
- परिषदेतर्फे तसेच परिषदेच्या शाखांकरवी, व्याख्याने, चर्चासत्रे, कार्यशाळा, प्रदर्शने, शिबिरे, बालनगरी, बालशिक्षणात रस आहे अशा व्यक्ती व संस्था यांना परिषदेचे सदस्य म्हणून नोंदविण्याचा मोठ्या प्रमाणावर प्रयत्न केला जात आहे. मातृप्रबोधन वर्ग अशा विविध कार्यक्रमांचे नित्य आयोजन केले जाते.
- परिषदेतर्फे व परिषदेच्या शाखांतर्फे, बालशिक्षणाशी संबंधित अशा व ज्यांना एक वर्ष मुदतीचा परिषदेने तयार केलेला अभ्यासक्रम खालील ठिकाणी चालविण्यास परिषदेने परवानगी दिली आहे. दाभोण (जि.ठाणे), मुलूंड (मुंबई), पुणे.

**बालशिक्षण संशोधन व विकास केंद्राचे कार्य**

या केंद्राचे औपचारिक उद्घाटन, डॉ. वि. गो. कुलकर्णी यांच्या हस्ते, १५ नोव्हेंबर १९९५ ला झाले. त्यानंतरच्या काळात पुढील कार्य करण्यात आले.

- एक वर्ष मुदतीचा 'बालशाळा शिक्षक–प्रशिक्षण' अभ्यासक्रम तयार करणे. त्याची प्रायोगिक स्वरूपावर चाचणी, मूल्यमापन व त्यानुसार सुधारणा. हाच अभ्यासक्रम महाराष्ट्र शासनानेही, आपला अभ्यासक्रम म्हणून स्वीकारावा यासाठी प्रयत्न केला गेला.
- दहा दिवसांचा एक 'व्यवस्थापकीय' अभ्यासक्रम केंद्राने तयार केला असून तो वर्षांतून दोन वेळा प्रशिक्षण म्हणून दिला जातो.
- स्वयंशिक्षणावर आधारित असा प्रयोगिक स्वरुपावरील दीड वर्षे मुदतीचा 'पदव्युत्तर पातळीवरील अभ्यासक्रम' केंद्राकडून राबविला जात आहे. या वर्गाचा दुसरा गटअभ्यास सध्या चालू आहे.
- 'मूल्ये' या विषयावर दीर्घ चर्चासत्र आयोजित करून त्याची व्यावहारिक निश्चिती करण्यात आली.
- संशोधन केंद्राचे संदर्भ ग्रंथालयही निर्माण करण्यात आले आहे.

परिषदेची वाटचाल अशी काहीशी धिम्या गतीने परंतु सातत्यपूर्ण चालू आहे. तळमळीचे कार्यकर्ते व आर्थिक सहभाग उचलणाऱ्या स्वयंसेवी संस्थांची आजही परिषदेला आत्यंतिक गरज आहे. हे समाजकार्य सगळ्यांच्या एकत्रित प्रयत्नातूनच होणार आहे.

***(क्रमशः)***

**प्रतिनिधी**

**वृत्त विशेष**



# मराठी शाळांच्या मान्यतेचा निर्णय

मराठी शाळांच्या मान्यतेच्या संदर्भात जुलै २०१२ मध्ये राज्यव्यापी आंदोलन झाले. या संदर्भात शासनाने सकारात्मक पावले उचलली आहेत. माननीय मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी मराठी शाळांचे सर्व प्रश्न तातडीने सोडवणार असल्याचे आश्वासन त्यांच्याशी शिष्टमंडळाची जी बैठक झाली त्यात दिले आहे.

शिक्षण हक्क समन्वय समिती आणि मराठी अभ्यास केंद्राचे शिष्टमंडळ व महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे व त्यांचे सहकारी या सर्वांसमक्ष मा. मुख्यमंत्र्यांशी भेट नुकतीच झाली. मराठी शाळांच्या मागे शासन आपली सर्व ताकद उभी करेल कारण बहुजन समाजाचा सर्वार्थाने विकास करायला असेल तर मराठीतील शिक्षणाला पर्याय नाही. त्यासाठी महाराष्ट्र शासन पूर्णपणे प्रयत्नशील असेल, असे आश्वासन मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी दिले आहे. या बैठकीत काही मुद्दे मुख्यमंत्र्यांसमक्ष मांडण्यात आले. ज्यामध्ये इतर राज्यांमध्ये शाळांची केवळ नोंदणी केली जाते ती पद्धती महाराष्ट्रात स्वीकारावी अशी मागणी केली होती. त्याप्रमाणे काही शिक्षणसम्राट बोगस शाळा चालवतात त्याची झळ प्रामाणिकपणे शाळा चालवणाऱ्या चांगले घडवण्यासाठी धडपडणाऱ्या कार्यकर्त्यांना देऊ नये, असे मत राज ठाकरे यांनी मांडले. स्वयंअर्थसाहाय्यित शाळांचा कायदा तयार होण्याअगोदर शिक्षण मंत्र्यांच्या आणि मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत बैठक घेऊ, असे आश्वासन मुख्यमंत्र्यांनी दिले आले.

त्याचप्रमाणे महाराष्ट्रात वेगवेगळ्या ठिकाणी संपूर्णपणे मराठी माध्यमाच्या ज्या प्रयोगशील शाळा सुर आहेत त्यांना संशोधन केंद्राचा दर्जा देण्यात यावा या शिष्टमंडळाच्या मागणीवरही गांभीर्याने विचार करण्याचे त्यांनी मान्य केले आहे. मातृभाषेतील गुणवत्तापूर्ण शिक्षणाचा सर्वंकष विचार करण्याचे आश्वासन मुख्यमंत्र्यांनी या बैठकीत दिले.

■■■

## विश्ववृत्त



वृ त्त वि श्व

### ♦ कोरियातील शाळेत शांतता शिक्षणासाठी प्रयत्न

कोरियातील पाजु शहरातील ‘ज्युने प्राथमिक विद्यालय’ युनेस्कोच्या 'ASP net' - Associated schools Network Project याच्याशी १३ ऑगस्ट २०१२ रोजी जोडले गेले आहे. या शाळेचे ASP शी जोडले जाणे त्यांच्यासाठी महत्त्वपूर्ण घटना आहे.

शाळेचे ध्येय आहे की, विद्यार्थ्यांना एकमेकांवर प्रेम, जिव्हाळा जपायला शिकवणे. एकमेकांशी संवाद साधून, समजून घेऊन शांततेने जगण्याचे शिक्षण मुलांना देणे गरजेचे आहे. युनेस्कोच्या ASP net चे प्रमुख आयरिन बोकोव्ह यांनी सांगितले की,‘मुलांना शांतता आणि एकत्र राहण्याचे शिक्षण मिळणे हे अतिशय महत्त्वाचे आहे. युनेस्कोला या शाळेत आणि जागतिक पातळीवरील शिक्षणात शांततेचा व एकोप्याचा संदेश रूजवायचा आहे व त्यासाठी ते प्रयत्नशील आहेत.

शांतता, मानवाधिकार आणि शाश्वत विकास साधायला असेल तर शालेय पातळीवर शांततेचे मूल्य रुजवणे आवश्यक आहे. त्यादृष्टीने कोरियातील शाळेने युनेस्कोच्या मदतीने महत्त्वाचे काम सुरू केले आहे.

### ♦ प्राथमिक शिक्षकांचा शैक्षणिक दर्जा वाढवणार

‘द कॉलेटी एज्युकेटर्स् फॉर ऑल’ हा प्रकल्प ‘माली’ या देशातील शिक्षणाची स्थिती सुधारण्यासाठी तयार करण्यात आला आहे. मे महिन्यात सुरू झालेला हा प्रकल्प आहे. या प्रकल्पातील प्रशिक्षणाचा मुख्य हेतू तीनशे प्राथमिक शिक्षकांना पुढील तीन वर्षामध्ये शिक्षण देण्यासाठी आवश्यक अशा बाबीत सुधारित करणे असा आहे. मालीमधील सेगॉव या ग्रामीण प्रांतातून शिक्षक निवडून त्यांचे प्रशिक्षण करण्यात येईल. या संशोधनासाठी दिशा दाखविणारा एक गट नुकताच तयार करण्यात आला. या प्रकल्पात शैक्षणिक विविध संशोधक आणि मालीमधील या भागीदार आणि विविध शैक्षणिक संस्थाचे पदाधिकारी आहेत. या बैठकीनंतर या प्रोजेक्टसाठीचा पडताळणी आणि परीक्षणासाठीची संशोधन पद्धती तयार केली जात आहे. शैक्षणिक जाणिवा आधिक प्रगल्भ करणे, शिक्षणशास्त्रीय समज वाढविणे आणि विषयांचे ज्ञान वाढविणे यासाठी हे संशोधन उपयोगी पडू शकेल. ‘द कॉलेटी एज्युकेटर्स् फॉर ऑल’ हा E1 आणि oxfa Novib याचा संयुक्त उपक्रम शिक्षकांचा शैक्षणिक दर्जा वाढवून चांगल्या प्रतीचे शिक्षण मिळवून देण्यासाठी कार्यरत आहे.

■■■

# राष्ट्रवृत्त

## ♦ शिक्षणहक्क कायद्यास सुधारणा

केंद्र सरकारने शिक्षणहक्क कायदा – २००९ (आरटीई) मध्ये सुधारणा केली आहे. यामध्ये धार्मिक व भाषिक अल्पसंख्यांक दर्जा असलेली खासगी विनाअनुदानित शाळेतील विद्यार्थ्यांना शाळेच्या ट्रस्टचे प्रमाणपत्र जर मिळत असेल तर त्यांना शिक्षणहक्क कायद्यातील तरतुदींतून वगळण्यात येईल. मात्र धार्मिक अथवा भाषिक अल्पसंख्यांक दर्जा असणाऱ्या आणि एस. एस. सी., सी. बी. एस. ई., आय. सी. एस. ई. अथवा वेगळ्या कोणत्याही मंडळाशी संलग्न असलेल्या खासगी विनाअनुदानित शाळेला सुधारित शिक्षणहक्क कायद्यातील सर्व नियम लागू असणार आहेत. बालकांच्या मोफत आणि सक्तीच्या प्राथमिक शिक्षणासंबंधीची ही महत्त्वाची सुधारणा केली आहे. धार्मिक शिक्षण देणाऱ्या वैदिक पाठशाळा, मदरसे इत्यादी संस्थांना यातून वगळण्यात आले आहे.

'बालकांच्या मोफत आणि सक्तीच्या प्राथमिक हक्क अधिनियम (सुधारित) २०१२' यानुसार शालेय विकास आराखडा अनुदानित आणि विनाअनुदानित शाळांना बंधनकारक केला आहे. तसेच कोणत्याही शिक्षण मंडळाशी संलग्न शाळांना आरक्षणाचा म्हणजेच २५ टक्के राखीव जागांचा नियम लागू होतो, असे या सुधारित कायद्यात म्हटले आहे. कायद्यात केलेल्या तरतुदीनुसार या निर्णयाचा लाभ अल्पसंख्यांक शाळांमधूनही गरीब व वंचित घटकांतील विद्यार्थ्यांना आता होऊ शकतो.

## ♦ संशोधनास 'नॅशनल नॉलेज नेटवर्क' मार्फत प्रोत्साहन

कोणत्याही क्षेत्रात जितके अधिक संशोधन होते, त्यानुसार त्या क्षेत्राचा विकास आणि विस्तार संभवत असतो. त्या–त्या क्षेत्रातील उच्च शिक्षण प्राप्त करून संशोधनाला सुरुवात केल्यास त्या क्षेत्रासाठी भरीव योगदान देता येते व देशाच्या विकासातही हातभार लावता येतो. या गोष्टीचे महत्त्व लक्षात घेऊन आंतरविद्याशाखीय संशोधनासाठी एक मजबूत जाळे तयार करण्याची योजना सरकारने आखली आहे.

शिक्षणाचा दर्जा सुधारायचा असेल तर तंत्रज्ञानाचा वापर आवश्यक आहे. त्याचप्रमाणे उच्च शिक्षणाच्या संधीत वाढ करायला हवी; उच्च शिक्षण घेणाऱ्यांची संख्याही वाढायला हवी. त्यादृष्टीनेच आंतरविद्याशाखीय संशोधनासाठी देशभरातील शैक्षणिक संस्था, प्रयोगशाळा, ग्रंथालये या साऱ्यांना जोडणारे 'नॅशनल कॉलेज नेटवर्क' (राष्ट्रीय ज्ञान जाळे) तयार होत आहे. आंतरविद्याशाखीय संशोधनासाठी हा प्रकल्प नक्कीच फायदेशीर होऊ शकतो. पुढील काळातील शिक्षणक्षेत्रातील बदलांना सामोरे जाण्यासाठी संशोधनाचा पाया अधिक भक्कम होण्यासाठी सरकारचा हा उपक्रम उपयोगी ठरणार आहे.

■■■

## राज्यवृत्त

### मराठी शाळांच्या अस्तित्वासाठी निर्णायक लढा

महाराष्ट्रातील मुलांना महाराष्ट्रात राहूनही मातृभाषा मराठीतून शिक्षण घेणे दुरापास्त होते की काय अशी स्थिती निर्माण झाल्याने मराठी शाळांसाठी गेली दोन वर्षे आंदोलन चालू आहे. शिक्षण हक्क समन्वय समिती आणि मराठी अभ्यास केंद्र या दोन संस्थांच्यामार्फत मराठी शाळांच्या मान्यतेसाठी आंदोलन चालू होते. एप्रिल २०१० मध्ये कार्यकर्त्यांनी उपोषणाच्या माध्यमातून या प्रश्नास वाचा फोडली. शासनाच्या निदर्शनास मराठी शाळांच्या मान्यतेचा प्रश्न आणून दिला तरी गेल्या दीड वर्षात विशेष काहीच घडले नाही. त्यामुळे १६ जुलै २०१२ रोजी पुण्यात सत्याग्रहाच्या माध्यमातून पुन्हा या प्रश्नासाठी लढा देण्यास सुरुवात झाली होती. त्यानंतर दिनांक १ ऑगस्ट रोजी शासनाने या प्रश्नाच्या संदर्भात काही सकारात्मक पावले उचलली आणि आंदोलकांच्या शिष्टमंडळाची भेट घेऊन त्यावर विस्तृत चर्चा करण्यात आली. यावेळी शालेय शिक्षणमंत्री राजेंद्र दर्डा, शिक्षण सचिव जे. एस. सहारिया, शिक्षण संचालक डॉ. श्रीधर साळुंखे आणि शिक्षणहक्क समन्वय समितीचे अध्यक्ष रमेश पानसे इत्यादी मंडळी चर्चेत सहभागी होती.

आंदोलनादरम्यान आंदोलकांनी त्यांच्या मागण्यांचा विस्तृत मसुदा तयार केला होता. ज्यामध्ये प्रमुख तीन मागण्यांवर भर देण्यात आला होता.♦ मराठी शाळांची नोंदणी अथवा मान्यता♦ १९ जून २०१० चे पत्रक व शिक्षणहक्क कायद्याची अंमलबजावणी ♦स्वयंअर्थसाहाय्यित खाजगी शाळांसाठी नवा कायदा या मागण्यांवर विचार करण्यासाठी शासनाला लागणारा वेळ लक्षात घेऊन आंदोलकांनी तातडीच्या चार मुद्यांवर शासनाची चर्चा केली. ते चार मुद्दे पुढीलप्रमाणे होते.♦मराठी अभ्यास केंद्राने समक्ष तपासणी केलेल्या सुमारे शंभर चालू असणाऱ्या खाजगी मराठी शाळांना मान्यता देणारे शासन निर्णय परिपत्रक (जी. आर.) काढावे व प्राथमिक शाळांना सलग आठवीपर्यंत माध्यमिक शाळांना सलग दहावी पर्यंतची मान्यता द्यावी.♦सन २००५ व २००८ साली प्रस्ताव दाखल केलेल्या किंवा सरकारी बंदीमुळे ज्या शाळांना प्रस्ताव दाखल करता आलेले नाहीत त्यांना मान्यता देण्यात यावी (त्या शाळा प्रत्यक्षात चालू आहेत याची खात्री करून).♦दि. १९ जून २०१० चे अन्याय्य व शिक्षण हक्क कायद्याच्या मूळ हेतूस विसंगत ठरणारे, मराठी शाळांवर बंदी आणणारे परिपत्रक रद्द करण्यात यावे. ♦या परिपत्रकानुसार आजवर जारी केलेल्या सर्व नोटिसा मागे घ्याव्यात.शिक्षणमंत्री आणि त्यांच्या सहकाऱ्यांसोबत वरील सर्व मुद्यांवर सविस्तर चर्चा झाली; सकारात्मक प्रतिसाद मिळाला. चर्चेत शासनाने काही गोष्टींवर मान्यता दर्शविली आहे. त्या पुढीलप्रमाणे आहेत.♦मराठी अभ्यास केलेल्या सर्वेक्षणातील ८८ शाळांपेकी ३२ शाळांचा ग्रामीण आणि नागरी बृहद् आराखड्यात समावेश होणे शक्य आहे व शासन तो समावेश प्राधान्याने करेल.♦उर्वरित शाळांना मान्यता देण्यासाठी स्वयंअर्थसाहाय्यित शाळांच्या विधेयकामध्ये आवश्यक दुरुस्त्या केल्या जातील.♦१९ जून २०१० चे परिपत्रक त्याचा शाळांना आलेला अनुभव लक्षात घेता दुरुस्त केले जाईल. या परिपत्रकावरील कारवाईस पूर्ण स्थगिती देण्यात येईल. शाळांवर कोणतीही दंडात्मक व फौजदारी कारवाई करण्यात येणार नाही. या यादीतील ज्या शाळांचा समावेश बृहद् आराखड्यात बसणे शक्य असूनही त्यात झालेला नाही त्याचा समावेश करण्यात येईल. ♦ सर्व शाळांमधील विद्यार्थ्यांना चौथी आणि सातवीची शिष्यवृत्ती, दहावीची परीक्षा आणि इतर स्पर्धांबाबत ज्या अडचणी येतात त्याचे निवारण करण्यासाठी ताबडतोब परिपत्रक जारी केले जाईल.

■■■

# || ग्राममंगल वार्ता ||



शनिवार, दि. ११ ऑगस्ट २०१२ रोजी ग्राममंगलच्या पुणे येथील लर्निंग होम या प्रकल्पातील नवीन पालकांसाठी एका कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. माणसाचा मेंदु, त्याच्या उत्क्रांतिचे टप्पे व त्याचे कार्य, याच्याआधारे मूल कसे शिकते? हे समजून घेणे हे या कार्यशाळेचे उद्दीष्ट होते. लर्निंग होम प्रकल्पाचे संचालक प्रसाद मणेरीकर यांनी या कार्यशाळेत सहभागी पालकांना वरील विषयाचे मार्गदर्शन केले. दिवसभाराचीही कार्यशाळा संवादात्मक होती. पालकांना खूप वेगळे आणि पालकत्वासाठी अत्यंत आवश्यक असे ज्ञान मिळाले. ''या कार्यशाळेनंतर प्रत्येक पालकाला अतिशय समृद्ध व संपन्न झाल्यासारखे वाटते''.

अशा शब्दात पालकांनी आपल्या प्रतिक्रिया व्यक्त केल्या. या प्रतिक्रियांपैकी काही प्रतिक्रिया आमच्या वाचकांसाठी.

निशा नवरे :- 'शिकणे' ही मनुष्याच्या वाढ आणि विकासातील एक महत्त्वाची प्रक्रिया आहे. त्यामुळे प्रत्येकाने आपल्या पाल्याची ही शिकण्याची प्रक्रिया समजून घ्यायला हवी. मूल जन्मल्यापासूनच कोणी न शिकवता अनेक गोष्टी स्वतःच्या नैसर्गिक ऊर्मीतूनच शिकत असते. वय वर्षे ३ च्या पुढे मुलाची होणारी वाढ व विकास प्रत्येक पालकाने समजून घेणे गरजेचे आहे. प्रत्येक मूल स्वतंत्र व वेगळे असते आणि स्वतःला व्यक्त करण्याची त्याची पद्धतीही वेगळी असते. या गोष्टींचा विचार न करता पालक मुलांना आंधळेपणाने आणि सामाजिक नियमांच्या ओझ्यामुळे स्वतःच्या मनाप्रमाणेच वागायला लावतात. यामुळे मुलाचे 'स्वत्व' हरवते, त्याची सृजनशीलता व संवेदनशीलता कोमजते. पण पालक हे सोयीस्कररित्या विसरतात. मुलांच्या विश्वात डोकावून पाहिल्यानंतरच त्यांच्या कल्पना व सर्जशीलतेला मर्यादा नसतात ती अचाट असते. आपण समाजाच्या निर्बंधनांमुळे त्यांच्या विकासात अडथळा निर्माण करतो.

खरं तर प्रत्येक कामाच्या नवीन ठिकाणी आपण जेव्हा रुजू होतो तेव्हा तेथील कार्यपध्दती, नियम, त्या क्षेत्रातील नवीन संशोधन, बदल याबाबत अवगत होण्यासाठी तिथे प्रशिक्षण/कार्यशाळा यात सहभागी होतो. त्याचप्रमाणे पाकलत्वाबाबत समजून घेण्यासाठी हे कार्यशाळा एक चांगला उपक्रम ठरला. ज्यामुळे पालकांना मुलांच्या वर्तवणूकीत सतत होणारे बदल समजून घेणे सोपे झाले व त्यानुसार मुलांच्या गरजांची पूर्तता करण्यास मदत होईल.

या प्रशिक्षणानंतर माझा माझ्या मुलीकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलला आणि तिथे वर्तन समजून घेण्यात पुष्कळ मदत झाली. तिला ग्राममंगलच्या लर्निंग होम या प्रकल्पात शिकवताना मीच खूप शिकणार आहे, प्रगल्भ होणार आहे, असे वाटते.

**वनश्री इनामदार :–** या कार्यशाळेमुळे मला 'पालकत्व' या संकल्पनेची नव्याने ओळख झाली; मला पालकत्वाचा आनंद घेण्याची नवी दृष्टी मिळाली. मुलाला वाढवताना नेमक्या काय अडचणी येतात आणि त्या का येतात, नेमके कोणते अडथळे येतात, त्यासाठी त्याला त्याचे अवकाश द्यावे म्हणजे काय? त्याच्याशी वागताना काय काळजी घ्यावी या सर्व प्रश्नांचे शास्त्रशूध्द ज्ञान या कार्यशाळेतून मला मिळाले. मी ग्राममंगलला यासाठी खूप धन्यवाद देते.

**निवेदिता कृष्णा :–** ही कार्यशाळा समजण्यास अत्यंत सोपी, साधी व स्पष्ट अशी होती. मी आजपर्यंत अनेक मानसशास्त्रज्ञांचे आणि शिक्षणतज्ज्ञांचे विचार ऐकले,त्यांना भेटले,पण त्यापेक्षा अतिशय वेगळे व मूलभूत ज्ञान मला इथे मिळाले. इथे फक्त माहिती मिळाली नाही तर माझ्या विचार प्रक्रियेला चालना मिळाली. या कार्यशाळेत सांगितलेल्या मानवी मेंदुच्या उत्क्रांतीचे टप्पे आणि त्याचे कार्य ही माहिती थक्क करणारी होती. As the Session progressed i felt much more relaxed and convinced about the philosophy on which grammangal works in the field of education आणि अशा ग्राममंगलच्या 'लर्निंग होम' या प्रकल्पात माझी मुलगी शिकते आहे याचा मला खूप आनंद वाटतो आहे.

**उर्मिला देशमुख/योगेश देशमुख :–** आपण पालक होतो पण मुलाचा विकास कसा होतो?, मुलाल रडू का देवू नये?, त्याचे मानसशास्त्र सांभाळावे म्हणजे काय?, त्याचा मेंदुच्या विकासाशी काय संबंध असतो?, मूल अतिशय सहजतेने कसे शिकते?, मुलाला कोणकोणत्या गोष्टींचे ताण येवू शकतात, या तणामुळे त्याच्या मानसिक व बौध्दिक विकासावर काय परिणाम होतो?, मुलांना शिक्षा का करू नये?,शिक्षेशिवाय स्वयंशिस्त कशी लावावी? अशा प्रकारची सर्व तर्कशुद्ध माहिती आम्हा दोघांना (आई–बाबाना) इथे समजली. 'पालक' म्हणून एक वेगळा व योग्य अर्थ आमच्या जीवनाला मिळाला. या कार्यशाळेनंतर या माहितीची लगेच अंमलबजावणी आम्ही केली आणि मुलांच्या वागण्यातील बदल आम्ही अनुभवले. आज आमची मुले ग्राममंगलच्या लर्निंग होममध्ये शिकत आहेत याचा आम्हाला खूप आनंद वाटतो. मुलांना खऱ्या अर्थाने आम्ही उत्तम शिक्षण देत आहोत याचे समाधानही मिळते आहे.

■■■



## ॥ शिक्षण आरंभ ॥

शिक्षणवेधमधून सद्यकालीन शिक्षण प्रक्रियेबद्दल आपण वैचारिक चर्चा घडवून आणतच आहोत. परंतु प्राचीन काळात ज्यावेळी औपचारिक शिक्षण पद्धतीचा आरंभ झाला. त्यावेळची शिक्षणपद्धती कशी होती हे सांगणारी, मनोरंजक पण बोधप्रद अशी ही लेखमाला...

# प्राचीन ग्रीस मधील शिक्षण पद्धती –स्पार्टा

**सुनित पोतनीस**

भूमध्य प्रदेशातील स्पेन, इटाली व ग्रीस या तीन द्रिपकल्पांत ग्रीस हे आकाराने सर्वात लहान आहे. पण ग्रीसचा समुद्रकिनारा अतिशय दंतूर असल्याने ग्रीसला इतरांहून अधिक लांबीचा समुद्रकिनारा लाभला आहे. ग्रीसला लागून असलेल्या एजियन समुद्रात ग्रिसची लहानमोठी अनेक बेटे इतस्ततः पसरलेली आहेत. त्यामुळे प्राचीन ग्रिकांना समुद्र म्हणजे परसातला तलावच वाटे. समुद्राशी नित्य संबंध आल्याने ग्रीस लोकांत स्वाभाविकच शौर्य, दर्यावर्दीपणा हे गुण आले. ग्रीसच्या उत्तर भागात पिंडस पर्वत व बाकी भागांत सर्व डोंगराळ प्रदेश असल्याने शेतजमीन, जंगले थोडीच आहेत. द्राक्षाची बागायती काही ठिकाणी होत असे. अन्नाचा तुटवडा असल्याने ग्रीक लोक खलाशी, व्यापारी व चांचे बनणे साहजिकच होते. पर्वतांच्या दाटीमुळे वाहतूक अवघड होऊन ग्रीसमध्ये अनेक छोटी नगरराज्ये तयार झाली.

सर आॅर्थर इव्हान्स यांना १८७१ ते १८९९ मध्ये ग्रीसच्या बेट समूहातील क्रीट बेटांत ग्रीसच्या प्राचिनतम संस्कृतीचा शोध लागला. तिथे प्राचीन काळात मनीस राजा राज्य करीत होता म्हणून तिथल्या संस्कृतिला मीनोअन किंवा एजियन संस्कृती असे म्हणतात. या संस्कृतीचा काळ इ. स. पूर्व ३००० ते १२०० पर्यंतचा होता. क्रीटन लोवू, शाई व टाक यांनी मातीच्या विटांवर त्या काळी लिहीत असत.

ग्रीकांच्या नगरराज्यांपैकी स्पार्टा, अथेन्स, आॅलिम्पिया, थिब्ज इत्यादी नगरराज्ये पुढारलेली होती. इ. स. पूर्व आठव्या शतकातील स्पार्टा, अथेन्स, थिब्ज येथील शिक्षणव्यवस्थेबद्दल उल्लेख मिळतो. स्पार्टामधील मुलांना शिक्षण देण्यामागे त्यांचा मुख्य हेतू मुलांना चांगले योद्धे आणि सैनिक तयार करणे हा होता. जन्मापासूनच मुलांना कुठल्याही परिस्थितीला तोंड देता येईल, अशी सवय लावीत

असत. स्पार्टात त्याकाळी नवजात शिशुला प्रथम वयस्क लोकांना दाखवीत. जर तो दुबळा वाटला तर त्याला एक रात्र टॉजीटस पर्वतावर ोवीत. जीवंत राहिला तर त्याला वाढवीत. त्याला सातव्या वर्षी शाळेत दाखल करीत असत. स्पार्टातील शाळा सरकारी असत. सरकारी शाळेतच सतराव्या वर्षापर्यंत त्याला शिक्षकाच्या देखरेखीखाली लष्करी व शारीरिक शिक्षण घ्यावे लागे. विद्यार्थ्याला अत्यंत खडतर जीवनाची सवय व्हावी, म्हणून त्याला गवतावर निजावे लागे, पायात काहीही न घालता अनवाणी कवायत करणे, उन्हाळ्यात व हिवाळ्यात एकच कपडा वापरावा लागे. जेवावयास पुरेसे अन्न देत नसत. बाकी, भूक भागविण्यासाठी त्याला शिकार करण्याची व चोरी करण्याची परवानगी असे. पण चोरी करताना पकडले गेल्यास फटके खाण्याची शिक्षा असे. त्याला लष्करी भोजनालयातच जेवावे लागे. दर महिन्याला प्रत्येक विद्यार्थ्याला एक बुशेल धान्य, आठ गॅलन दारू , पाच पौंड चीज व अडीच पौंड अंजीर लष्करी भोजनालय (फिडीशिया) मध्ये जमा करावे लागे. दर महिन्याचे अन्न फिडीशियात जमा न केल्यास नागरिकत्त्व रद्द केले जाई.

शाळेच्या अभ्यासक्रमामध्ये शारीरिक शिक्षण, युद्धशास्त्र हे सर्वांत महत्त्वाचे विषय मानले जात. याशिवाय तिथे लेखन, वाचन, युद्धगीतांचे पाठांतर, संघनृत्य व व्यायामप्रकार शिकविले जात. स्पार्टनांच्या मते, मुलगा गणित, शास्त्र हे विषय शिकला नाही तरी चालत असे. १८ ते २० वर्षांच्या मुलांची शिक्षण संपल्यावर शारीरिक क्षमता, नेतृत्व गुण यांची परीक्षा घेत. त्यांना आर्टेमिस देवासमोर फटके मारण्यात येत. जास्तीत जास्त फटके सहन करणाऱ्याला पारितोषिक देण्यात येई. जे विद्यार्थी शारीरिक क्षमता व नेतृत्व गुण यांत अनुत्तीर्ण होत त्यांना स्पार्टाचे नागरिकत्व मिळत नसे, तसेच त्यांना लष्करात भरती होता येत नसे. मुलींच्या शिक्षणाबाबत असे दिसून येते की, स्पार्टन परंपरेतच असे होते की, मुलींनी कमी ऐकावे व पहावे. मुलींना शिक्षण देण्याची पद्धत स्पार्टामध्ये नव्हती.

■■■

## शिक्षणवेधसाठी आपण हे करू शकता.




- वार्षिक वर्गणीदार
- एखाद्या कुटुंबाला अंक भेट
- कल्पक सूचना
- विविध शैक्षणिक संदर्भ किंवा माहिती
- आपलं कसदार लेखन
- वर्षभर किमान एखादी जाहिरात
- उपक्रमांसाठी प्रायोजक
- परीक्षणार्थ पुस्तके
- प्रतिक्रिया आणि शुभेच्छा

## || कलाशिक्षणाची तोंड ओळख ||

'कले'ला जीवनात अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. कला ही जीवनाच्या प्रत्येक अंगाला स्पर्श करणारी व पूर्णत्वाकडे नेणारी प्रक्रिया आहे. जीवनाकडे पाहण्याचा एक नवीन दृष्टिकोन कलेमुळे प्राप्त होतो. प्रत्येक मानव हा वैशिष्ट्यपूर्ण असून त्याच्या ठिकाणी सर्जनशीलता आहे हाच सर्व कलांचा मूलभूत सिद्धांत आहे. नवनिर्मिती व सौंदर्योपासना यामुळे व्यक्तीजीवनाला दिव्यत्व प्राप्त होते. कलेच्या वैशिष्ट्यांसह कलाशिक्षणाचे महत्त्व सांगणारे कलाशिक्षणाची तोंडओळख करून देणारे सदर.

# माध्यमिक शाळेतील चित्रकला शिक्षण

**सौ. हेमा धोत्रे**

कला म्हणजे विद्यार्थ्यांच्या भावनांचे अथवा विचारांचे दृश्य स्वरूप किंवा काही एका माध्यमाद्वारे केलेले भाव प्रकटीकरण असते. सभोवतालच्या जगाचा विद्यार्थ्यांवर जो प्रभाव पडतो त्याची होणारी प्रतिक्रिया तो जगासमोर चित्रांद्वारा मांडत असतो. व्यक्ती तितक्या प्रवृत्ती असल्याने प्रकटीकरणाच्या क्रियेमध्ये विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्वाचा फार मोठा प्रभाव असतो. विद्यार्थी ज्या भौगोलीक, सामाजिक व सांस्कृतिक वातावरणात वाढतात, ज्या परिस्थितीतून विचार व भावना यांचे पोषण झाले असेल, त्याप्रमाणे त्यांचे व्यक्तिमत्व बनते आणि त्याचेच प्रतिबिंब त्याच्या चित्रात असते व हे अगदी स्वाभाविक असते. म्हणूनच भाव-प्रकटीकरण हे कलानिर्मितीचे मूळ असले तरी ते त्या त्या व्यक्तीच्या व्यक्तित्व, रुढी-परंपरा, माध्यमांची विविधता यांमुळे एकाच प्रकारचे न होता अनेक प्रकारचे होऊ शकते.

माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांना सत्यतेची जाणीव बऱ्याच प्रमाणात आलेली असते. निरीक्षण वाढलेले असते. त्यांचा कल विशेषकरून सर्वसामान्य आकृती नक्षी काढण्याकडे असतो. रेखाटन करीत असताना चित्रातील बारकावे. चितारणे, परिश्रमपूर्वक रेखाटन करण्याकडे ओढा दिसतो. म्हणून याच वयात त्यांच्या कल्पनाशक्तीचा आणि विकसित होणाऱ्या वास्तवतेचा मेळ घालणे आवश्यक असते. म्हणून या विद्यार्थ्यांसाठी शिक्षक तसेच पालकांनीही पुढील काही बाबी लक्षात घेणे अत्यंत गरजेचे असते जसे, ♦ मोठ्या माणसांच्या अथवा वास्तवतेच्या कल्पना व निकष यांच्या चित्राला लावले जाऊ नयेत अथवा त्यांचेवर लादले जाऊ नयेत. ♦ त्यांना कोणत्याही चित्राची नक्कल उतरवण्यास सांगू नये. ♦ त्यांची अभिव्यक्ती फुलवण्यासाठी स्मरणचित्र, संकल्पचित्रांचे रेखाटन मुक्तपणे करून द्यावे. पुस्तकातील चित्र पाहून काढण्यापासून त्यांना परावृत्त करावे. स्वतः केलेली चित्रनिर्मिती त्यांना आनंद देईलच पण पाहणाऱ्यासाठी सुखावेल. ♦ कलाशिक्षकांनी त्यांच्या वयाला रुचेल, पचेल असेच विषय चित्र काढण्यासाठी द्यावेत. नित्य जिवनातील प्रसंग, ऐतिहासिक चित्रे, गोष्टीरूप चित्रे, कल्पनाचित्रे

यांसारखी विषयात बदल असणारी चित्रे त्यांना काढण्यास द्यावीत. या विषयांतील विविधतेने त्यांच्या आत्मविष्कारास नक्कीच वाव मिळतो. ♦ त्यांना सतत नावीन्य हवे असते म्हणून विविध साहित्य, माध्यमे, पध्दती व प्रयोग यांचा उपयोग करावा. ♦ चित्रकला शिक्षकाने वर्गात विविध उपक्रम राबवावेत. ♦ चित्र काढताना त्यांच्या विचारांना मोकळीक द्यावी. स्वयंस्फूर्तीने रेखाटन त्यांना करू द्यावे. ♦ विद्यार्थ्यांच्या कामाचा दर्जा हा सगळ्यांचा समान नसतो त्यामुळे सर्वांकडून सारख्याच कामाची अपेक्षा करू नये. प्रत्येकाच्या चित्रात चित्र काढण्याविषयीची तळमळ व प्रामाणिकपणा असतोच त्यामुळे सर्व विद्यार्थ्यांचे सारखेच कौतुक करावे, त्यांना प्रोत्साहन द्यावे. ♦ कलेच्या अध्यापनासाठी वातावरणनिर्मिती आवश्यक असल्याने मुलांना आपला कलाविष्कार करण्यात आनंद वाटावा यासाठी पोषक वातावरण निर्माण करावे. चित्रकला तासाची मुलांनी वाट पाहावी असे वर्गातील वातावरण असावे. ♦ त्यांच्या चित्रात मोठ्यांना ज्या चुका वाटतात त्या खरं तर चुका नसतात तर ती त्यांच्या बालमनाची रेखाटन–वैशिष्ट्ये असतात. काही मोठ्या व्यक्ती मुलांच्या चित्राला वास्तवतेचे, सत्यतेचे नियम लावतात म्हणून त्यांना त्या चुका वाटतात. म्हणूनच वास्तवतेचे नियम या मुलांच्या चित्राला लावू नयेत. कारण त्यांना जे माहिती आहे, जे भावते तेच व तसेच चित्र ते काढीत असतात.

काय आहे? त्यापेक्षा कसे आहे? याचा विचार चित्र पाहून करावा. या वयात वास्तवता व कल्पना यांचा मेळ बसतो. वास्तवतेची जाण त्यांना येते. याच वयात मुलांना चित्र रेखाटनाचे, रंगकामाचे काही नियम शिकवल्यास चित्रकला अधिक वृध्दिंगत होते. रेषा कशी जोरकस, लयदार काढावी, चित्राची रचना कशी करावी, रंगसंगतीचा वापर कोठे, कसा नेमकेपणाने करावा, याचे शिक्षण चित्रकलेच्या तासांना मुलांना दिल्यास चित्रकलेची गोडी पण वाढते. प्रमाणबद्धता, वस्तूचे इतर वस्तूंशी असलेले प्रमाण याची जाण त्यांच्या चित्रातून दिसायला लागते. छाया, प्रकाश, दूरत्व, यथार्थ दर्शन याची कल्पना त्यांना येते. चित्रातून त्यांचे निरीक्षण कौशल्य चांगले होते. त्यामुळेच विशेष करून वास्तवतेवर आधारलेल्या विषयावर चित्र रेखाटण्यास मुलांना वेळ लागतो. विद्यार्थ्यांच्या चित्राचे कौतुक केल्याने त्यांच्यातील आत्मविश्वास वाढतो. सांघिक कामे, चित्र, शिल्पनिर्मिती त्यांना आवडते कारण त्यांच्या भावभावना, नेतृत्वगुण यांना वाट मिळते. माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांना चित्रकला ग्रेड परीक्षांना बसण्यास प्रोत्साहन द्यावे. त्या परीक्षांचे फायदे मुलांना स्पष्ट करून या परीक्षेचे महत्त्व पटवून द्यावे. या विद्यार्थ्यांवर शिक्षकच फक्त संस्कार करतात असे नाही तर घर, समाज, सभोवतालचा परिसर यातूनही संस्कार होत असतो. म्हणूनच शाळा या औपचारिक शिक्षणसंस्था आहेत तर परिसर ही अनौपचारिक शिक्षणसंस्था आहे. त्यांची चित्रे म्हणजे ‘बालमनाचा जणू आरसाच’ म्हणावे लागेल. मुले व मुली यांच्या चित्रात देखील काही वेळा सूक्ष्म फरकही आढळतो. मुलींच्या चित्रात नक्षीकाम अधिकाधिक दिसते. घाई, गडबड फारशी नसते. मोजून मापून काम केलेले दिसते तर मुलांच्या चित्रात जोरकस रेषा, बिनधास्त काम करण्याची सवय आढळते. कला हे शिक्षणाचे नैसर्गिक माध्यम आहे. जिथे शब्द अपुरे पडतात, तेथे रंग, रूप, आकार त्याची पूर्तता करतात. म्हणून कला शिक्षण सर्व विषयाचा पाया आहे. थोडक्यात मानवी जीवनाला सुसंवादी आकार देण्याचे सामर्थ्य कलेत आणि कलावंतात आहे. ‘सत्यं, शिवं, सुंदरम’ या मूल्यांचा साक्षात्कार होतो तो कलेमुळेच. म्हणूनच शिक्षक व पालकांनी विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांचा शोध घेऊन त्यांचे संवर्धन जरूर करावे. त्यातूनच या वयोगटातील मुलांचा ‘सर्वांगीण विकास’ हे शिक्षणाचे एकमेव उद्देश साध्य होईल.

■■■

## || पुस्तक परीक्षण ||

# शाळांची उजळ बाजू समोर आणणारे पुस्तक 'शाळाभेट'




**अपर्णा कुलकर्णी**

विद्यार्थ्यांना शिकते करायचे तर शाळा आणि शिक्षक यांची एकतानता खूप महत्त्वाची आहे. विशेषतः जिल्हा परिषदेच्या शाळांबद्दल अनेक नकारात्मक गोष्टी वारंवार समोर येतात. जिल्हा परिषदांच्या शाळेतून मिळणाऱ्या शिक्षणाचे तीनतेरा वाजलेत; पट नोंदणीचा गोंधळ, कारभारातील भ्रष्टाचार इत्यादी अनेक प्रकारच्या बातम्या वाचनात येतात. यातून शिक्षणाविषयी, शाळा आणि शिक्षकांविषयी नकारात्मक भावना मूळ धरायला लागते, एक प्रकारची उदासिनता निर्माण होते. या सगळ्यात मग चांगले काम करणाऱ्या शाळा आणि शिक्षकांकडे पूर्ण दुर्लक्ष होते. मुलांवर नितांत प्रेम करून त्यांना सहज शिक्षण देणाऱ्या शिक्षकांच्या कामाकडे दुर्लक्ष होते.

गटशिक्षणाधिकारी असणारे नामदेव माळी यांनी काही शाळांना भेट देऊन त्याविषयी साधना साप्ताहिकातील लेखमालेतून या शाळांचे कार्य इतरांसमोर आणले. सातारा, सांगली, कोल्हापूर, पुणे, परभणी, नंदुरबार या जिल्ह्यातील जिल्हा परिषदांच्या शाळांना त्यांनी भेट दिली. प्राथमिक शिक्षणाची उजळ बाजू दाखवून नामदेव माळी यांनी खूप महत्त्वाचे काम केले आहे, असे वाटते. यातून चांगलं काम करणाऱ्या शिक्षकांची दखल घेऊन त्यांना प्रोत्साहन तर मिळालेच परंतु ते 'शाळाभेट' या पुस्तकरुपाने पुढे आणल्याने निराश झालेल्या आणि मनाला मरगळ आलेल्या शिक्षकांनाही खडबडून जागे करणारे ठरेल, असे वाटते. या शाळेतील शिक्षकांना मुलांविषयी अपार माया आहे, आपुलकी आहे. मुलांना केवळ 'साक्षर' न करता सर्व प्रकारचे सुसंस्कार त्यांना प्रदान करण्यासाठी शिक्षकांचे प्रयत्न चालू असतात. शिक्षकांना प्रोत्साहन देणारे अधिकारी येथे दिसतात. एकोप्याने किती ताकदीचे काम उभे राहू शकते हे पुस्तक वाचताना वारंवार जाणवत राहते.

भौतिक सुविधा आवश्यक आहेतच पण केवळ त्यासाठीच हटून न बसता आणि त्यातून मार्ग काढत प्रयोगशीलता जपणाऱ्या या जिल्हा परिषदांच्या काही शाळांबद्दल वाचताना खूप कौतुक वाटते. ग्रामीण भागातील या शाळांचा शिक्षणाविषयक विचार आणि त्यांची कृती खूप दूरगामी विचार करणारी आणि सुदृढ अशी आहे. शेळकेवाडीच्या शाळेचे उदाहरण घेतल्यास, तेथे दिले जाणारे शेतीचे शिक्षण (सामान्य शिक्षणाबरोबर) म्हणजे उपक्रमशीलता आणि भविष्याच्या नियोजनाचा एक आदर्श नमुना आहे. तेथील अवसरे गुरुजींनी शेती प्रकल्पातून मुलांमध्ये जबाबदारीची जाणीव, आत्मविश्वास, परस्पर सहकार्याची भावना, जल साक्षरता, वृक्ष/पर्यावरण साक्षरता, यशाचा आनंद घेण्याची सवय, संवादकौशल्य या आणि यासारख्या अनेक बाबींची सहज रुजवणूक केली आहे. अवसरे गुरुजींना विज्ञानाची आवड आहे. मुलांमध्येही सोप्या पद्धतीने त्यांनी ती रुजवली आहे. त्यांच्या पाचवीच्या वर्गातील मुले पाठ्यपुस्तकातील माहितीत असणारे 'हृदयाच ठोके' पपईच्या लांब पोकळ देठाचा वापर करून प्रत्यक्ष ऐकतात; मोजू शकतात.

जीवशास्त्रातील सगळ्या संकल्पना प्रत्यक्ष शाळेच्या परसबागेत जाऊन समजून घेतात. झाडे लावतात, वाढवतात, निगराणी करतात, किडीवर उपाय करतात, शेतात राबतात, शिकतात. शिक्षण अपोआप घडत जाते आणि आनंदाने घडते. अवसरे गुरुजी आणि शाळेतील इतरांनी काळाची गरज ओळखून मुलांना शेती शिक्षण देण्याचे ठरवले. पुढील काळात शिक्षण असले तरी प्रत्येकालाच नोकऱ्या मिळतील असे नाही. त्यामुळे शेतीचे शिक्षण असेल, शेतात काम करायची आवड असेल तर मुलांना भविष्यकाळात बेकारीच्या समस्येला सामोरे जावे लागणार नाही. शिवाय श्रमप्रतिष्ठेचा खूप महत्त्वाचा संस्कार या मुलांवर होतो आहे. आष्ट्याच्या शाळेतील साधना व मनिषा या दोन शिक्षिकांनी शाळेच्या आजूबाजूच्या दोन एकरांत परिसर फुलवला आहे. एवढेच नव्हे तर मनिषाने तिच्या चौथीच्या वर्गातील मुलांचे इंग्रजी वाचन इतके उत्तम घडवले आहे की, कोणत्याही पाठांतराशिवाय ही मुले समजून व्यवस्थित इंग्रजी वाचू शकतात. विशेष म्हणजे कुटुंबातून कोणत्याही प्रकारची शैक्षणिक पार्श्वभूमी नसलेली कातकरी समाजातील ही मुले आहेत. वंचितांच्या शिक्षणाच्या दिशेने केलेली ही सकारात्मक कृती खूप महत्त्वाची आहे.

नामदेव माळींनी ज्या-ज्या शाळांना भेट दिली त्यातील जवळपास सर्वच शाळांमध्ये पर्यावरण विषयक जाणीव जपली जाते; वाढवली जाते. जवळपास सर्वच शाळांमध्ये परसबाग आहे. त्या परसबागेत पिकणाऱ्या भाज्यांचा-फळांचा मुलांच्या पोषण आहारात समावेश केला जातो. शुद्ध हवेत बागडणाऱ्या, सकस अन्न खाणाऱ्या या मुलांना वडापाव-चायनीज सारख्या फास्टफूडची चटक लागलेली नाही. शाळांमधील वर्गखोल्या नेटक्या, सजवलेल्या, स्वयंअध्ययन साहित्याने परिपूर्ण (जे मुलांच्या मदतीने शिक्षकांनी बनवले आहे, विकतचे नव्हे) आहेत. मुलं गटात आनंदाने शिकतात; एकमेकांना शिकवतात, वेगवेगळ्या कृती करून पाहतात, भरपूर व्यायाम करतात, स्पर्धांमध्ये भाग घेतात आणि या सगळ्यातून आनंद कसा मिळवायचा हे शिकतात. गावात लग्न समारंभासारखा कार्यक्रम असला तरी तो झाल्यावर मुले आपोआप दुपारी शाळेत येतात. मुलांना शाळेची ओढ आहे, १०० टक्के उपस्थिती असते. शाळेचे केवढे मोठे यश आहे हे!.

आंबवडे खुर्दच्या शाळेतील मुलींचे लेझीमचे पथक आहे. मुली अप्रतिम लेझीम खेळतात. शाळेतील सगळ्या मुलांना कोणत्या ना कोणत्या उपक्रमात सहभागी होता यावे याकरता खेळ, वक्तृत्व, चित्रकला, गायन, सांस्कृतिक कार्यक्रम, बालसभा, लेझीम पथक, झांज पथक या सगळ्यांचा समावेश केला. प्रत्येक मुलाचे मन जपले. मुख्य म्हणजे या शाळेतील शिक्षण मुलांमध्ये सामाजिक बांधिलकीचे मूल्य रुजवण्यात यशस्वी झाले आहे. मुले कष्ट करतात, काटकसर करून पैशांची बचत करतात, खाऊतले पैसे वाचवतात. साठवलेल्या पैशांचा विनियोग समाजातील गरजूंसाठी, सामाजिक कामासाठी करतात. समाजाचं ऋण फेडण्याचा हा संस्कार मोलाचा आहे. साहित्याची रुजवणूक करणारी किल्ले भूदरगडची शाळा, कृतीतून शिक्षणाला प्राधान्य देणारी, शिंदेवाडीची शाळा, बोरवड्याची गर्द हिरवाई जपणारी शाळा अशा साधारण १५-१६ शाळांची ओळख आपल्याला या पुस्तकाच्या वाचनातून होते. शाळांचे काम, त्यांची शिक्षणाविषयक दृष्टिकोन, शिक्षकांची मुलांविषयीची तळमळ हे सारे वाचून मनाला उभारी येते. मुलांना शिक्षणाकडे वळवण्याची, शिकण्याची गोडी निर्माण करण्याची तळमळ या शाळांच्या कामातून प्रतिबिंबीत होते. आज बऱ्याच शिक्षकांकडून 'प्रकल्प', 'उपक्रम' या विषयी उदासिनता जाणवते. परंतु या सगळ्यावर मात करत विश्वासाने आणि नेटाने प्रयोगशील राहणाऱ्या शिक्षकांबद्दल या पुस्तकातून वाचताना खूप समाधान वाटते. 'कोण करणार' यापेक्षाही 'मी माझ्याकडून पूर्ण प्रयत्न व चांगले काम करणार, बदलाच्या दिशेने आपोआप वाट तयार होईल' हा विश्वास या शिक्षकांच्या कृतितून दिसतो. शिक्षक,भावी तरुण शिक्षक, शहरातील शिक्षक आणि पालक या सगळ्यांनी आवर्जून वाचलेच पाहिजे, असे हे पुस्तक आहे.

**शाळाभेट, नामदेव माळी,**
**साधना प्रकाशन, पुणे**

# पालकत्वाचा विकास

**आसावरी गुपचूप**

आई–बाबा होण्यामधील आव्हानांची चुणुक आपल्याला बाळाच्या जन्मानंतर यायला सुरुवात झालेलीच असते. त्या आव्हानांचा वेग आणि संख्या पाहता त्या क्षणी दुसरा कसलाही विचार करायला फुरसतही नसते. अनेक वेळा असं होतं की, दिवसभर आई फक्त कामच करत असते आणि तरीही रात्री पाी टेकल्यावर असा प्रश्न पडतो की, दिवसभरात मी काय केलं? अशा पद्धतीचा प्रश्न पुरुषालाही पडतो की, दिवसरात्र कष्ट करून मला काय मिळतंय? यावरचे दोघांचेही उत्तर असे असते की, आम्ही रोजी–रोटीचाच विचार करतो आहोत. आत्ता त्यालाच सर्वोच्च प्राधान्य आहे.

आणि जेव्हा जुने फोटो काढून चाळायला एखादा निवांत क्षण मिळतो तेव्हा लक्षात येते, अरे आपण आधी खूप वेगळे होतो. आपण एक व्यक्ती म्हणून कोणीतरी होतो. आपल्या काही आवडी–निवडी होत्या, मतं होती, आकांक्षा होत्या. बरेचदा असा समज असतो की, हे प्रश्न फक्त स्त्रियांनाच भेडसावतात. परंतु अपत्य जन्मानंतर पुरुषही स्वतःचे व्यक्तित्व तेवढेच शोधत असतो. अशा वेळी जाणवते की, आपल्याला तरी आपल्या जुन्या व्यक्तिमत्वाचा भाग हरवला असे वाटत असले, तरी तो भाग खरं म्हणजे तसाच शिल्लक आहे. अशी कल्पना करू या की, आपलं घर पसरलेलं आहे आणि अचानक पाहुणे येणार अशी आपल्याला बातमी कळते. मग आपण काय करतो? भराभरा आजूबाजूला पसरलेलं सामान कपाटांमध्ये ठेवून देतो. घर वरकरणी स्वच्छ दिसते. परंतु कपाटात साचलेली रद्दी तशीच राहते. घरातल्या वस्तूंचे मूळ स्वरूप फार बदलत नाही.

अगदी असेच व्यक्तिमत्वाचेही होते. नवीन मोठ्या बदलाला सामोरे जाण्यासाठी आपण वरकरणी कितीही बदल केले, तरी आतमध्ये जर भावनांचा पसारा पडला असेल, तर ते व्यक्तिमत्व नितळ, पारदर्शी होणारच नाही.

हा पसारा, हा गुंता मोठा मजेशीर असतो. न आवरलेल्या, कपडे कोंबून ठेवलेल्या कपाटामधून एक कपडा बाहेर खेचला तरी जसे आख्खे कपाट अंगावर कोसळते तसा असतो हा गुंता. वरकरणी अगदी साध्या दिसणाऱ्या काही घटना घडल्या तरी आख्खा भावनिक समतोल ढासळू शकतो.

अगदी नेहमी घडणारा प्रसंग : मुलाला पालकांनी त्याच्या मनाविरुध्द काहीतरी गोष्ट करायला सांगितलेली असते, तणतणत ते मूल ती गोष्ट करते आणि बराच वाद झाल्यावर शेवटी म्हणते 'तुम्ही मला सारखे रागावता, मला तुम्ही अजिबात आवडत नाही...'

हे वाक्य ऐकल्यावर पालकाच्या मनात काय काय येऊन जाते? कितीही केलं तरी यांना समाधानच नाही. किती कष्ट केले केवळ यांच्यासाठी? आणि एवढं करून मला हेच ऐकावं

लागलं? माझ्या हाताला यशच नाहीये.

वास्तविक हे बोलत असताना मुलाची मनःस्थिती कशी होती? त्याला खरेच असे म्हणायचे होते का? जाऊ दे, त्या मुलाचे वय किती आहे? यापैकी कोणताही प्रश्न आपल्याला त्या क्षणी पडत नाही. त्या क्षणाला फक्त एवढंच जाणवत असतं की मला पालक म्हणून अपयश आलेलं आहे. मी कमी पडलो/पडले. मला जमलंच नाही.

या विधानांत सत्यता किती असते हा फारच वेगळा मुद्दा आहे. मात्र असे विधान यापूर्वी मी स्वतः माझ्याबद्दल किती वेळा केले होते? हे विधान माझ्याबद्दल माझ्या पालकांनी किती वेळा वापरले? किती वेळा अप्रत्यक्षपणे मला हा संदेश दिला गेला? हा प्रश्न अतिशय महत्त्वाचा आहे.

आपण जरी पालक असलो तरी आपल्या बालपणाचे 'ओझे' बरेचदा आपल्या पाठीवर तसेच असते आणि हे ओझे अगदी सुरक्षित वातावरणामधून सुध्दा येऊ शकते. अगदी छोट्या-छोट्या प्रसंगांमधून, गोष्टींमधून आपण आपली प्रतिमा तयार करत असतो. एक मूल म्हणून जेव्हा आपण स्वतःकडे बघू लागतो, तेव्हा असे लक्षात येते की, ज्या गोष्टी आपल्याला आता क्षुल्लक वाटत असतात, त्या मूल म्हणून आपल्यासाठी खूप महत्त्वाच्या होत्या.

अगदी साधा प्रसंग आहे. सुनिताच्या घरामध्ये खूप नातेवाईकांची मुलं, पाहुणे म्हणून दर सुट्टीला येत असत आणि दरवेळी ती मुलं आली की, शिष्टाचार म्हणून सर्व चांगल्या गोष्टी त्या मुलांना मिळत. याचा अर्थ असा अजिबातच नव्हता, की सुनिताच्या आई-वडलांचे तिच्यावर प्रेम नव्हते. ते तिला तसे वेळोवेळी सांगतही होते. परंतु छोट्या सुनितासाठी ही गोष्ट मोठी होती. 'शहाणी मुलगी ना तू?' या विधानामुळे तिला नैसर्गिकपणे जो राग येत होता, तो व्यक्त करणे तिने बंद केले आणि 'शहाणी मुलगी' असेल तरच मी आई-बाबांना आवडणार आहे, अशी खूणगाठ तिने अगदी नकळतपणे बांधून घेतली.

पुढे लग्नासाठी वरसंशोधन सुरू झाले आणि स्वतःच्या मतांपेक्षा आई-वडील व समाजाच्या मतांचा 'आदर' करून तिने 'शहाणी मुलगी'पण पुन्हा एकदा सिध्द केले. सासरी तर 'आदर्श' बनण्यासाठी तिने प्रचंड मेहनत घेतली. मात्र सासरी तिचे कौतुक कोणीच करेना.

इथे सुरू झाली सुनिताची कुतरओढ. प्रत्येकाला खूष ठेवले तरच ती स्वतःच्या नजरेत 'शहाणी मुलगी' होणार होती आणि जोवर शहाणी मुलगी बनत नाही, तोवर ती स्वतःला प्रेमासाठी पात्र ठरवणार नव्हती. बाकीचे जग कसे वागत होते ही अजूनच निराळी बाब!

आणि आता या पार्श्वभूमीवर आपण पाल्याने केलेले 'तुम्ही मला फार रागावता. तुम्ही मला आवडत नाही' हे विधान पाहू. मघाशी 'लहान मूलच बोलतेय ना? सोडून द्या.' असे वाटत असले तरी सुनिता ज्या पध्दतीचे ओझे बाळगते आहे, तशा ओझ्यामध्ये हे विधान खूप जड, खूप दुःखद बनते.

सुनिल खूप गरीब परिस्थितीतून वर आला होता. स्वतःच्या कष्टावर, वेळी न जेवताही तो खूप शिकला. एका कंपनीमध्ये डायरेक्टर झाला. यासाठी त्यानी अपार कष्ट सोसले. त्याचं स्वप्न होतं की आपल्या मुलांना पैशाची म्हणून ददात पडता कामा नये. आणि त्यासाठी दिवसरात्र तो कामात गुंतलेला होता. तिसरीत शिकणाऱ्या त्याच्या मुलाने त्याला असेच रागाच्या भरात ऐकवले 'बाबा, तुम्हाला फक्त काम हवे आहे, मी नकोच आहे.'

आणि हे वाक्य सुनिलला किती लागले असेल, याची कल्पनाच केलेली बरी ! हे वाक्य त्याला 'जाऊ दे ना. सोडून दे' असे म्हणून सोडून देता येईल?

आपण सगळेच जण जरी पालक म्हणून मोठे झालो असलो तरी आपल्या सगळ्यांना काही ना काही प्रकारची पार्श्वभूमी असते. त्या पार्श्वभूमीवरून

धडे घेऊन आपण जगत असतो. आपण जगाबद्दलचे, जगण्याबद्दलचे निश्चित मत बनवलेले असते. त्या संकल्पना आपल्याला उपयोगी पडलेल्या असतात. आणि बरेचदा त्याचप्रकारे आपण आपल्या मुलालाही जगात वावरण्यासाठी तयारी करत असतो.

आता ही काही वाक्ये पाहू. 'जगात कष्टाला पर्याय नाही'. 'You have to Save for a rainy day' 'चांगले मार्कस् मिळाले, तरच मध्यमवर्गीयांना काही भवितव्य आहे'. 'जगात वावरायचे, तर समोरच्याला दोन देता आलेच पाहिजे'.

काय सांगतात ही वाक्ये ? हे सारे अनुभव आहेत. आणि आपल्या आयुष्यात कठीण प्रसंगातून जाताना ते आपल्याला उपयोगी पडले आहेत. म्हणून आपण त्याची नियमावली (golden rules) बनवून टाकली?

नीट खोलात जाऊन पाहिले, तर यांच्यामागे एक वेदनाही आहे. भीती आहे, असुरक्षितता आहे. यातल्या प्रत्येक वाक्यामध्ये एक खूप मोठा भूतकाळ आहे. त्याच्या कर्त्याचे बालपण, तारुण्य यांच्या कथा आहेत.

ते असुरक्षित, घाबरलेलं छोटं मूल आजही आपल्यामध्ये तसंच आहे. हे छोटं मूल ओळखायला शिकणं ही पालकत्वाची एक खूप महत्त्वाची पायरी आहे. मग आपल्याला समजतं की, आपले बहुतांशी वर्तन आपण पालक म्हणून न करता बालक म्हणून करत आहोत. आणि तेही आनंदी, सुरक्षित बालक म्हणून नव्हे, तर दुःखी, भयभीत बालक म्हणून.

परंतु मग करायचे काय? हे असे मूल आहे हे खरे. त्याला गप्प करायचे? रागावायचे? दटावायचे? आणि 'शहाण्यासारखे' मोठे व्हायचे?

अशी कल्पना करू या का, हे मूल म्हणजे आपण नाही. असे भेदरलेले मूल आपल्याला भेटले, तर आपण त्याला जवळ घेऊ की, रागवू? त्यांच्यावर सतत टीकेचा भडिमार करू, की त्याला प्रोत्साहन देऊ?

मोठ होण्याच्या प्रक्रियेमध्ये आपण स्वतःला चुचकारणं विसरून जातो. सर्वात जास्त टीका आपण आपल्यावर करत असतो. परिणामतः आपण स्वतःचे अतिशय कठोर, निर्दयी पालक बनतो. (आणि याचा अंश थोड्या फार प्रमाणात आपल्या मुलांशी वागण्यातही उतरतो.) आपण जगाला प्रेम देण्यासाठी मुळात आपण प्रेमाने पूर्ण असायला हवे ना? आपल्या चूका आपण किती प्रेमानी पोटात घालतो? कोणत्या शब्दात आपण स्वतःला 'सुनावतो?' नव्वद टक्के वेळा जगाकडून आलेली टीका आपल्याला जास्त बोचते, कारण ती सर्वप्रथम आपल्याकडून आलेली असते.

ही टीका आपल्या इतकी रक्तात भिनलेली असते की, तिच्या पलीकडे जाऊन स्वतःकडे बघण्यासाठी आपल्याला दुसऱ्या कोणाची तरी गरज लागते. आणि ती मदत घेणे हे अतिशय शहाणपणाचे असते. समुपदेशनाद्वारे हीच प्रक्रिया घडते. या प्रक्रियेची अजून ओळख आपण पुढील लेखात करून घेऊच.

मात्र तत्पूर्वी आपण स्वतःसाठी बनवलेले 'golden rules' आपण तपासून पाहू. मग कदाचित चांगल्या मार्कसच्या मागे न जाता दिवसभर क्रिकेट खेळणाऱ्या मुलाला आपण अजून चांगल्या पध्दतीने समजून घेऊ शकू. पैशाच्या बाबतीत मोठी रिस्क घेणाऱ्या आपल्या मुलाशी आपण संवाद साधू शकू. आपला अनुभव पुढच्या पिढीशी नक्कीच शेअर करू. परंतु त्याचा 'golden rule' बनवणार नाही.

शेवटी आपल्या भूतकाळानेही आपल्याला खूप काही शिकवलेले आहे. पण तो प्रवास आपला होता. आपल्या मुलांचा प्रवास अजून काही निराळा असू शकेल. आपला स्वतःचा प्रवास सांभाळून आपण त्यांना त्यांच्या प्रवासात साथ देण्याचा प्रयत्न करू.

■■■